


लाल नदी निळे डोंगर

वसंत अवसरे

लाल नदी निळे डोंगर

डॉ. वसंत अवसरे

ओळख

पु. ल. देशपांडे

साधना प्रकाशन, पुणें

प्रथमावृत्ति
लो. टिळक पुण्यतिथी
ऑगस्ट १, १९६४
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार, पुणें
मुद्रक
ह. म. गद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार, पुणें

आंतील चित्रें
वसंत अवसरे
मुखपृष्ठ
सौ. पद्मा सहस्रबुद्धे
किंमत
रुपये ४.००

3/८६

अनुक्रम

अवसरेडाक्टर

पु. ल. देशपांडे

जीवनाचें अनेक स्वरूपांत दर्शन घेण्याची ओढ फारच थोड्या लोकांना असते. बहुतेक माणसें आपापली चाकोरी शोधून काढतात. एकतर त्यांत रमतात किंवा वंगण नसलेल्या चाकांसारखीं कुरकुरतात. मग कोणी नियतीला दोष देतो, कुणी दारिद्र्याला, कुणी कशाला–कुणी कशाला. प्रारब्ध, भोक्तृत्व वगैरे सोयीस्कर शब्द इथें कामीं येतात. आपल्या जीवनाचा पट रंगवायचा आहे, नियतीच्या फटकाऱ्यांना चारचौघांची सहानुभूती मिळवण्यासाठीं कुरवाळींत–फुंकर घालवून जोजवीत न बसतां तिच्याशीं मुकाबला करीत पुढें जायचें आहे, ही विजिगीषु वृत्ती अभावानेंच आढळते. आपल्या देशांत तर ही वृत्ती फारच कमी. कुणी म्हणतात हवेचा दोष. कुणी म्हणतात आमचें निवृत्तीपर तत्त्वज्ञानच त्याला जबाबदार. कुणी म्हणतात, ‘ असार जीवित केवळ माया ’ ह्या विचारसरणीचा प्रभाव. कारणें कांहींहि असोत, पण ‘ आहे ताकद तोंपर्यंत म्हातारपणची सोय करूं—वेळींप्रसंगीं अडीअडचणीला कुणी उभें रहात नाहीं पाठीशीं ’ असल्या क्रियाहीन कळकटलेल्या भावनेनेंच माणसें वावरतांना आढळतात. अशा वेळीं साऱ्या जगाकडे, साऱ्या लोकव्यवहारांकडे बालकाच्या कुतूहलानें पहाणाऱ्या माणसाची गांठ पडली कीं अप्रूप वाटतें. डॉ. वसंत अवसरे हे असल्या अपवादांपैकीं एक. डॉ. अवसरे यांचा आणि माझा परिचय मी शाळेंत शिकत होतों

तेव्हांपासूनचा. अवसरे डॉक्टर हे मुंबई उपनगरांतले जगमित्र. उत्तम डॉक्टर आणि त्याहूनहि उत्तम मित्र. त्यांच्या मित्रपरिवाराला कुंपण नाहीं. त्यांच्या बैठकींत उमाशंकरांसारख्या श्रेष्ठ गुर्जर साहित्यिकापासून ते गल्लींतल्या हातभट्टीवाल्या दादांपर्यंत सगळ्यांचा समावेश आहे! येणाऱ्याला तोंड भरून 'याऽ' म्हणणें हा देहस्वभाव आणि जोडीला व्यवसायहि मरूं घातलेल्याला जगवायचा, मग तो संत असो वा पापी. त्यांतून बहुत विषयांची गोडी. सांताक्रूझला जाण्यापूर्वी पार्ल्याला त्यांचा दवाखाना होता. तो दवाखाना म्हणजे दवाखाना अधिक चावडी असें मिश्रण होतें. मी लहानपणीं त्यांच्या दवाखान्यांत औषधहि प्यालों आहे आणि समोरच्या हॉटेलांतले कटाहोष्ण बटाटेवडेहि खाल्ले आहेत. बटाटेवडे आणि भजीं खाऊन प्रकृतीला कांहीं धाड होत नाहीं, हें सांगणारा हा डॉक्टर पोरांच्यांत लोकप्रिय असावा ह्यांत नवल काय? किंबहुना उत्तम आरोग्य ह्याचा अर्थ सर्व कुपथ्यें करण्याची ताकद, हें सूत्र मी तिथेंच शिकलों. चिंताग्रस्त रोग्यांनीं भरलेला दवाखाना हंसताखेळता ठेवण्याची त्यांची पद्धति कुठल्याहि पॅथींत बसणारी नव्हे.

डॉक्टरांनीं दुर्दवाचें दशावतार पाहिले आहेत कीं नाहींत मला ठाऊक नाहीं, परंतु स्वातंत्र्याच्या एकवीस–एकतीस–बेचाळीस सगळ्या चळवळींत त्यांनीं यथेच्छ मार खाल्ला आहे. बॉम्बे सेंट्रलच्या रेल्वेपुलाखालीं राहण्याचें सुख त्यांनीं भोगलें आहे. गुप्त पत्रकें काढण्याच्या खटाटोपांत साम्राज्यशाहीच्या पोलिसांचा जाच सहन केला आहे. गांधीजींच्याबद्दल नितान्त आदर बाळगूनहि त्यांना

ज्वलंत तव अस्त्र हें नच समर्थ मी घ्यावया
क्षमस्व भगवन् म्हणूनच धरी करीं शस्त्र मी

असें विनम्र निर्धारानें सांगून 'चले जाव' चळवळींत ते पडले. पण त्याहूनहि महत्त्वाची आणि मला आवडलेली गोष्ट म्हणजे त्या राष्ट्रसेवेची वसुली करण्यासाठीं त्यांनीं स्वातंत्र्यानंतर इतर बऱ्याच श्वेतांबरधाऱ्यांप्रमाणें खऱ्या-खोट्या हुंड्या वटवून शहाजोगपणें सत्तेच्या खुर्च्या अडवल्या नाहींत. युद्धांतल्या सैनिकांनीं युद्धापुरते चढवलेले गणवेष उतरवून आपल्या नित्य कर्माला लागावें तशी डॉक्टरी करायला त्यांनीं सुरुवात केली.

डॉक्टरांच्या पायाला चक्र आहे. डोक्यांत विचारांचें चक्र आहे. अंतःकरणांत औदार्य आहे. नजरेंत सौंदर्याचा शोध आहे. त्यांच्या हातीं ताप-नळीसारखी कवीची लेखणी येते आणि चित्रकाराची तूलिकाहि! आमच्या चिमुकल्या वयांत कविता गुणगुणत प्रिस्क्रिप्शन् लिहिणारा हा पहिला डॉक्टर आम्ही पाहिला! त्यांना गाण्याचा कान आहे. 'अविदित गतयामा रात्रिरेवव्यंरंसीत' म्हणण्याचा अधिकार आहे. 'इथें सखे नि सोबती-कुणी इथें कुणी तिथें' असें सार्थ अभिमानानें म्हणावें अशी देशविदेशांत सख्यासुहृदांची जोडणी आहे. व्यवसायाच्या शिखरावर असूनहि हा माणूस माणसांतला आहे. ते अलिप्त आहेत केवळ अलिप्ततेपासून! संस्कृत भाषेंत त्यांना उत्तम गति आहे. त्यांच्या लेखनांत ह्यां व्यासंगाचे सहज पुरावे आहेत. अजूनहि सलीम अल्लींची पक्षिजीवनावरचीं पुस्तकें वाचून त्या पक्ष्यांच्या शोधांत ते भिरभिरतात. नाटकें चुकवीत नाहींत. आणि आताशा कांहींशा नाजूक झालेल्या प्रकृतीच्या अवस्थेंतहि मुंबईतल्या नरकपुऱ्यांत जाऊन तिथल्या अभाग्यांची आंसवें पुसून येतात, रात्रींबेरात्रीं त्यांना रोगमुक्त करण्यासाठीं तिथें जाऊन धडपडतात. चेहऱ्यावरचें हंसू कधीं मावळत नाहीं. उत्साहाला ओहोटीचा स्पर्श नाहीं. वाढत्या वयाचें लक्षण औषधालाहि दिसत नाहीं.

परवां बोलतां बोलतां आपल्या नातवाला आपण गोष्टी कशा रचून सांगतों हें ते सांगूं लागल्यावर मी चकरावलों! वास्तविक कुठल्याहि आजोबानें ह्यांचे कान उपटावे असला नातूपणा ह्या आजोबांत आहे! मला दया येते त्यांच्या सहधर्मचारिणीची. काशीबाई स्वतः निष्णात् भिषग्वर्या आहेत. पण हा अत्यंत 'इंपेशंट पेशंट' त्या कशा काय संभाळीत असतील त्याच जाणे!

असल्या मोकळ्या माणसाच्या प्रवासवर्णनांतून तो स्वतः कसा सुटूं शकेल? मराठींत प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार बराच काळ भूगोलाचें पाठ्यपुस्तक आणि प्रवासी खात्याची मार्गदर्शिका समप्रमाणांत खलून तयार करीत असत! वरसईकर गोडशांच्या बंडांतला प्रवास किंवा प्रा. अनंत काणेकरांचे 'धुक्यांतून लाल ताऱ्या'कडे यांसारखीं प्रवासवर्णनें अपवादरूपच होतीं. प्रवासवर्णन करणाऱ्या व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व हें खरें महत्त्वाचें. प्रवासवर्णन हा नुसता त्या प्रदेशाचा फोटो किंवा निर्जीव मॅजिक लॅंटर्न अगर माहितीपट नव्हे. विविध

संस्कारांनीं नटलेलें मानस तो देश हिंडतांना कसें फुलून आलें, कुठें कोमेजलें, कुठें उफाळलें याचें तें एक हृद्य दर्शन असावें. आणि म्हणूनच एका स्थळाचीं शेंकडों प्रवासवर्णनें होऊं शकतात. ही एक कवितेसारखीच स्वतंत्र निर्मिति आहे. डॉक्टरांनीं आसाम पाहिला तो स्वतःवर झालेल्या साऱ्या पूर्वसंस्कारांचे सुकृत सोबतीला घेऊन. इथें वाचकाला त्या आसाम आणि नागभूमीइतकेंच डॉक्टरांचेंहि दर्शन घडतें. मला प्रवासवर्णन हा आत्मचरित्राच्या फार जवळचा वाङ्मयप्रकार वाटतो. नव्या स्थळांत आलेल्या स्वानुभवांचेंच हें कथन असतें.

डॉक्टरांना नुसतींच वर्णनें करायचीं असतीं तर त्यांच्यांतल्या चित्रकार आणि गीतकारानें लौकिकार्थानें बहार उडवली असती. परंतु ह्या गृहस्थाच्या अंतःकरणांत राष्ट्रीयत्वाची-देशप्रेमाची-धर्मप्रेमाची धुनी पेटलेली आहे. स्वातंत्र्या-साठीं झालेल्या चळवळींत पेटलेले निखारे विझलेले नाहींत, म्हणूनच ते केवळ निळ्या डोंगरांच्या आणि लाल नद्यांच्या कटिखांद्यावर वाढणाऱ्या आसामी माणसांच्या निराळ्या चालीरीतींच्या किंवा पोशाखांच्या वर्णनांत गुंतून पडत नाहींत. त्यांच्या अंतःकरणांतलीं स्पंदनें तपासतात. त्यांच्या नाड्या काय वेगानें उडताहेत तें पहातात. निर्भयपणानें चिकित्सा करतात. प्रवासवर्णनाला जिवंतपणा येतो तो त्यामुळें. केवळ ' डॉक्टरसाहेबांची भाषाशैली संस्कृतप्रचुर असूनहि सुबोध आहे – वर्णनपद्धति सुरस आहे— निसर्गाचें प्रेम जागोजागीं दिसतें ' अशा शेरेबाज रीतीनें त्यांच्या प्रवासवर्णनाचा जमाखर्च मांडणें हा त्यांच्यावर अन्याय आहे. त्यांचें निसर्गप्रेम किंवा संस्कृतवाङ्मयाचें अध्ययन त्यांच्या आशयाचा गळा आवळून गेलेलें नाहीं. वाहात्या नद्यांनीं आणि निळ्या डोंगरांनीं त्यांना गहिंवर दाटायला लावलें नाहीं. उलट हिंदूंच्या प्राचीन देवालयांभोंवतालच्या कुठेंहि आढळणाऱ्या भयानक कुरूपतेचें त्यांनीं वेधक वर्णन केलें आहे. डॉक्टर गहिंवरसांप्रदायांतले संस्कृतिवालेहि नाहींत आणि चवन्नी किमतीच्या शेरोशायरीला उथळ दाद देऊन स्वतःच्या रसिकतेचा जाहीर हैदोस घालणारेहि नाहींत! तसली उपरी रसिकता येरूंना बनवायला बरी असते. जन्ममरणाचे प्रसंग एक प्राणिशास्त्रीय घटना म्हणून पहाणारी तटस्थता आणि निर्मम भूमिकेवरून करावी लागणारी चिकित्सा हें त्यांच्या वैद्यकीय जीवनांतलें नित्याचें कार्य आहे. त्यामुळेंच आसामच्या किंवा उर्वशीयमूच्या रम्य–

रम्यतर-रम्यतम वनश्रीच्या आड मनुष्यरूपेण कोणकोणतीं हिंस्त्र श्वापदें चरताहेत तीं त्यांच्या दृष्टींतून सुटत नाहींत. पाकिस्तान्यांच्या आणि मिशनऱ्यांच्या कुटिल कारवायांचें वर्णन करतांना किंवा मुसलमानांनीं भाषेच्या प्रेमाचा पान्हा फुटल्याचा आव आणून पूतनेसारखा मांडलेला डाव उघड करतांना किंवा एक राष्ट्र–एक धर्म–एक भाषा हा मंत्र ठणठणीतपणें उच्चारतांना आपल्यावर प्रतिगामी हिंदुत्वनिष्ठेचा शिक्का बसेल ही भीति त्यांना वाटत नाहीं.

राज्यकर्त्यांच्या हलगर्जीपणाचें त्यांनीं स्पष्ट शब्दांत वर्णन केलें आहे. साहित्य हें राजकारणच काय कशापासूनच अलिप्त राहूं शकत नाहीं. कशाच्याहि सहित तें जातें म्हणून साहित्य. राजकारण याचा अर्थ सत्तेच्या सिंहासनासाठीं विचकलेली किंवा वाजवलेली बत्तिशी नव्हे. कारण केवळ सत्तेसाठीं केलेली पक्षनिष्ठ चढाओढ एवढा राजकारणाचा त्रोटक अर्थ नाहीं. सत्याचा शोध घेणें हेंहि सौंदर्याचा शोध घेण्याइतकेंच साहित्याच्या कक्षेत बसतें. आज नेत्यांनीं जाणून किंवा अडाणीपणानें केलेल्या चुकांचीं फळें भोगायची पाळी आली असतांना त्या चुकांची जाणीव करून देणें, स्वतःला ती आधीं करून घेणें, इतरांना शहाणे करणें हें विचारवंत म्हणवणाऱ्या प्रत्येकाचें कर्तव्य आहे. साहित्यिकांचें तर तें धर्मकर्तव्य आहे. सगळ्यांनीं सुखानें जगावें ह्या हेतूनें भारतानें धर्मनिरपेक्ष अशी शासनपद्धति स्वीकारली. बहुसंख्य हिंदूंच्या उदार मनोवृत्तीचा जर विपरीत अर्थ लावला जात असेल तर त्या मल्लिनाथांची वेळींच पायमल्ली करणें आवश्यक आहे. डॉक्टरांच्या पुस्तकांतल्या निसर्गवर्णनापेक्षांहि हें सत्यस्थितीचें वर्णन मला अधिक आवडलें.

आज भारतीयांच्यांत दुर्दम्य राष्ट्रीय अहंकार निर्माण होणें अत्यंत आवश्यक आहे. ज्या देशांतले बहुसंख्य लोक हिंदू आहेत तिथें कुणीहि यावें आणि त्यांच्या संस्कृतीचे लचके तोडावे असला प्रकार चालू आहे. त्याला बहुतांशीं हिंदूंचें दौर्बल्यच कारणीभूत आहे. दुबळ्यांच्या मदतीला देवहि जात नाहीं. म्हणून काय एका दिव्यपरंपरेचा त्याग करायचा ? कोळिष्टकें झालीं म्हणून घर जाळायचें ? स्वजनांचा पदोपदीं तेजोभंग करून माणुसकीचे कोरडे गहिंवर काढणाऱ्या ह्या तथाकथित नेत्यांच्या बरळण्याला वेळींच पायबंद घातला नाहीं तर दुखंड भारत शतखंड होऊन जाईल. हिंदूंच्या ह्या देशांतले हिंदूधर्माचेंच अधिष्ठान गेलें. पण धर्मनिरपेक्ष शासनानें इतर धर्मीयांना धार्मिक पातळीवर

अल्पसंख्यांक म्हणून त्यांचे हवे तसे लाड चालूच ठेवले आहेत ! धर्मनिरपेक्ष ह्याचा अर्थ हिंदुधर्मनिरपेक्ष असा घ्यायचा की काय, अशी शंका, यापूर्वी कोणताहि कोता धार्मिक विचार न करणाऱ्यांनासुद्धां आतां येऊं लागली आहे. अल्प-संख्यांकांचे धार्मिक पायावरचें प्रतिनिधित्व ह्या बुद्धिनिष्ठ लोकशाहींतहि आपलें चालूच आहे ! राष्ट्रीय कायदेदेखील त्यांना संपूर्णपणें लागू नाहींत. लोकशाही याचा अर्थ हिंदूंनीं स्वाभिमानशून्यता असा घ्यायचा कीं काय ?

जगांतला प्रत्येक देश आज राष्ट्रीयत्वाचा अहंकार जागृत ठेवण्याची पराकाष्ठा करीत आहे. आमचाच देश असा अभागी कां असावा ? डॉक्टरांनीं ह्या बाबतींत ' शठांशी शठनीतीनेंच जे कोणी बुद्धिहीन वागूं शकत नाहींत त्यांच्या ललाटी पराभवच लिहिला जातो ! ' असें असंदिग्ध शब्दांत म्हटलें आहे. फुलामुलांत रमणें हें जीवनाचें एक अंग झालें, पण माणूस दिवसभर फूल एके फूल आणि मूल एके मूल करीत राहील तर त्याच्यांत कांहींतरी विकृति आहे असें म्हणावें लागेल. साहित्यिक म्हणून तर सोडूनच द्या, परंतु सुबुद्ध नागरिक म्हणून भोंवताली काय चाललें आहे तें डोळे उघडून पाहणें हा कर्तव्याचा भाग आहे. ' मला काय त्याचें ! ' हें सूत्र धोक्याचें आहे. भारताच्या शत्रूंनीं कधीं भाषाभिन्नत्वाचा आश्रय घेऊन, कधीं प्रांतीय संस्कृतीच्या आगळेपणाच्या छत्राखालीं तर कधीं धर्मस्वातंत्र्याच्या बुरख्यांत शिरून ह्या सीमाभागांत जो स्वच्छंद धुमाकूळ माजवला आहे तो, ज्यांच्या मनाचा कोळसा झाला नाहीं अशा राष्ट्रप्रेमी माणसांना अस्वस्थ करणारा आहे. आसामी हिंदुजनता ह्या भाषाप्रेमी (!) पाकिस्तान्यांच्या कारवायांना कशी बळी पडली त्याचें नवव्या प्रकरणांत डॉक्टरांनीं केलेलें वर्णन बारकाईनें वाचण्यासारखें आहे.

दुर्दैवानें ' लाहे लाहे—सावकाश सावकाश ' हा रोग फक्त आसामलाच नव्हे तर साऱ्या भारताला झाला आहे. मनें मरगळलेलीं, मनगटें न शिव-शिवणारीं, अनाचाराकडे कानाडोळा, अपरंपार ढोंग, दुटप्पीपणा असल्या पोखरलेल्या खांबावर आमचीं सिंहासनें किती काळ उभीं रहाणार ?

हा काळ भयानक चिंतेचा आहे. डॉक्टरांचें हें प्रवासवर्णन झणझणीत अंजनासारखें झालें आहे. भारतीय संस्कृतींत मुरलीधर कृष्ण योग्य वेळीं

सुरली टाकून सुदर्शनचक्रहि घेतो. आसामची कृष्णभक्ति ही नुसतीच मधुरा नाहीं. ती प्रजा मोठी युयुत्सु. पराभव न पहाणारी. दीडशें वर्षें ब्रिटिशांच्या कुटिल नीतीचे बळी म्हणून आणि आतांच्या लोकशाहीच्या शिथिल नीतीचे रुग्ण होऊन पडलेले आसामी. त्यांचें संकट म्हणजे आपलें, भारतीयांचे संकट. उभ्या भारतांत ही आपुलकी निर्माण व्हायला भारतीय लेखक-कलावंतांनीं आतां भारतांतच जाणें अधिक आवश्यक आहे! पूर्वी संतमंडळ यात्रेला निघत असे. ज्ञानदेव–नामदेवांची दिंडी महाराष्ट्रांतून पायीं पायीं चारी धामें करून ह्या विशाल राष्ट्रपुरुषाला कडकडून भेटून आली. प्रवासाच्या सोयी झालेल्या ह्या काळांत मात्र नव्या गैरसमजाच्या अभेद्य भिंती उभ्या आहेत! स्वार्थी राजकारणपटु कुशलतेनें त्या विटा रचीत आहेत. त्या खालीं पाडण्याचें काम साहित्यिक–कलावंतांखेरीज कोणी करावयाचें ?

डॉक्टर अवसऱ्यांनीं ह्या पुस्तकांत समर्थपणानें आपलें कर्तव्य पार पाडलें आहे. त्यांच्या रसिकमनाची तार पोलादी आहे म्हणूनच ती नाजूक आलापीपासून ते तार सप्तकांतल्या कणखर मींडेपर्यंत वाटेल तो स्वर ताकदीनें खेचूं शकते.

ल्हानपणीं डॉक्टरांच्या दवाखान्यांत राष्ट्रीय चळवळीच्या आणि क्रांतीच्या कथा ऐकतांना मी जितका प्रभावीत होत होतों, त्यांच्या कविता ऐकतांना गुंगत होतों, तितकाच हें पुस्तक वाचतांना रमलों. डॉक्टरांसारख्या ज्येष्ठाच्या पुस्तकाला माझ्यासारख्याच्या प्रस्तावनेची अगर पुरस्काराच्या शब्दांची आवश्यकताच नाहीं. ही प्रस्तावना नव्हे तर डॉक्टरांनीं ह्या वयांतहि जिवंत ठेवलेली ती जीवनसापेक्ष राहण्याची धुनी पाहिल्यावर, भोवतालच्या निराशाजनक परिस्थितीनें मनावर येणारी छाया दूर केल्याबद्दलचे कृतज्ञतायुक्त धन्यवाद आहेत. डॉक्टरांना आठवत नसेल पण मला आठवतें. विटीदांडू खेळतांना मला खोक पडली होती. डॉक्टरांनीं पट्टी चिटकवली आणि दवाखान्यांतून निघतांना विचारलें, " खंय् निघालस ? "

" घरीं " मी म्हणालों.

" अरे खुळो की काय तूं ? इतक्या लौकर घरीं ? अजून धा डाव होतीत– राणा संगाच्या आंगावर कितके घाव होते ठावक् आसा ना तुका ? सवायश्याच्या

वर ! येका खोकेंत घरीं ? जा–आणखी येक खोक् पाडून ये चांगलीशी ! ”

डॉक्टरांनी खोकेचें बिल् लावलें नव्हतें. खोक बुजली. आठवण कशी बुजेल ? ह्या पुस्तकांत, जीवनांत त्याच उत्साहांत नहात असलेले अवसरेडाक्टर माझी पंचेचाळिशी गाठतांना मला पुन्हां दिसले. वाचकांनाहि दिसतील अशी मला खात्री आहे.

१

लाल नदी, निळे डोंगर

धरणीकंप आणि महाप्रलय यांनीं सतत संत्रस्त असलेली भूमि आहे आसामची. नगाधिराज हिमालय " थीसिस " समुद्राच्या पोटांतून उसळी मारून वर आला, त्याची अंगभूत माती खालीं वहात येऊन हळूहळू एकत्रित झाली आणि तिच्यांतून आसामची पाषाणहीन मऊ लाल जमीन निर्माण झाली असें भूस्तरशास्त्री सांगतात. परंतु या लाल मातीवर दाटी-वाटीनें पसरलेले चहाचे मळे व ठायीं ठायीं विखुरलेलीं हिरवींगार शेतें आणि बांबूचीं सुपारीचीं बनें पहातांना मन प्रसन्न होतें आणि सहज म्हणतें कीं, कुशल चित्रकाराच्या मनांतील निळ्या, हिरव्या रंगांच्या सगळ्या छटा–रंगवून, चित्रकलेची परमावधि दिग्दर्शित करण्यासाठीं प्रत्यक्ष रंगसरस्वातीनेंच या प्रदेशाला लाल चित्रफलकाची पसंती केली असावी.

हिमालयांत मानससरोवरापाशीं जन्म पावलेला "ब्रह्मपुत्र" सरळ भारता-कडे वळला नाहीं. तिबेटच्या भूमींतून प्रथम पूर्वेकडे चालूं लागला. नंतर अचानक भानावर येऊन मागें वळला आणि आसामच्या प्रदेशांतून भारताच्या पुण्यभूमींत पावन होण्यासाठीं आंत शिरला. अजूनपर्यंत ऋषिमुनींना ज्ञात असलेल्या हिमालयाच्या गिरीदरींतून वहाणारा " सांग–पो " चा कृष्ण प्रवाह एकदम रुंद व समृद्ध होऊन आणि लोहित वर्ण घेऊन ब्रह्मपुत्राच्या रूपानें आसामच्या प्रदेशांतून बंगालच्या उपसागराकडे वळता झाला. नकाशांत पाहिलें तर डोंगराळ प्रदेश व मैदानी प्रदेश असे

आसामच्या भूमीचे जणूं दोन नैसर्गिक विभाग पाडण्यासाठींच ब्रह्मपुत्राची निळी जलरेषा चित्रित झालेली दिसते.

उत्तरेकडे भूतानला भिडलेला व त्याच्याच पश्चिमेला असलेल्या सिक्कीम व नेपाळ या देशांशीं जवळीक राखणारा आसाम भारतभंगाच्या वेळीं लॉर्ड रॅडिक्लिफच्या कपटनीतीला बळी पडला आणि पाकिस्तानच्या इस्लामी हातांनीं गळा दाबल्यासारखा, भूमीच्या एका अत्यंत अरुंद पट्टीनें हिंदुस्थानच्या बाकीच्या भूमीशीं संलग्न राहिला. जेव्हां कदाचित् युद्ध होईल तेव्हां या इतक्याशा भूमीचा ताबा घेऊन आसामचा संपूर्ण प्रांत कांहीं काल तरी भारतापासून पूर्णपणें अलग करण्याची कल्पना पाकिस्तानच्या लष्करी हुशारीला सुचणें अशक्य नाहीं. पाकिस्तानच्या हातांत आसामचा गळा देऊनच रॅडिक्लिफची कपटनीति थांबली नाहीं, तर आसाम आणखीहि हतबल राहावा अशी योजना तिनें घडवून आणली. समुद्राशीं संबंध राहिला तर युद्धकाळीं आसामला जलमार्गानें युद्धसाहित्याचा पुरवठा करणें भारताला शक्य होईल हें लक्षांत ठेवून या प्रांताचा समुद्राला लागून असलेला दक्षिण भाग म्हणजे आराकानचा डोंगराळ प्रदेश पाकिस्तानला जोडून टाकण्याची हातचलाखी तिनें घडवून आणली. औषधाला देखील एखादा मुसलमान जिथें सांपडला नसता तो आराकानचा भूमिभाग पाकिस्तानच्या इस्लामी वस्तींत कां व कसा ओढला गेला हें गूढ त्यावेळीं फारच थोड्या भारतीयांच्या लक्षांत आलें, पण आसाममध्यें फिरणाऱ्या भारतीयांच्या लक्षांत तें आज सहज येतें. गोहत्तीच्या विमानतळावर चहा घेतां घेतां एक लष्करी अंमलदार मजपाशीं सहज बोलून गेला, " चीनशीं मुकाबला करावयाला हिंदी जवान नक्कीच समर्थ आहेत, पण पाकिस्ताननें भारताच्या पाठींत खंजीर मारण्याचा बेत केला तर मात्र मामला जरा गंभीर होईल. "

पाकिस्तानला लागून असलेली आसामची सरहद्द अशी दुबळी तर ईशान्येकडे चीन, तिबेट व ब्रह्मदेश यांना भिडलेली त्याची सरहद्द त्याहूनहि दुबळी. याच बाजूनें भारतवर्षाच्या स्वातंत्र्याला सुरुंग लागण्याची शक्यता निर्माण होईल हें राजकारणपटु इंग्रजांच्याहि ध्यानांत आलें नव्हतें. आसामचा ईशान्येकडील डोंगराळ प्रदेश म्हणजेच आज चिनी आक्रमणाचा

भोग बनलेली नेफा भूमि. " नॉर्थ ईस्टर्न फ्रॉन्टीयर एजन्सी " या नांवानें आसामच्या नकाशांत चित्रित केलेला हा आसामचा भाग केवळ नांवालाच त्याचा आहे. त्यावर आसामच्या प्रांतीय सरकारची सत्ता नाहीं. तो केंद्र-शासित आहे. भाषाभिन्नत्वाची अवास्तव जोपासना करण्याचा मूर्खपणा भारतीयांच्या रक्तांतच भिनून गेला आहे जणूं. त्याचा परिपाक म्हणून आसामच्या भूमीचीं दोन शकलें झालीं आणि तेथें भिन्न भिन्न शासन-व्यवस्था ठेवण्यांत आल्या. या मूर्खपणामुळेंच भारताच्या स्वातंत्र्यासाठीं आसामच्या वेदीवर असीम बलिदान करण्यांची जरूरी आज निर्माण झाली आहे. ब्रह्मपुत्राच्या कांठाशीं राहणारी आसामची मैदानी प्रजा व हिमालयाच्या उतरत्या टेकड्यांतून राहणारी त्याची पहाडी प्रजा शेंकडों वर्षांच्या स्नेहबंधनांनीं परस्परांशीं निगडित झालेली आहे. परंतु त्यांच्या भाषा परस्परांपासून बऱ्याच भिन्न आहेत. म्हणून त्यांच्यासाठीं भिन्न प्रशासन व्यवस्था ठरविण्यांत आल्या. परिणामी ऐन युद्धकाळीं जो एक एकसूत्रीपणा सबंध प्रांतांत प्रकट व्हावयास पाहिजे होता. त्याचा मागमूसहि आसामच्या भूमीवर फिरणाऱ्या निरीक्षकाला आढळत नाहीं. " केवळ भाषाभिन्नत्वच नव्हे तर भौगोलिक आणि सांस्कृतिक जीवनांतहि अपार भिन्नत्व आहे! त्यामुळें या प्रजांत अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत! आणि त्या वेगवेगळ्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीनेंहि आसामचीं दोन शकलें करणें भाग पडलें आहे!" असें भारताच्या शासनयंत्रणेकडून प्रत्यहीं सांगितलें जातें. परंतु या म्हणण्यांत नवीन समस्यांना तोंड देण्यापेक्षां " जैसे थे "चा आधार घेण्याचीच मनोवृत्ति अधिक आढळून येते.

इंग्रजी अमदानींत आसामचा पहाडी विभाग पोलिटिकल एजन्टसच्या देखरेखीखालीं असे. त्यावेळीं या प्रांताला कुठल्याच बाजूनें भय नव्हतें. शिवाय सृष्टिसौंदर्य, शिकारीची सोय, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र व भूस्तरशास्त्र यांच्या अभ्यासाची जागा अशा अनेक दृष्टींनीं आसामचा पहाडी प्रदेश इंग्रजांना विशेष प्रिय होता. तेव्हां आपलें राखीव कुरण आपणाला सहजीं मोकळें राहावें म्हणून त्यांनीं आसामचा पहाडी प्रदेश बाकीच्या भूमीपासून अलग करून इंग्रज अधिकाऱ्यांच्या हातांत ठेवला. या परिसरांत तिबेटी आणि ब्राह्मी भाषांशीं साम्य असलेल्या खासी, डाफला वगैरे भाषा

बोलणाऱ्या अनेक पहाडी टोळ्या वस्ती करून आहेत. त्यांच्यामध्यें ख्रिश्चन धर्माचा प्रसार करून त्यांच्यातील भारतीय संस्कृति व राष्ट्रीयत्वाची जाणीव या दोहोंचेंहि उच्चाटन करण्याचा जुना खेळ खेळण्याच्या दृष्टीनें परकीय इंग्रज मिशनऱ्यांना हा निसर्गरमणीय प्रदेश फार सोईचा होता.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इंग्रजी अमदानींतील परिस्थिति संपूर्णपणें बदलली. आसामचा हा पहाडी विभाग आतां केवळ राजकर्त्यांच्या चैनीसाठीं राखून ठेवलेलें एक क्रीडांगण म्हणून राहिला नाहीं. तो आसामचा व पर्यायानें भारताचाहि एक अविभाज्य अंगभूत भाग झाला. चीननें तिबेटचा ताबा घेतल्याबरोबर भारताच्या लोकशाहीशीं टक्कर देऊं पाहणाऱ्या साम्यवादी शत्रूंची काळी छाया याच प्रदेशावर प्रथम पडली. साहजिकच संरक्षणाच्या दृष्टीनें हा भाग सबंध आसामचा आणि भारताचाही अत्यंत महत्त्वाचा सरहद्दीचा भाग बनला.

पाकिस्तान, चीन व ब्रह्मदेश यांनीं जवळ जवळ सर्व बाजूंनीं वेढला गेलेला आसाम भारताच्या मजबुतीच्या दृष्टीनें, आर्थिक दृष्ट्या व लष्करी दृष्ट्या अत्यंत स्वयंपूर्ण व कार्यक्षम असावयास पाहिजे. आसामचें खरें महत्त्व त्याच्या भौगोलिक परिस्थितीशीं निगडित आहे. आणि ही एक अत्यंत महत्त्वाची अशी गोष्ट आहे.

कोठलाहि प्रांत अथवा प्रदेश लष्करी दृष्ट्या मजबूत किंवा बलवान ठेवावयाचा असेल तर मुख्यतः दोन गोष्टींकडे लक्ष पुरवावें लागतें. पहिली गोष्ट म्हणजे लष्करी साहित्याची अखंडित सुकर हालचाल. यासाठीं अनेक रस्ते, नदीनाल्यांवरील पूल, लष्करी साहित्याच्या संरक्षित जागा व सरहद्दीवरील व आंतीलहि, सतत पहारा राखणारीं परस्परसंबंधीं मजबूत ठाणीं या सर्वांचें एक जाळेंच काळजीपूर्वक पसरावें लागतें. दुसरी गोष्ट त्या प्रांतांतील अथवा प्रदेशांतील प्रजेची मानसिक तयारी. वंश, भाषा, धर्म, जाति अशा गोष्टींनीं निरनिराळ्या प्रजा अलग पडलेल्या असतात. या सर्वच प्रजा प्रसंगीं आपापसांतील सर्व मतभेद विसरून, राष्ट्रप्रेमाच्या एकाच प्रखर भावनेनें एकसंध होऊन युद्धतत्पर राहतील अशी स्थिति निर्माण करावी लागते व त्यासाठींच सबंध प्रजेची बौद्धिक पातळी वाढेल अशी शिक्षणव्यवस्था करावी लागते. आसाममध्यें व त्याहूनहि आसामच्या

पहाडी विभागांत या दोन्हींहि गोष्टी कोणी प्रयत्नपूर्वक हाताळल्याचें दिसून येत नाहा. आसामच्या रणांगणीय सीमावर अमित्रांची जमावट झाली आहे व आसामची अंतर्गत स्थिति प्रतिकारक्षम बनलेली नाहीं. अजूनहि सीमेकडे घोडदौड करतां येईल इतके रस्ते आसाममध्यें नाहींत. आसामांतील पहाडी खिश्चन प्रजेला चिनी आपले शत्रु आहेत हे कळायला भारताच्या पंतप्रधानांच्या वचनापेक्षां रोमहून किंवा परकी पाद्यांकडून आलेल्या फतव्याची जरूर लागते. आसामांतील इस्लामी प्रजा तर पाकिस्तानकडे तोंड करून नमाज पढते. असामच्या असीम सुंदर वनश्रीनें नटलेल्या पहाडी मुलखांत स्वछंद फिरतांना अनेक वेळां मनांत आलें कीं, धर्माच्या नांवाखालीं देशाच्या अंतर्गत कारभारांत परक्याला ढवळाढवळ करूं देणारी प्रजा प्रयत्नपूर्वक राष्ट्रीय मनोवृत्तीची बनविली पाहिजे. आसामचा पहाडी मुलूख केंद्रशासित ठेवण्याचें इंग्रजांचें अनुकरण करण्यापेक्षां आपलें स्वतंत्र चर्चच निर्माण करून पोपला देशाच्या अंतर्गत कारभारांत क्षणोक्षणीं ढवळाढवळ करण्याची बंदी करणाऱ्या इंग्रजांच्या दूरदर्शी व स्वाभिमानी राजनीतीचें अनुकरण करण्याची शक्ति भारताच्या केंद्रानें दाखविली तर किती बरें होईल !

२

आसामची अपराजित जनता

आसामच्या सरहद्दीवर चिनी आक्रमणाच्या रूपानें आज युद्धाचीं अभ्रें जमूं लागलीं आहेत. आसामच्या भूमीवरहि युद्धाचीं वादळें अनेक वेळां नाचून गेलीं आहेत. इतिहास सांगतो कीं, या भूमीला पराभवापेक्षां विजयाचीच संवय अधिक आहे. ज्यांच्या सत्तेमुळें या भूमीला आसाम हें नांव मिळालें त्या " अहोम् " नृपतीच्या कारकीर्दींतच मोगलांनीं चौदा वेळां हा प्रदेश जिंकून घेण्याचा प्रयत्न केला आणि चौदाहि वेळां पराजय स्वीकारून रणभूमीला पाठ दाखविली. मोगल सम्राट् औरंगजेबानें मराठ्यांशीं लढतांना आपलें सर्वस्व पणास लावलें आणि सर्वस्व गमावलें. आसाममध्येंहि त्याला तोच अनुभव आला. त्याचा सेनापति मीर जुमला संपूर्ण तयारी-निशीं सर्वस्व पणास लावून आसामवर चालून आला आणि अंतीं पराभव पावून अपमानित व दुःखित होऊन परत गेला.

आसामी भाषेंत आसामचा उच्चार " ऑखॉम् " असा केला जातो. अहोम् या शब्दाचाच हा अपभ्रंश आहे व त्या शब्दावरूनच 'अहोद' च्या राज्यविस्ताराला " ऑखॉम " असें नांव प्राप्त झालें असें इतिहासकारांचें म्हणणें आहे. मात्र स्वतः " अहोम् " राजांनीं या प्रदेशाचें नांव मुंगदुम चुं खाम अथवा सोनेरी वनश्रीचा प्रदेश असें ठेविलें होतें. काश्मीर, कोकण, केरळ इत्यादि भारतांतले अनेक प्रदेश आपापल्या परीनें सौंदर्याची परिसीमा गांठतात; परंतु आसाम अगदीं वेगळाच प्रदेश आहे. त्यांची सुवर्णमाधुरी अकल्पनीय आहे. मावळत्या सूर्याच्या प्रकाशांत ब्रह्मपुत्राच्या काठानें फिरतां

फिरतां आकाशाच्या निळसर पार्श्वभूमीवर बांबूंच्या व सुपारीच्या शेंड्याच्या तरल सोनेरी छाया, पिकून पिवळ्या होणाऱ्या भातशेतीशीं मिळून जात आहेत. मधूनच संध्यारंगानें न्हाऊन निघालेल्या बगळ्यांच्या सोनेरी पंखांच्या उडत्या रेषा भातशेतीच्या बांधावरूनच मधून मधून इंद्रधनूच्या पिवळ्या फुलांचे पुंजके कुबेरानें आपल्या भांडारांतील साऱ्या सुवर्णमुद्रा इतस्ततः उधळून दिल्यासारखे विखुरले आहेत असें सोनेरी दृश्य पाहून मलाहि 'अहोम्' नृपतीसारखें आनंदानें म्हणावेंसें वाटलें खरोखरच सोनेरी वनश्रीचा प्रदेश आहे हा ! याची सुवर्णमाधुरी वेड लावणारी आहे.

इरावतीच्या परिसरांतून आलेल्या "अहोम" ची कारकीर्द बाराव्या शतकांत सुरू झाली. आसामच्या इतिहासाची तत्पूर्वीचीं पानें चाळूं लागलें तर एका अत्यंत नवलपूर्ण घटनेचें चित्र नजरेसमोर तरळूं लागतें. ती घटना सहाव्या शतकांत घडली. या शतकांत तीन पराक्रमी तेजस्वी राजे एकाच वेळीं भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांत राज्य करीत होते. आसामचा अथवा त्या वेळच्या कामरूपचा राजा भास्करवर्मा, कनौजचा राजा हर्षवर्धन व गौड प्रदेशाचा राजा शशांक गुप्त हे ते तीन राजे. हे तिन्हीहि राजे परस्परांवर मात करून एकमेकांचें राज्य जिंकण्याच्या प्रयत्नांत होते. त्यांत आसामनृपति भास्करवर्मा व गौडनरेश शशांक गुप्त यांच्यामध्यें ब्रह्मपुत्राच्या विशाल सलिलपटावर भारतांतलें पहिलें नौकायुद्ध खेळलें गेलें. आपला वडील बंधु राज्यवर्धन यास शशांक गुप्तनें ठार मारलें म्हणून क्रुद्ध झालेल्या हर्षवर्धनानेंहि या युद्धांत भाग घेतला व भास्करवर्म्याला शशांक गुप्ताच्या प्रचंड नौकादलाचा पराभव करण्यास मदत केली. इतिहासांतील अस्पष्ट पानें जुळवून साकार केलेली ही सर्व कथा कितपत सत्य आहे हें सांगणें कठीण असलें तरी एक गोष्ट निश्चित कीं, सहाव्या शतकांत एक प्रचंड नौकायुद्ध कामरूप देशांतील ब्रह्मपुत्राच्या जलपटावर खेळलें गेलें व तेंच भारताच्या इतिहासांतील पहिलें नौकायुद्ध. या युद्धांतहि विजयश्रीनें आसामलाच माळ घातली. सहाव्या शतकापूर्वीची आसामच्या इतिहासाचीं कांहीं अस्पष्ट रेखाचित्रें कालिकापुराण, योगिनी तंत्र इत्यादि ग्रंथांतून आढळतात. त्यावरून आसामचा प्रदेश पूर्वीं प्राग्ज्योतिषपूर या नांवानें ओळखला जात असे असें दिसतें. कुणी एक "नारक" नांवाचा प्रतापी



कामाख्या टेकडीवरून दिसणारा ब्रह्मपुत्राचा पट

राजा होता त्याला खगोलविद्येची आवड होती. ब्रह्मपुत्राच्या किनाऱ्यावर असलेल्या चित्राचल नांवाच्या टेकडीवर त्यानें नवग्रहांचें एक मंदिर बांधलें व तिथें आपल्या खगोल विद्येच्या अभ्यासाची सोय केली. चित्राचलाच्याच आजूबाजूच्या प्रदेशांत त्यानें आपली राजधानी स्थापली आणि तिला "प्राग्ज्योतिषपूर" म्हणजे "पूर्वेकडील खगोल विद्येच्या अभ्यासाचें शहर" असें नांव दिलें. त्याच्या राजधानीच्या नांवावरुनच त्याच्या अमलाखालीं असलेल्या प्रदेशाला लोक प्राग्ज्योतिषपूर या नांवानें संबोधूं लागले. आज-आसामचें प्रवेशद्वार असलेलें आणि ब्रह्मपुत्राच्या तीरावर वसलेलें गोहाटी शहर हें राजा नारकाचें प्राग्ज्योतिषपूर असें इतिहासतज्ज्ञ मानतात. आजहि गोहाटी शहारांत असलेल्या चित्राचलाच्या टेकडीवर काळाच्या कठोर आघातांशीं टक्कर देत नवग्रहांचें मंदिर उभें आहे.

आसामच्या प्राचीन जीवनाच्या तेजोरेषा अशा अस्पष्ट होत इतिहासाच्या उदरांत लुप्त झाल्या आहेत. तरीहि त्याच्या अस्तित्वाची आणखी एक तेजःशलाका भारताच्या एका अत्यंत उज्ज्वल अशा इतिहासग्रंथांत म्हणजे महाभारतांत आढळते. पराक्रमी पार्थाची प्रणयभूमि म्हणून व रणधुरंधर बभ्रवाहनाची पराक्रमभूमि म्हणून महाभारतांत कामरूपचा उल्लेख केला गेला आहे. मणिपूरची राजकन्या चित्रांगदा ती कृष्णामित्र अर्जुनाची पहिली प्रणयिनी. माझी नक्की खात्री आहे कीं, आर्यकुमार अर्जुनानेंच आपल्या प्रेयसीचें हें असें सुंदर व सार्थ संस्कृत नांव ठेवलें. आसामच्या प्रवासांत माझ्याबरोबर असलेल्या मैत्रिणीनें, मणिपूरच्या ललनांनीं हातमागावर विणलेली आणि अत्यंत सुंदर अशा चित्रविचित्र बहुरंगी कापडाची शाल अंगावर घेऊन जेव्हां आरशांत पाहिलें तेव्हां तिला 'चित्रांगिनी' म्हणून संबोधण्याचा मोह मलाहि आवरला नाहीं. आपला पुत्र बभ्रुवाहन व आपली जीवनसाधना कृष्णभक्ति यांना मागें ठेवून अर्जुनानें चित्रांगदेच्या मणिपुराहून प्रयाण केलें. साहजिकच आहे; पराक्रमी पुरुषांचीं पावलें एकाच ठिकाणीं कधींच खिळून राहत नाहींत.

धनुर्धारी पार्थाची दुसरी प्रणयिने नागकन्या उलूपी. घनदाट वनांनीं गगनचुंबी गिरिशृंगांनीं आणि नृत्यांगनेसमान नाचत उसळत धांवणाऱ्या जलौघांनीं सुशोभित झालेल्या कामरूपची निसर्गश्री निरखीत एकाकी अर्जुन

नागभूमींत शिरला. तिथेंच त्याला नागफणेसारखा रुंदट चेहरा असलेली आणि हसतां हसतां सहज अर्धोन्मीलित होणाऱ्या डोळ्यांतून नागिणीच्या नेत्रांतली मोहिनी घालून विद्ध करणारी एक नागकन्या आढळली. जलौघाच्या उसळत्या फेनराशींत लपून ती आपलेंच निरीक्षण करीत आहे असें जेव्हां अर्जुनानें पाहिलें तेव्हां ज्ञातास्वाद अशा त्याचें पाऊल तिथेंच घोटाळलें. आणि दोन भिन्न वंशांच्या प्रणयाकुल एकीकरणाची गाथा गुंफली गेली.

दिग्विजयार्थ निघालेला पांडवांचा यज्ञवारु हस्तिनापुरांतून बाहेर पडला. त्याच्या संरक्षणार्थ महाप्रतापी अर्जुन सुसज्ज सैन्य घेऊन मागोमाग निघाला. पर्वतराजि ओलांडीत, नद्या पार करीत, नाना देश उल्लंघीत अश्व स्वच्छंदपणें जात होता. मार्गांत बहुतेक राजांनीं आपखुशीनें युधिष्ठिराचें मांडलिकत्व पत्करून खंडणी अर्पण केली. ज्या नरेशांनीं पांडवांचें अधिपत्य स्वीकारण्याचें नाकारलें त्यांना युद्धांत जिंकून अर्जुनानें त्यांच्याकडून करभार वसूल केला. फिरत फिरत अश्व कामरूप प्रदेशांतील मणिपूर राज्यांत शिरला. चित्रांगदेचा पुत्र वीर बभ्रुवाहन तिथें राज्य करीत होता. अश्वासह पिता राज्यांत प्रवेश करीत असल्याची बातमी अनुचरांकडून मिळतांच घाई घाईनें तो पित्याला सामोरा गेला. परंतु प्रथम भेटीलाच पित्याच्या चेहऱ्यावरील रोष पाहून त्याला आश्चर्य वाटलें. तरीहि नम्रपणें अभिवादन करून तो बापासमोर उभा राहिला. तेव्हां किंचित् कठोर आवाजांत पांडव म्हणाला, " अरे, तुझ्या राज्यांत मी ससैन्य शिरत असतांना राजनीति विसरून माझें स्वागत कसलें करतोस ? " " अस्से ! मग मी काय करावें असें वाटतें आपल्याला ? " अत्यंत नम्रपणें बभ्रुवाहनानें विचारलें. " युद्ध. " पार्थानें उत्तर दिलें. " ठीक आहे. " रथावर पुनरपि चढत बभ्रुवाहन म्हणाला, " तात पुत्राला योग्य अशाच रीतीनें मी तुमच्याशीं वागलों असेन, सुपुत्राला योग्य अशाच रीतीने मी माझ्या मातेची सेवा केली असेल आणि अत्यंत निष्काम बुद्धीनें मी जर भगवान् श्रीकृष्णाची पूजा केली असेल तर जन्मभूमीची अस्मिता अविच्छिन्न राहण्यासाठीं विश्वविजयी पित्याचा पराभव माझ्या हातून याच मणिपूरच्या समरांगणावर होवो ! "

क्षणांत बभ्रुवाहनाचें अचूक शरसंधान सुरू झालें व अर्जुनाच्या सिद्धहस्त धनुष्याचा टणत्कार रणभूमीवर घुमूं लागला. पांडवसेनेला लवकरच कळून चुकलें की मणिपुरांतहि शूरांचें वास्तव्य आहे. ध्यानीं मनीं नसतां बभ्रुवाहनाच्या शरसंधानानें महाप्रतापी पाण्डव मूर्च्छित होऊन धरणीवर कोसळला. हां हां म्हणतां ती वार्ता चित्रांगदेच्या महालापर्यंत पाहोंचली. तव्हां ती धांवतच रणक्षेत्रावर आली आणि पुत्राला दोष देत विह्वल स्वरांत म्हणाली " वत्सा, तूं हें काय केलेंस ? " त्याच वेळीं एक स्त्री तिच्या मागें येऊन उभी राहिली व हंसत हंसत म्हणाली, " क्षत्रियाला साजेसेंच वर्तन केलें त्यानें. त्याला कां दोष देतेस तूं? चित्रांगदा चमकून मागें वळली व म्हणाली, "तूं कोण आहेस ?" उत्तर आलें, ' मी नागकन्या उलूपी, महारथी पार्थाची पत्नी. " हें ऐकतांच चित्रांगदा दुःखातिशयानें म्हणाली, "अग, पहा ना आपल्या दोघींचाहि पति रणांत मृत होऊन पडला आहे ! आणि अर्जुनाच्या निश्चल शरीराजवळ बसून ती धाय मोकलून रडूं लागली. बभ्रुवाहनालाहि आपल्या हातून पित्याचा वध झाला म्हणून असीम दुःख झालें. तोंच उलूपी पुन्हां हंसून म्हणाली, " चित्रांगदे, ऐक, पराक्रमी अर्जुनाला रणांगणावर मृत्यु येणें कधींच शक्य नाहीं." "मग हे असे मृतवत् कां पडले आहेत? " चित्रांगदेनें विचारलें. तिच्या या प्रश्नाला उलूपीनें उत्तर दिलें. " चित्रांगदे, या रणधुरंधराच्या युद्धशक्तीपेक्षां मातृभक्त व कृष्णभक्त अशा तुझ्या पुत्रांचें आपल्या जन्मभूमीवरील प्रेम अधिक बलशाली ठरलें. " मग हे उठतील तरी कसे ? " चित्रांगदेनें विचारलें, उलूपीनें आपल्या नागकुलांतील संजीवनमणि बभ्रवाहनापाशीं दिला आणि म्हटलें " पुत्रा, हा मणि या महापुरुषाच्या कपाळावर ठेव म्हणजे तो उठून बसेल ! " बभ्रुवाहनानें तसें केलें व क्षणार्धांत सावध होऊन अर्जुन उठून बसला. पितापुत्रांच्या मीलनाची कथा महत्त्वाची नाहीं. परंतु रणभूमीवर विजयश्री जिंकून घेण्याची आसामची परंपरा थेट महाभारत काळापर्यंत पोहोंचते, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. अर्जुनानें दिलेला व बभ्रुवाहनानें जतन केलेला कृष्णभक्तीचा वारसाहि अव्याहतपणें आजतागायत मणिपुरांत चालू आहे. मणिपुरांतील बहुसंख्य लोक वैष्णव आहेत आणि सबंध भारतवर्षांत प्रशंसा पावलेलें मणिपुरी नृत्यहि भगवान् श्रीकृष्णाच्या रासलीलेभोंवतींच बरेंचसें गुंफलेलें आहे. प्रवास करणाऱ्या

निरीक्षकाच्या हातांतील आसामच्या इतिहासाची सोनेरी वाळू अशी हळूहळू सरकून जाते आणि भूतकालच्या स्वप्नभूमींत वावरणारें त्याचें मन वर्तमानकाळाच्या दरवाजांत येऊन खाडकन् जागें होतें. प्राचीन काळीं अर्जुनासारखे धाडसी प्रवासी आसामला पायीं अथवा घोड्यावर बसून जात असावेत. वर्तमानकाळीं प्रवासी आसामला जातात ते विमानानें अथवा आगगाडीनें. कलकत्त्याहून विमान थेट आसामच्या प्रवेशद्वारींच गोहाटीला जाऊं शकतें. अर्थात् कांहीं काळ त्याला पाकिस्तानांत गेलेल्या भारतीय मुलुखावरून उडावें लागतें. आकाशांतून खालीं पाहिलें तर पद्मा, 'मेघना' मधुमति इत्यादी गंगेच्या अनेक उपवाहिन्या पाकिस्तानी प्रदेशांतून समुद्रांत प्रवेश करतांना दिसतात. जणु पाताळांतून वर येऊन ऊन्ह खाण्यासाठीं भूमीवर अस्ताव्यस्त पसरलेल्या रुपेरी नागकन्याच. या नागकन्यांचा अथवा गंगेच्या उपवाहिन्यांचा प्रदेश खरोखरच अत्यंत जहरी सापांनीं व्यापलेला आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा इत्यादि हिमालयोद्भव नद्यांना जेव्हां प्रचंड पूर येतात तेव्हां त्यांच्या कांठांवरील जंगलांत आढळणारे नाना सर्प फार दूरवरून वहात येऊन पुराच्या पाण्याबरोबर सुंदर व नव्या पाकिस्तानी प्रदेशांत शिरतात.

आसामला संलग्न असलेल्या बंगालच्या चिंचोळ्या प्रदेशांतून जाणारा आगगाडीचा मार्ग आसामला बाकी भारताशीं जोडतो. या मार्गावरून मिटरगेजच्या डब्यांत बसून मी सिलीगुडीहून अमीनगांवपर्यंतचा एका रात्रीचा प्रवास केला. मला वाटतें हा प्रवास यशस्वी रीतीनें पुरा करणारा माणूस यमपुरीदेखील एका उडींत उल्लंघून जाईल ! अमीनगांवला उतरल्या-वर मात्र समोरच ब्रह्मपुत्राचा विशाल सलिलपट पाहून मनांतला संताप आणि शरीराचा शीण दोन्हीहि विलुप्त झाली. गोहाटीला जाण्यासाठीं अमीनगांवहून ब्रह्मपुत्राचें पात्र ओलांडून पलीकडे पांडूला जावें लागतें. तिथून जवळच पांच मैलांवर गोहाटी शहर आहे. अद्यतन आणि पुरातन अशा सर्व तऱ्हेच्या नौकांचा वावर ब्रह्मपुत्राच्या विस्तृत पात्रावर प्रत्यहीं चालू असतो. अमीनगांवाहून पांडूला जाणारी लॉंचसुद्धां त्या मानानें मोठी असते व एकाच वेळीं ती बरेच उतारू घेऊन जाते. ब्रह्मपुत्रांतून वावरणाऱ्या मोठमोठ्या नौकांचा तळ मात्र सपाट असतो. कारण त्याचें पात्र रुंद असलें

तरी सर्वच ठिकाणीं खोल असतेंच असें नाहीं आणि जिथें तें खोल नसतें तिथें नौका तळच्या वाळूंत घुसून बसण्याची शक्यता असते. पात्रावर लग्न-घरांतील बायकांप्रमाणें इकडून तिकडे वावरणाऱ्या नौकांमधूनच कित्येकदां कोलांट्या उड्या मारीत जलक्रीडा करणारे मोठे " शिशुमार " मासे पाहिल्यावर आपण भरदर्यात तर नाहीं ना असा भास होतो. खरें पाहूं गेलें तर ब्रह्मपुत्राच्या गोड्या पाण्यांत खेळणारे हे " शिशुमार " मासे नसून सस्तन प्राणी आहेत. परंतु प्रथमदर्शनीं निरखून पाहिलें नाहीं तर ते मासे आहेत असें वाटतें. ब्रह्मपुत्राच्या जलपटाप्रमाणें त्याचा पुलिनटतहि नयनरम्य आहे. अमीनगांवहून पलीकडे पांडूला जाणाऱ्या लाँचसाठीं कांहीं वेळ थांबलों होतों मी. तेवढ्यांत शेपटी वर-खालीं हलवीत परीट पक्ष्यांचें एक जोडपें समोरून धांवत गेलें आणि विद्यार्थ्यांवर रागावून कर्कश स्वरांत कां ? कां ? म्हणून विचारणाऱ्या म्हाताऱ्या पंतोजीसारखा कां ? कां ? म्हणत एक डोमकावळा त्यांच्या मागोमाग उडाला. क्षण दोन क्षण गेले नाहींत तेवढ्यांत पाण कव्व्यांचा एक थवा मागच्या उंच झाडांवरून उडून खालीं आला, आणि बघतां बघतां पाण्याच्या पृष्ठभागावरून पाण्यांत अदृश्य झाला. आकाशांत वेगानें उडणाऱ्या विमानाचें पटकन् पाणबुडींत रूपांतर झालें तर किती नवल वाटेल ! पण पक्षिसृष्टींत दुरून किंचित् लांब मानेच्या कावळ्यासारखा दिसणारा पाणकव्वा ही चमत्कृति प्रत्यहीं दाखवीत असतो. तो पोटाशीं पाय घेऊन उडूं लागला कीं, एखाद्या रेषाबद्ध विमानाइतकाच सुंदर दिसतो आणि त्याच्यावर नजर ठरण्यापूर्वींच सट्कन पाण्यांत बुडून जातो. नंतर एखाद्या पाणबुडीच्या वेगानेंच पाण्याखालीं पाठलाग करून माशाची शिकार करतो व मग पाण्याबाहेर येऊन चोंचींत धरलेला मासा वर उडवून त्याला उभा गिळतो.

ब्रह्मपुत्राच्या जलमार्गानेंच इतर भारताशीं आसामचा बहुतेक व्यापार चालू असतो. रेल्वे व रस्ता यांवरून होणारा व्यापार त्या मानानें फारच अल्प. कलकत्त्याहून निघालेली मालवाहू बोट गंगा-ब्रह्मपुत्राच्या पाण्यांतून वळणें वळसे घेत सरळ गोहाटीला पोहोंचते. पण किती दिवसांनीं ? थेट पंधरा दिवसांनंतर ! पांडूला ब्रह्मपुत्राच्या तीरावरच मी पहिला आसामी शब्द शिकलों. 'लाहे-लाहे' सावकाश. सावकाश बस्स ! कलकत्त्याहून

निघालेली बोट लाहे लाहे चालत असते, मधें कुठेंच न थांबतां मधल्या कुठल्याच बंदरांत माल न उतरतां भरपूर पंधरा दिवसांनंतर लाहे-लाहे गोहाटीला येते. चार-पांच दिवसांच्या प्रवासाला तब्बल पंधरा दिवसांवर वेळ घेऊन. या जलमार्गांवरील वाहतुकीचीं एक मोठी गंमत आहे. कलकत्ता-गोहाटीला जाणारीं सगळीं जहाजें भारतीय कंपन्यांचीं आहेत. परंतु बहुतेक खलाशी मात्र डाक्का-चितगांव वगैरे ठिकाणांहून येणारे पाकिस्तानी मुसलमान आहेत ! या सर्व खलाशांची नेमणूक करणारें नोंदणी दप्तर कलकत्त्यांत आहे, तर त्यांच्या ट्रेड युनियनची कचेरी पाकिस्तानांत आहे. या पाकिस्तानच्या खलाशांकडून नुकताच एक संप करविला गेला. ऐन मोक्याच्या वेळीं आसाममध्यें लढाईची नांदी सुरू व्हावयाच्या समयीं पाकिस्तानी खलाशांनीं कॉम्युनिस्ट ट्रेड युनियनच्या चिथावणीनें संप केला व जलमार्ग पाकिस्तानी प्रदेशांतून जातो या सबबीवर पाकिस्ताननें कित्येक जहाजें कित्येक दिवस अडकवून धरलीं ! कोट्यावधि रुपयांचा माल आसामला वेळेवर न पोहोंचतां मध्येंच अडकून पडला. व आसामच्या नाड्या आंखडण्याची वेळ आली. भारतानें नेहमींप्रमाणें पाकिस्तानला निषेध खलिता पाठविला कीं, संपूर्णपणें भारतीय कंपन्यांचा भारताच्याच दोन बंदरांतला व्यापार असल्यामुळें पाकिस्तानला त्यांच्या वाहतुकींत ढवळा-ढवळ करण्याचा हक्क नाहीं. शिवाय जहाजें पाकिस्तानच्या कुठल्याहि बंदरांत आसरा घेत नाहींत त्या अर्थीं पाकिस्ताननें त्यांना अडकवून ठेवणें योग्य नव्हे. पण पाकिस्ताननें त्या निषेधाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. निषेधखलित्याच्या कागदी घोड्याला शस्त्रांचे दांत नसतील तर त्याला कचरापेटीची पागाच दाखविली जाते. उद्यां कदाचित् पाकिस्तान तीं जहाजें सोडूनहि देईल, परंतु तत्पूर्वीं कित्येक लाखांचें जबर नुकसान होऊन गेलेलें असणार ! या प्रकरणानतर भारत सरकारनें खलाशांना शिक्षण देणारें एक विद्यालय नुकतेंच कलकत्त्यांत उघडलें आहे ! ब्रह्मपुत्रावरील जल-वाहतुकीची कथा अशी विचित्र आहे.

३

आसामच्या सांस्कृतिक परंपरेची झलक

प्राचीन प्राग्ज्योतिषपूर– आजचें गोहाटी. आसामचे प्रवेशद्वार ब्रह्मपुत्राच्या तीरावर वसलें आहे. उंचावरून पाहिलें तर हें शहर फार नयनरम्य वाटतें. सभोंवार वर्तुळाकार पसरलेल्या निळसर हिरव्या टेकड्या व त्यांच्यामध्येंच वसलेलें शहर. निळ्या पाकळ्यांच्या कमळांत पंख थरथरवीत नुकताच अलगत बसलेला भुंगा जणूं ! लागूनच ब्रह्मपुत्राचा जलौघ. शुभ्र सुंदर आणि विशाल. त्याच्या पलीकडचा कांठ परावर्तित होणाऱ्या सूर्यकिरणांत धूसर, रुपेरी-निळसर असा. आणि त्याच्याहि पलीकडे दूर दूर असलेल्या हिमालयाच्या आलिंगनांत अस्पष्ट अदृश्य होणाऱ्या मेघवर्णी टेकड्यांची कतार. असा अप्रतिम, स्मृतिपटलावरून कधींही पुसून जाणे शक्य नाहीं असा देखावा, नीलाचलावरील कामाख्या देवीच्या मंदिराला डावलून थेट शिखरावरील कातळावर जाऊन उभें राहिलें कीं दिसतो.

नीलाचलावरील कामख्या मंदिर फार पुरातन आहे असें सांगितलें जातें. परंतु आपल्या देवस्थानाच्या डागडुजीकडे व स्वच्छतेकडे तिळमात्र लक्ष न देतां, येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाकडे लाचारीनें देवाच्या नांवावर पैसे मागणाऱ्या हिंदू पुजाऱ्यांची जात, जोपर्यंत आस्तित्वांत आहे तोंपर्यंत कुठलेंहि देवालय शें-दीडशें वर्षांपेक्षां अधिक काळ आपल्या पायावर उभें आहे या म्हणण्यावर विश्वासच बसूं शकत नाहीं. केवळ कांहीं डागडुजी नसल्यामुळेंच तें जमीनदोस्त अथवा छिन्नभिन्न होणार ! कौरव-पांडवांच्या

लढाईत प्राग्ज्योतिषचा राजा भगदत्त दुर्योधनाच्या बाजूनें ससैन्य लढत होता. त्याचा पिता नरकासुर यानें हे कामाख्या मंदिर बांधलें व तें महाभारताइतकेंच प्राचीन आहे असें देवालयाच्या सेवेंतले लोक सांगतात. इतकेंच नव्हे तर गोहाटीच्या परिसरांतील चित्राचलावर असलेलें नवग्रह मंदिर व नीलाचलावर असलेलें कामाख्या मंदिर हीं दोन्हींहि महाभारत-काळीं श्रीकृष्णाच्या हातून मृत्यु पावलेल्या नरकासुरानेंच बांधलीं अशी हकीगत मी एका वृद्ध पुजाऱ्याच्या तोंडून ऐकली ! खगोलविद्येचा अभ्यासू नारक राजा व श्रीकृष्णाच्या हातून मृत्यु पावलेला नरकासुर एकच कीं काय हें सांगणें कठिण आहे. पण भूकंपानें सतत सतावलेल्या आसामच्या भूमींत एक मंदिर पांच हजार वर्षांचें जुनें आहे यावर विश्वास ठेवणारे हजारों भाविक पुजाऱ्यांचा योगक्षेम चालविण्यास मदत करतात हें मात्र खरें आहे ! आणखीहि एक नवलकथा ऐकावयास मिळाली ती अशी : याच नीला-चलावर भगवान् शशिमौलि तपश्चर्या करीत होते. हिमालय-कन्यका पार्वती त्यांच्या सेवेसाठीं आली होती. देवांनीं आगाऊ ठरविल्याप्रमाणें कामदेवानें त्यांच्यावर शरवर्षाव केला. ध्यानमग्न चंद्रमौलि चलितचित्त झाले आणि तपश्चर्येंत विघ्न येऊं लागलें म्हणून आपला तृतीय नेत्र उघडून त्यांनीं कामदेवाकडे पाहिलें. विश्वसंहारक अग्निज्वाला प्रगट झाली आणि मदन भस्मिभूत झाला. पुढें रतिविलापामुळें दयार्द्र झालेल्या भगवान् शंकरांनीं कामदेवाला पुन्हा जिवंत केलें. त्या वेळीं कृतज्ञमनानें प्रत्यक्ष कामदेवानेंच हें शिवशक्तीचें मंदिर बांधलें व तिचे कामाख्या असें नांव ठेवलें. तेंच आजहि प्रचलित आहे. ही नवलकथा सांगणाऱ्या पुजाऱ्यानें कथाकाराच्या थाटांत "तावत्स वन्हिर्भवनेत्रजन्मा भस्मावशेषं मदनं चकार" ही कुमार-संभवांतली ओळ म्हणून दाखविली तेव्हां त्याच्या "स" चा "श" "व" चा "ब" करून विकृत रीतीनें म्हटलेल्या संस्कृत उच्चारांचें मला हंसूं आलें. गृहस्थाचा संस्कृतचा अभ्यास बऱ्यापैकीं होता. परंतु एकांगी अभ्यासामुळें तो अंधश्रद्ध मात्र झाला होता. नाहीं तर कामाख्या मंदिर कामदेवानें बांधल्याची कथा त्यानें इतक्या श्रद्धाळूपणानें मला सांगितली नसती.

कामाख्याचें मंदिर प्रत्यक्ष कामदेवानें बांधलेलें असो, महाभारतकाळीं नरकासुरानें बांधलेलें असो, अथवा आसामचे कांहीं आधुनिक इतिहासकार

सांगतात त्याप्रमाणें १५६५ मध्यें नरनारायण नांवाच्या राजानें बांधलेलें असो, आसामच्या धार्मिक जीवनांतील अनेक परिवर्तनें या मंदिराच्याच परिसरांत घडून आलेलीं दिसतात. गोहाटीच्या भूमीवर जसे राजकीय संग्राम झाले आहेत तसे धार्मिक संग्रामहि झालेले आहेत. फार प्राचीन-काळीं आसाम अथवा कामरूप हा तंत्रमंत्रांचा प्रदेश अशी भारतांत सर्वत्र समजूत होती ! तिची पडछाया– थट्टेचा विषय म्हणून का होईना अजूनहि पहावयास मिळते. मी आसामच्या प्रवासास निघालों असें ऐकल्यावर माझी एक मैत्रीण मला म्हणाली, "सांभाळ रे बाबा, आसामी स्त्रिया फार विलासी आणि जादुगिरींत तरबेज असतात. गांवांत आलेल्या परपुरुषांचें दिवसा प्राण्यांत अथवा पक्ष्यांत रूपांतर करून त्या रात्रीं पुन्हा त्याला मनुष्य बनवितात !" मातृसत्ताक पद्धति असलेल्या कामरूपविषयीं अशा कल्पना इतरत्र प्रसृत झाल्या होत्या यांत नवल नाहीं. आजहि आसामच्या कांहीं पहाडी टोळ्यांत मुलगा आपल्या नांवापुढें पित्याचें नांव न लावतां आईचें नांव लावतांना दिसून येतो. शिलाँग–चेरापुंजी येथें तर पहाडी स्त्रिया दुकानें चालविण्यापासून जन्माचा जोडीदार शोधण्यापर्यंत सर्वच बाबतींत धीटपणें स्वतः पुढाकार घेतात. साहजिकच कामरूपमध्यें स्त्रीराज्य आहे. तिथल्या स्त्रिया पुरुषांवर जादू करतात इत्यादि कल्पना निघाल्या. त्यांचे मूळ आर्य स्त्रियांपासून अनेक दृष्टींनीं भिन्न असलेल्या कामरूपमधील स्त्रियांच्या धीट वागणुकींत सांपडतें. या भिन्न समाजव्यवस्थेचा फायदा घेऊन दक्षिणेंतील नंबुद्री ब्राह्मणांप्रमाणें आसाममध्यें शिरलेल्या आर्य ब्राह्मणांनींहि शक्तिपूजेच्या निमित्तानें तांत्रिक धर्माची स्थापना करून आसामच्या मूळ प्रजेशीं आपल्या रक्ताचा संकर करण्याचा प्रयत्न केला. पुढें ही शक्तिपूजा आणि तांत्रिक धर्मपद्धति भोगलालसेनें लडबडलेल्या एका विकृत मनोवृत्तीचें प्रतीक बनली आणि तिच्यांत दुर्बल प्राण्यांपासून मनुष्यापर्यंत सर्वांचें रक्त देवतेला नैवेद्य म्हणून देण्याची प्रथा सुरू झाली. एखादी प्रजा जिंकावयाची असेल तर आपल्या धर्मगुरूंना प्रथम तिच्याकडे पाठवून नंतर राज्यसत्तेनें तिच्या प्रदेशांत पाऊल टाकावयाचें हें जुनें तंत्र आहे. आजच्या ख्रिश्चन मिशनऱ्यांप्रमाणें आर्यधर्मगुरूंनींहि त्याच तंत्राचा अवलंब केला होता. परंतु आर्य-धर्मगुरूंनीं एक भयंकर मोठी चूक केली. भूत-प्रेतांना बळी देणाऱ्या

मूळच्या आसामी प्रजेच्या जंगल-धर्मापेक्षांहि भयंकर व विकृत असा धर्म त्यांनीं निर्माण केला व त्यांत मूळच्या प्रजेचाहि बळी जाऊं लागला. त्याचा परिणाम दोन्ही प्रजांमध्यें भयंकर मोठा संघर्ष होण्यांत झाला. तंत्रमंत्रादींनीं भारलेलें शाक्तांचें शक्तिपूजेचें स्थान या संघर्षांत जमीनदोस्त झालें आणि जवळचें ब्रह्मपुत्राचें पात्र रक्तानें रंगून निघालें. ब्रह्मपुत्राचें दुसरें नांव "लोहित्य" अथवा "रक्तनद" असें आहे. आसामांत तेव्हां नुकतींच पडत असलेलीं बौद्धधर्माचीं पावलेंहि या संघर्षाला कारणीभूत झालीं असावींत. गोहाटीच्या मध्यावरच्च शुक्रेश्वराच्या टेकडीवर शुक्रेश्वर जनार्दनाचें मंदिर आहे. तेथें ब्रह्मपुत्राच्या कांठाशींच शाक्तांच्या विकृत हिंसेविरुद्ध जणू प्रचार करीत असलेली भगवान् बुद्धाची करुणामयी मूर्ति नजरेस पडते. परंतु बौद्धधर्माचीं पावलेंहि आसामांत फार काळ टिकलीं असें दिसत नाहीं. त्यानंतर नरनारायण नांवाच्या राजानें जंगली तांत्रिक धर्माचा पाडाव करून आसामांत वैष्णव धर्माचा प्रसार केला आणि शाक्तांचें पूर्वींचें पूजा-स्थान वैष्णव धर्माचें मुख्य पीठ बनविलें. कामोच अथवा कॉमॉख हा अनार्य शब्द. त्याचा अर्थ कुणाचा तरी मृतदेह असें भाषाकोविद् मानतात. नीलाचलाचें पठार पूर्वींच्या संघर्षानें एक मृतदेहाचें मैदान-स्मशानच बनलें होतें. नीलाचलावरील भंगलेलें देऊळ स्मशानमंदिर म्हणून अनार्य भाषेंत ओळखलें जाऊं लागलें! कॉमॉख या शब्दाचें संस्कृतीकरण करून कामाख्या हा शब्द बहुधा 'नरनारायणा'नें बनविला व शाक्तांच्या मूळ स्थानावरच कामाख्या नांवाच्या बहुजन समाजाच्या मनाला आकर्षित करील अशा देवीचें स्थान बनविलें आणि अंधश्रद्धेनें अनाचार करणाऱ्या समाजाला भक्तिमार्गाच्या भव्य धर्माची ओळख करून दिली. "कामाख्या" मंदिराभोंवतीं अजूनहि पूर्वींच्या शाक्तपंथीय कथा विकृत स्वरूपांत ऐकावयास मिळतात. परंतु नीट निरीक्षण करणाऱ्या चिकित्सक प्रवाशाला कामाख्यामंदिर व नीलाचलाची टेकडी यांच्या परिसरांत आसामांतील धार्मिक संघर्षाचे पडसाद स्पष्टपणें ऐकूं येतात.

नीलाचलाच्या मस्तकावरून सुंदर दिसणारें गोहाटी शहर खालीं उतरून जवळून पाहिलें तर पदरीं कांहीं निराशा पडत नाहीं. फिरत

फिरत शहरांतील पानबझार विभागांत गेलों. नाक्यावरील एक निमुळतें उंच शिखर असलेलें गिरिजाघर अथवा चर्च व त्याच्यापाशींच सुरुवात होऊन वळसा घेत निमुळता झालेला रस्ता, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उंच दाट वृक्षांनीं किंचित् झाकलेलीं टुमदार रेखीव घरें! एखाद्या ख्रिसमस कार्डावरील इंग्रजी खेड्याचें सुंदरसें चित्रच जणूं! असा आहे पानबझार. गोहाटी शहराचा बराच जुना विभाग असावा हा. याच ठिकाणच्या कांहीं लोकांनीं सांगितलें कीं, गेल्या आठ-दहा वर्षांत गोहाटी शहर एखाद्या एकपेशी जीवासारखें वेडेंवांकडें अव्यवास्थितपणें वाढतें आहे. आसामची बाजारपेठ काबीज करून बसलेल्या मारवाडी व्यापाऱ्यांनीं कलात्मक बांधणी, स्वच्छता अथवा सोय यांचा यत्किंचित्हि विचार न करतां वाटेल तशीं घाणेरडीं घरें बाधून गोहाटी शहराची कळा पार बिघडून टाकावयाला सुरुवात केली आहे. आणि त्यांच्या घरांचीं भाडीं तरी किती? मुंबईच्या जवळ-जवळ अडीच पट! शिवाय जागा घेतांना पागडी अथवा तिथल्या भाषेंत 'सलामी' वेगळीच! हीं अशीं प्रचंड भाडीं कां? याचें एक मजेदार कारण एका मारवाडी पेढीवाल्यानें सांगितलें. तो म्हणाला, "आसामी लोकांसारखीं बोरूचीं तकलुपीं घरें नाहींत आमचीं! विटा-सिमिटांचीं पक्कीं घरें या बाजारपेठेंत बांधून बसलोंत आम्हीं. धरणी-कंप झाला तर हीं जमीनदोस्त होऊन यांच्यासाठीं वापरलेलें भांडवल धुळींत जावयाचें. तेव्हां घातलेलें भांडवल व्याजासकट शक्य तितक्या लवकरच वसूल झालें पाहिजे म्हणून अशीं अधिक भाडीं ठेवावयाला लागतात आम्हांला!" त्रिवार नमस्कार करण्यासारखा आहे हा मारवाडी दूरदर्शीपणा!

व्यापार मारवाड्यासाठीं, सत्ता बंगाल्यासाठीं, रिक्षा बिहाऱ्यासाठीं आणि आराम आपल्यासाठीं अशी जीवनाची विभागणी आसामी लोकांनीं अगदीं कालपर्यंत करून ठेवली होती! बंगाल्यांना थोडासा काट मारला तर आज देखील आसामी जीवनाची हीच विभागणी गोहाटींत दिसून येते. त्यामुळें पैसा व पक्क्या बांधणीचें घर या दोन्ही वस्तूंशीं असलेला आसामी व्यक्तीचा संबंध इथें हाताच्या बोटावर मोजतां येतो. या शहरां-तील बहुसंख्य लोकांचीं घरें—आसामी लोकांचीं घरें अगदीं कमी खर्चाचीं

लांकडी चौकटींत बोरू अथवा चटया बसवून बनविलेलीं असतात. मात्र त्यांची बांधणी कलात्मक असते. इतकी की रस्त्यांत उभे राहून त्यांच्याकडे कांहीं वेळ पहात राहण्याचा मोह आवरत नाहीं. चटयांच्या अथवा बांबूंच्या विणकामानें बनविलेल्या भिंतींपासून तों गवती छपरांच्या पागोळ्यांपर्यंत प्रत्येक गोष्ट जणूं कसलेल्या कलाकारानें घडविली आहे असें वाटतें. अशाच घरांना आंतून-बाहेरून सिमिटाचा पातळ थर देऊन सध्यां त्यावर रंग लावण्याची नवी पद्धत सुरू झाली आहे. त्यामुळें दुरून हीं घरें पक्कीं असल्याचा भास होतो. परंतु मूळ आसामी घराची और शोभा मात्र नष्ट होते. या अशाच घरांत आसामी गृहस्थ सुखासमाधानानें वावरत असतो. जरासा वरच्या दर्जाचा असला तर त्याची पत्नी रेशमी मेखला व शाल वापरतांना दिसते. गरीबाची स्त्री एकवस्त्रा राहाते. शेजारच्या पुकुरांतले मासे व प्रांतांत भरपूर पिकणाऱ्या तांदुळांचा भात एवढें अन्न त्याला पुरतें. जीवनांत आणखी एकाच गोष्टीची सतत जरूर लागते त्याला. ती म्हणजे तांबूल ! नागवेलीचें पान व त्याबरोबर नुसती ओली सुपारी. पुष्कळशी जरा नशा येईल इतकी. बस्, या पलीकडे आणखी कशाची जरूरी आसामी माणसाला वाटत नसावी. या ताम्बूलावरूनच प्राग्ज्योतिषपुराचें सध्याचें गोहाटी हें नांव पडलें. "गो" म्हणजे नागवेलीचें पान आणि "हाटी" म्हणजे बाजार. गोहाटी म्हणजे पानबाजार !

गोहाटीच्याच उपनगरांत अगदीं सुरेख मांडणी असलेल्या एका खेड्यांत फिरत फिरत गेलों होतों. फिरतां फिरतां एका अनोळखी कायस्थ सद्-गृहस्थाच्या घरांत आम्हीं प्रवेश केला. दारांतच एक हात-माग होता व त्यावर घरांतली एक एकवस्त्रा स्त्री पंचेवजा अरुंद पन्ह्याचा कपडा विणीत होती. आम्हांला पहातांच जवळ होतें तें बसण्यासाठीं देऊन त्या सद्गृहस्थानें आमचें स्वागत केलें. आमची "हिंदी–आसामी" भाषा व त्या गृहस्थाची "आसामी–हिंदी" भाषा यांच्या परस्पर विनिमयांत इतकें लक्षांत आलें कीं, आसामी माणूस सरळ, साधा व सभ्य असतो. देऊं केलेला ताम्बूल नाकारला तर त्याला वाईट वाटतें. स्वतः विणलेलें वस्त्र, स्वतः पिकविलेलें तांदूळ व स्वतःच्या पुकुरांतले मासे याशिवाय जीवनांत इतर कांहीं विशेष आहे असें तो मानीत नाहीं. स्वतःच्या कुटुंबियांशीं तो

अत्यंत प्रेमळपणानें वागत असतो. धरणी–कंपानें संतप्त, संत्रस्त झालेल्या भूमींत उद्यांची काय बात अशा तऱ्हेचें नकारात्मक तत्त्वज्ञान सांगत आजचा दिवस सुखासमाधानाने तो व्यतीत करतो. आमच्याबरोबर आलेल्या मधुरानें एक छोटासा शेर म्हणून आसामी माणसाची जीवनकथा त्यांत गुंफली.

हुजूर चंचल जिंदगी दम् भरका है खेल
सुनलो बात आजकी हो न हो फिर मेल !

त्या कायस्थ सद्‌गृहस्थाच्या घरांतून बाहेर पडतांना एका लहान मुलीनें जवळच उभ्या असलेल्या एका मुलाला "दादा" अशी हांक मारलेली मीं ऐकली. गुजरातपासून आसामपर्यंत एक अगदीं सरळ रेषा काढली तर वाटेवर बहुतेक ठिकाणीं 'दादा' हा शब्द आजोबा या अर्थानें वापरलेला आढळतो. परंतु आसामांत मात्र महाराष्ट्रांतल्याप्रमाणें मोठ्या भावाला 'दादा' अशी हांक मारलेली मला ऐकूं आली. कुणी तरी मला सांगितलें कीं आसामी भाषेंत बरेच मराठी शब्द आहेत म्हणून. असतीलहि. पण अगदीं सर्वच ध्वनि कोमल असलेल्या आसामी भाषेंत ते शब्द इतके गुळगुळीत होऊन गेले आहेत कीं अनेक लोकांचें संभाषण ऐकूनहि मला ते चट्‌कन आढळले नाहींत. द्वित्व झालेले वर्णसुद्धां कठोर उच्चारले जात नाहींत या भाषेंत. आसामी भाषेची ही कोमलता दोन खानदान आसामी रमणींचें संभाषण ऐकतांना इतकी जाणवते कीं कृष्ण पक्षांतलें तारांगण जणूं आपल्याभोंवतीं फेर धरून नाचतें आहे असें वाटतें.


४

हिरव्या रंगाच्या अद्भुत दुनियेंत

गोष्टींतल्या राजाला एक असते नावडती राणी व एक असते आवडती राणी. आसाम सरकारचीहि एक आहे नावडती राजधानी आणि एक आहे आवडती राजधानी. नावडती पण वहिवाटी राजधानी आहे ब्रह्मपुत्राच्या कांठावर वसलेली '.गोहाटी '. आवडती व राजकीय राजधानी आहे शिलाँग. जवळजवळ पांच हजार फूट (४९००) उंच असलेली खासी आणि जंतिया टेकड्यांच्या अंतरंगांत असलेली. पण शिलाँग एकट्या आसाम सरकारचीच राजधानी आहे असें नाहीं. खासी, जंतिया वगैरे आसामांतील पहाडी टोळ्यांचा प्रदेश स्वायत्त आहे. या स्वायत्त प्रदेशाची राजधानी देखील शिलाँगच आहे. नेफा किंवा नॉर्थ इस्टर्न फ्रॉंटीयर एजन्सी म्हणून ओळखला जाणारा आसामचा तेहतीस हजार मैलांचा प्रदेश केन्द्रशासित आहे. भूतान, तिबेट व ब्रह्मदेश यांना भिडलेल्या या प्रदेशाची राजधानी पण शिलाँगच आहे. शिलाँग येथेंच या प्रदेशाच्या कारभाराचें मुख्य दप्तर आहे. थोडक्यांत शिलाँगची सुंदर राजधानी अशी भागीदारीत आहे.

गोहाटीपासून शिलाँग त्रेसष्ट मैल दूर आहे. कविकुलगुरूच्या पूर्वमेघांतील त्रेसष्ट श्लोकांपैकीं प्रत्येक श्लोक आपापल्यापरीनें सुंदर आणि मोहक वाटतो. ६३ मैलांच्या गोहाटी-शिलाँग रस्त्यावरील प्रत्येक मैलदेखील तसाच सुंदर आणि मोहक दिसतो. गोहाटीच्या जरा बाहेरच रस्त्याची

सुरुवात होते. अगदीं सपाट मैदानांत. दोन्ही बाजूला हिरवीं हिरवींगार भातशेतें दूरपर्यंत पसरलेलीं. क्षितिजाच्या कडेशीं निळसर रंगानें नटलेल्या टेकड्यांना बिलगलेलीं. मध्येंच कुठल्यातरी शेतांत रस्त्याच्या कडेला लागून एखादें तळें, आरशासारख्या नितळ पृष्ठावर ढगांची लिपि लिहीत बसलेलें. त्याच तळ्याच्या कांठीं आपल्याच प्रतिबिंबाकडे टक लावून निश्चलपणें उभे राहिलेले पांढरे बगळे. मनाच्या कॅमेरांत असें सुंदर चित्र टिपून घेतलें नाहीं, तोंच पुढें पुढें धांवणाऱ्या एस्. टी. बसनें सरकन् वळण घेतलें आणि तें चित्र अदृश्य झालें ! बस चढणीला लागली. रस्त्याच्या बाजूची सारी जमीनहि ऊर्ध्वगामी झाली. बसच्या खिडकींतून पुन्हा नवीन देखावा दिसूं लागला. बांबूबोरूचें एक सुंदर ठेंगणें ठुसकें घर. हिरव्या हिरव्या शेतांत उभें असलेलें. घराभोंवतीं बांबूंचेंच नक्षीदार कुंपण. आंगणांतील पुष्पसृष्टीचें ऊतूं जाणारें लावण्य जणूं ओसडूं नये म्हणून घडविलेलें ! कुंपणाच्या एका कोंपऱ्यांत एकच उंच सुपारीचें झाड. एकाकी अलिप्त. उदास असें परंतु आपलें सुंदर मस्तक अभिमानानें उन्नत ठेवून ताठ उभें असलेलें. जणूं आत्यंतिक दुःखानें



विद्ध झालेलें असलें तरी त्याची वाच्यता कुणाशींहि न करतां आपलें प्रेम आणि दुःख यांची पवित्र स्मृति आपल्याच मनांत खोल खोल लपवून झुरणारें. वळणावळणांनीं वर जाणारी वाट सर्वांगाला ठिकठिकाणीं आकर्षक बांक देऊन लाडिकपणें "दमलें बाई!" म्हणणाऱ्या मदालसे-सारखी चित्तवेधक होऊं लागली. आणि वेणींतून गळून पडलेल्या गेंदा-सारखी "बस" तिच्या अंगावर घरंगळत निघाली. सभोंवतालची विरळ वस्ती विलुप्त झाली. दोन्ही बाजूला घनदाट वनश्री, चेहऱ्यावर खेळणारें अश्विनाचें पिंवळसर ऊन्ह चुकवीत पायाखालीं फुललेल्या गेंदाकडे पहात हसूं लागली. कुठें तरी ऐकलेली एक पुराण–कथा मनांत साकार झाली. गेंदाचें फूल एकदां श्रीकृष्णाच्या नजरेला पडलें. तें होतें शेषाच्या मस्तकावर. कृष्णानें अर्जुनाला तें फूल घेऊन येण्याची आज्ञा केली. अर्जुन नागलोकांत गेला. तेथें तो शेषकन्या उलूपीच्या प्रेमांत सांपडला आणि फुलाची गोष्टच विसरून गेला. एके दिवशीं रात्रीं उलूपीबरोबर प्रेमगोष्टी करतांना पाण्याच्या खळाळत जाणाऱ्या प्रवाहावर नाचणारीं चंद्रफुले अर्जुनाच्या नजरेस पडलीं, आणि श्रीकृष्णाच्या मुकुटांत लकाकणाऱ्या मोरपिसांची त्याला आठवण झाली. तत्क्षणीं शेषाच्या मस्तकावर चढून अर्जुनानें गेंदाचें फूल हस्तगत केलें व उलूपीला घेऊन तो द्वारकेला यावयाला निघाला. दसऱ्याच्या दिवशीं त्यानें द्वारकेंत प्रवेश केला. गेंदाचें फूल श्रीकृष्णाच्या चरणीं अर्पण केलें आणि श्रीकृष्णाच्याच साक्षीनें उलूपीशीं धर्मविवाह केला. स्वर्गांतून आणलेला पारिजात आणि पाताळांतून आणलेला गेंद–श्रीकृष्णाच्या रसिक नजरेनें मिळविलेलीं दोन्ही फुलें द्वारकेंत–रुक्मिणीच्या आंगणांत शोभूं लागलीं. आसामच्या भूमीवर या वाटेच्या बाजूला गेंदाचीं फुलें अक्षरशः शेंकडो तऱ्हेचीं आढळतात. कांहीं एकेरी, कांहीं गरगरीत चेंडूसारखीं गोल. कांहीं फिकट पिंवळी, कांहीं लालसर फिकट पिंवळी, कांहीं तांबड्या मखमलीच्या रंगाचीं, कांहीं मंद वासाचीं. कांहीं उग्र वासाचीं कांहीं अगदींच वास नसलेलीं मूळ दोन--तीन तऱ्हेच्या झाडांचा वर्णसंकर होऊन अनेक तऱ्हा झाल्या आहेत. कांहीं ठिकाणीं मुद्दाम करविल्याहि जात आहेत. आसामी प्रजेइतकाच वर्णसंकर या फुलांत झालेला. उलटपक्षीं या फुलाइतकाच आसामी प्रजेंत वर्णसंकर झाला आहे असें म्हटल्यास वावगें

होणार नाहीं. वेगानें जाणारी गाडी का कोण जाणें हळूहळू मुंगीच्या पावलांनीं चालू लागली. मी खिडकींतून बाहेर पाहिलें. रस्त्याच्या कडेला सरलवृक्षांची एक झुंडच उभी होती. डोक्यावर गोंड्याच्या उंच टोप्या घालून कवायतीला ताठ उभ्या राहिलेल्या सैनिकांसारखी. वृक्षांचा वरचा आकार एकमेकांत संपूर्णपणें मिळून गेला होता. त्यांच्या तळाशीं गाढ अंधःकार गुहेंत झोंपलेल्या कुंभकर्णासारखा विसावला होता. क्षणांत दूर दूर, पुष्कळ दूर अनेक तुतार्‍या एकदम फुंकल्या जाव्या त्याप्रमाणें वनकीटकांचा एक थरथरता विचित्र आवाज त्या अंधाराच्या अंतरंगांत घुमूं लागला. आणि जितक्या अचानकपणें सुरू झाला तितक्याच अचानकपणें बंदहि झाला. क्षणाचाच खेळ, पण कांहींतरी गूढ अकल्पनीय अशी हुरहूर मनाला स्पर्श करून गेली. वाटलें अंतरंगाला अंधार कधींच दूर होणार नाहीं असें वाटून वृक्षराजीनें एक हुंदका दिला. त्याचा प्रतिसाद आपल्याहि हृदयांतून बाहेर पडेल.

वाट नागिणीसारखी सळसळत पुन्हां मागें जाऊं लागली. तिच्या कडेच्या वनश्रीची फुगडी पुन्हा सुरू झाली. डोंगराच्या हिरव्यागार कुशींत रस्ता रुंद करण्यासाठीं माणसाच्या क्रूर पंजांनीं केलेली लाल जखम आकाशानेंहि तिच्याकडे पाहून अश्रु ढाळले होते. त्याच अश्रूंनीं भिजलेलीं उन्हाचीं ओलीं सोनेरीं पावलें दाट हिरव्या रेषांवरून नाचूं लागलीं. शेजारींच बसलेली मैत्रीण म्हणाली, “ मोठा आकर्षक असतो नाहीं बांबूच्या झाडांचा रंग ? ” उत्तर न देतां मी बाहेरच पहात राहिलों. रुंजी घालीत मनांत एक विचार भिरभिरूं लागला. वनरमणीचा हरित शालू हिरव्या रंगांच्या शेंकडों मुलायम छटांनी रंगलेला आढळतो. पाहूं गेलें तर प्रत्येक छटा हिरवीच. पण या सार्‍या छटा एकमेकांपासून किती वेगळ्या ! किती भिन्न ! या सगळ्या छटा नुसत्या आकर्षकच आहेत का ? कीं मानवी मनःपृष्ठावर उमटणार्‍या विविध तरंगांचीं प्रतिबिंबेंहि या रंग-छटांतून दिसूं शकतात ? हिरव्या रंगाच्या या गूढ अद्‌भुत सृष्टीमध्यें मानवी मनांतील हर्ष, खेद, भीति, अनुकंपा, विलासप्रणय, क्रोध, विरक्ति इत्यादि भावना तर नाहीं ना चित्रित होत ? मनाच्या संदुकींतील कल्पनांचीं फुलपांखरें भराभर उडून हिरव्या रंगाच्या अनेक छटांवर

जाऊन बसलीं. मी माधुरीकडे वळून विचारलें, "मुली, पाण्याच्या शांत पृष्ठावर पडलेल्या वनश्रीच्या प्रतिबिंबांचा हिरवा रंग पाहिला कीं प्रतिभावंत कवीची तेजस्वी नजर आपल्याकडे पहात असल्याचा भास होत नाहीं तुला? बांबूंच्या कोंवळ्या काठीचा हिरवा रंग किती सुंदर किती पारदर्शक असतो? जणू हिरव्या कांचेचा पातळ थर आतांच काठीवर चढविला आहे असें वाटतें. पण त्यांत बालिकेच्या मुग्ध नयनांत बाल्यावस्थेंतच आढळणाऱ्या अद्‌भुत गूढ सृष्टीची रौनक तरळत असते म्हणून तो आकर्षक वाटतो. भातशेतावरच्या पिंवळसर हिरव्या रंगाची शोभा पहा. भूतकाळाकडे वळून पहाणाऱ्या वृद्धाची उदास नजर त्या रंगांच्या संगतींत चित्रित झालेली दिसेल तुला. फार काय प्रणयातुर मदालसेचे कामुक डोळे आणि निरागस अर्भकाचे अहेतुक चाळे यांचीहि ओळख हिरव्या रंगाच्या एखाद्या छटेंतून होऊं शकेल तुला. ताम्रवर्ण हरवल्यामुळें हिरव्या होत चाललेल्या आम्रवृक्षाच्या चकचकीत पालवीकडे बघ, किंवा वाऱ्यावर जरा जरा हालणाऱ्या याच बांबूंच्या चिमुकल्या हिरव्या पानांकडे पहा म्हणजे मी म्हणतों याची प्रचीति येईल तुला."

प्रवासांत आपल्या अगम्य बडबडीकडे लक्ष देणारी निदान लक्ष आहे असें दाखवून चूप बसणारी व्यक्ति बरोबर असली की, जीवाला फार बरें वाटतें हें बोलतां बोलतां लक्षांत आलें माझ्या.

गाडी थांबली आणि तिच्याबरोबर मनांत उसळणारे कल्पनातरंगहि थांबले. गोहाटी-शिलाँग रस्त्याच्या मध्यावर एक सुंदरसें चिमुकलें गांव आहे. वनराईच्या कुशींत लपलेलें, आईच्या पदराखालून हळूच तोंड काढून खेळकरपणें हंसणाऱ्या बाळासारखें दिसणारें. प्रवासांत गाडी चालू असतांना कोपऱ्यांत बसून कल्पनेचा कापूस पिंजत बसायची संवय आहे मला. परंतु गाडी थांबली की, एकच कल्पना मनांत धिंगाणा घालूं लागते माझ्या. ती म्हणजे चहा. त्या चिमण्या गांवांत गाडींतून उतरल्याबरोबर समोरच अगदीं अद्यावत् पद्धतीचें चहापानगृह दिसलें. माझें मन आनंदानें नाचूं लागलें. अत्यंत आनंद झाला कीं त्यांत कोणी सहभागी होणारें आहे कीं नाहीं हें पाहाण्याची आतुरता सहज निर्माण होते. मी माधुरीच्या चेहऱ्याकडे दृष्टि वळविली, चहा मिळणार या सुखद कल्पनेनें तिच्या

तोंडावर प्रसन्न स्मित पसरलें होतें. मी वासूकडे नजर फिरविली. हन्त! चहापानगृहाचें पुसट प्रतिबिंबदेखील त्याच्या डोळ्यांत नव्हतें. वासूबरोबर चहाची गोष्ट करणें म्हणजे, "अरसिकेषु कवित्वनिवेदनम् । दुधाचा शौकिन आहे वासू. दुधावर त्याचे खरें खरें प्रेम आहे. नीरक्षीर विवेक करणाऱ्या हंसाप्रमाणें शक्ति असती तर चहांतलें केवळ दूधच त्यानें शोषून घेतलें असतें. उपाहारगृहांत शिरून फक्त दोन कप चहाची ऑर्डर दिली मी.

पंधरा-वीस मिनिटांनीं गाडीनें शिलाँगच्या दिशेनें पुन्हा कूच केलें.

५

शिलाँग

हंसऱ्या चेहऱ्याचीं अस्वस्थ मनें

नागमोडी वळणें घेत, पाण्यांत खडा टाकल्यावर उठणाऱ्या लाटांप्रमाणें वर-खालीं होत वाट शिलाँगच्या रोखानें चालली होती. तिच्या प्रत्येक उतारावर प्रत्येक वळणावर वनश्रीची शोभा वेगवेगळीच दिसत होती. आकाशाला भिडूं पहाणाऱ्या घेरेदार उंच उंच झाडांबरोबरच डोंगरावरून खालीं उतरणारे भरदार बुटके पहाडी लोकहि आतां दृग्गोचर होऊं लागले. पहाडांतील वनश्रीप्रमाणेंच पहाडी लोकांचा चेहराहि परमेश्वरानें जणूं काय खास हंसण्यासाठींच बनविला असावा असें मला वाटलें. शिलाँगच्या आसपास आणि शिलाँगमधेंहि वस्ती करून असलेल्या पहाडी लोकांना " खासी " असें म्हणतात. प्रथमदर्शनीं आनंदी व खेळकर वाटणारे हे लोक बाहेरून सुंदर दिसणाऱ्या आसामी पर्वतमालेप्रमाणेंच अंतरांतून खूप अस्वस्थ आहेत. पर्वतांच्या रचनेचा संस्कृतीवर पुष्कळ परिणाम होत असतो. सर्वसाधारण नियम असा आहे कीं, डोंगरांतून वस्ती करणारी प्रजा ही बहुधा स्वैर व स्वतंत्र वृत्तीची असते. इंग्रज लोक शिलाँगला " पूर्वेकडचें स्कॉटलंड" म्हणत असत. शिलाँग व त्याच्या परिसरांतील प्रदेशाशीं साम्य असलेल्या स्कॉटलँडमधील प्रजाहि फार स्वैर व स्वतंत्र वृत्तीची आढळते. इतकीं वर्षे होऊन गेलीं तरी अजूनहि इंग्लंडचें जूं मानेवरून झुगारून देऊन स्वतंत्रपणें जगण्याच्या गोष्टी स्कॉटिश प्रजा मधून मधून करीत असते!

डोंगराळ प्रजेची आर्थिक स्थिति मैदानी प्रजेपेक्षां बहुधा मागासलेली असते. साहजिकच मैदानी लोकांविषयीं वाटणाऱ्या असूयेमधून एक तऱ्हेची असमाधानी वृत्ति त्याच्या मनांत घर करून राहाते.

'पूर्व व पश्चिम सागरांत अवगाहन करणारा' असें हिमालयाचें वर्णन कविकुलगुरूच्या कुमारसंभवांत आहे. पूर्वापर तोयनिधींत प्रवेश करण्यासाठीं दूर उत्तरेला असलेल्या हिमालयाला आपल्याच देहाशीं काटकोनांत मुडपून घ्यावें लागलें आहे. पर्वत जिथें मुडपतो तिथें भूभागांत सैल चुण्या निर्माण होतात. आणि त्या आपल्याच भारानें कोसळून सपाट होऊं पहात असतात. त्याचमुळें त्या ठिकाणच्या भूभागांत नेहमीं धरणीकंप होत राहतात. आसामांत 'लोहित दरी' म्हणून ओळखला जाणारा विभाग आहे. याच विभागांत हिमालयाचें पूर्वेकडचें टोक स्वतःच्याच अंगाशीं एकदम काट-कोनांत मुडपून बंगालच्या उपसागराकडे वळलें आहे. त्यामुळें आसामांत धरणीकंप होतात. गोहाटींतील एका आसामी साहित्यकाच्या घरीं गेलों होतों, तेव्हां बोलतां बोलतां तो म्हणाला, "आसाममध्यें वारंवार धरणीकंप होतात म्हणून आसामी माणसाला बोरू, बांबू व लांकूड यांचीं हलकीं घरें बांधून राहावें लागतें. मी प्रश्न केला. "गोहाटींतील कामाख्यादि देवळें विटांनीं बांधलीं तीं आज इतकीं वर्षें कशीं टिकलीं आहेत. शिवाय मध्य आसामांतील नाम्बार जंगलांत दिमापूर या कछारी राज्याच्या राजधानीचे पडके अवशेष पाहिले तर पूर्वीं विटा व दगड यांचें अप्रतिम बांधकाम करण्याची कला या प्रांतांत होती असें दिसतें. कछारी राजधानी धरणीकंपाने नष्ट झाली नाहीं. काळापहाड नांवाच्या एका मूर्तिभंजक मुसलमानानें मुद्दाम जाळून पोळून ती नष्ट केली असें इतिहास सांगतो. त्या अर्थीं धरणी-कंपांतहि टिकून राहातील अशीं दगडा-विटांचीं घरें बांधण्याची कला आसामला अवगत होती. मग सर्रास बांबूबोरूचीं घरें बांधण्याची प्रथा कशी निर्माण झाली?" त्या साहित्यिकाला माझ्या शंकेचें निवारण करतां आलें नाहीं. परंतु गोहाटीला स्थायिक होऊन राहिलेल्या एका मराठी माणसानें माझ्या शंकेचें निरसन केलें. तो म्हणाला कीं, "ब्रह्मदेशांतून येऊन आसाममध्यें स्थायिक झालेल्या अहोम लोकांना दगडाविटांचीं घरें बांधण्याची कला अवगत नव्हती. ती कला ब्रह्मपुत्रा व कोसी नदी यांच्या मधील

प्रदेशांत तत्पूर्वी स्थायिक झालेल्या कछारींना ठाऊक होती. गोहाटीला अहोमचेंच राज्य फार काळ टिकलें आणि त्यामुळें त्यांनीं ब्रह्मदेशांतून आणि वाटेवरील हिमालयाच्या पहाडी प्रदेशांतून आणलेलीं लांकडी घरें बांधण्याची पद्धतच या शहरांत प्रचलित झाली. त्याच्या म्हणण्याप्रमाणें मूलतः भूकंपपीडित पहाडांत राहणाऱ्या प्रजेचीं बांबूवर आधारलेलीं आणि जमिनीपासून उंच असलेलीं डळमळीत घरें सुधारूनच "अहोम"नीं आसामच्या मैदानांतील लांकडी घरें बांधण्याची प्रथा सरू केली असावी. कारण आसामी घरांत दिसून येणारी कलाकुसर विशेषतः छप्पर व पागोळ्याची कातरण ही पहाडांतील घरांशीं फार जुळती आहे.

थोडक्यांत इथली पर्वतश्रेणी झोंपीं गेलेल्या संरक्षण-मंत्र्याच्या सैन्य-व्यवस्थेप्रमाणें नित्य डळमळत असते. अशा या डळमळीत प्रदेशांत भटकणाऱ्या आणि डळमळींत स्थितींत राहाणाऱ्या प्रजेची आर्थिक परिस्थिति ही डळमळीत राहिल्यास नवल नाहीं, आणि जोंपर्यंत ती तशी आहे तोंपर्यंत हंसऱ्या चेहऱ्याच्या या पहाडी प्रजेची मनोवृत्तीहि अशान्त अस्वस्थ राहाणार यांत संशय नाहीं.

गाडी शिलाँगमध्यें शिरली आणि एस्. टी. च्या दप्तरापाशीं येऊन थबकली. तोंडभर हंसत फाटक्या--मळक्या कपड्यांतील पहाडी स्त्री-पुरुषांनीं आमच्या सामानाला हात घालावयाला सुरुवात केली. कां कोण जाणें शिलाँगमधील या प्रजेला पाहातांच माझ्या सर्वांगाला एक शिरशिरी येऊन गेली. भारताच्या सीमा-संरक्षणाची असीम जबाबदारी असलेल्या 'आसाम' व 'नेफा' विभागाच्या राजधानींतील ती प्रजा. या प्रजेंतले शेंकडों तयार पहाडी सैनिक-हिमालयाचें देखील संरक्षण करूं शकतील असे, या ठिकाणीं वावरतांना दिसावयास हवेत. त्याऐवजीं फाटके--तुटके कपडे घालून केवळ पोटासाठीं हमाली करणारे अनेक तगडे जवान दिसताहेत!... मन वाऱ्यावर उडणाऱ्या सांवरीसारखें भरकटूं लागलें. ज्यांचा लोकशाहीच्या जीवनपद्धतीलाच तात्त्विक विरोध आहे, तिबेटसारख्या आजातशत्रु देशाचाहि जे बलात्कारानें गळा दाबूं शकतात अशा लोकांचा देश सीमेला भिडलेला आहे. ते लोक दुसऱ्याला फाडून खाण्यापूर्वी उंदराशीं खेळणाऱ्या मांजराच्या मनोवृत्तीनें आपल्या सीमांवर कुरापती काढीत आहेत. अशा


परिस्थितींत निदान शांततेच्या काळांत तरी जी संरक्षणाची तयारी असावयास पाहिजे तिचा मागमूसहि येथें– शिलाँगमध्यें दिसू नये ? वादळ येण्यापूर्वी पक्ष्यांच्या काळजांत कालवाकालव होते म्हणतात. माझ्या मनांतले हे विचार देखील आगामी संकटाचे सूचक ठरले शिलाँगमध्येंच हिंद-चीन संघर्षाची बातमी कानावर आली.

प्रवासांत असतांना केव्हां केव्हां कवितेंत व्याकरण शोधण्याची अरसिकता माझ्या अंगात संचरते. आणि मग त्या वेळीं मी माझा जानी दोस्त श्री. वासू याच्याकडे वळतों. गुजराती भाषेंतील "जन्मभूमि" या दैनिकाबरोबर प्रसिद्ध होणाऱ्या 'प्रवासी' या साप्ताहिकाचा हा सव्यसाची लेखक व सहसंपादक म्हणजे अद्यावत् असा चालता बोलता ज्ञानकोश आहे. अमुक एका प्रश्नाचें सविस्तर व साधार उत्तर वासूकडे नाहीं असें बहुधा होत नाहीं. एस्. टी. च्या बस स्टँडवरून हॉटेलपर्यंत जातांना शिलाँगची उंची, लांबी, रुंदी, लोकसंख्या, उत्पादन, प्रेक्षणीय स्थळें या सर्व गोष्टींची माहिती मी त्याच्याकडून ऐकून घेतली व नंतर मनाशीं नक्की केलें कीं, शिलाँगच्या मध्यावर असलेलें "वॉर्ड" सरोवर एकदां पाहून घेतलेंच पाहिजे. हें सरोवर निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित असल्याची माहितीहि वासूनेंच मला दिली.

आसामचा सूर्य मुंबईच्या सूर्यापेक्षां सुमारें दीड तास लवकर उठून चालावयाला लागतो. त्यामुळें तिथें जवळजवळ चार वाजतांच पहांट फुटते लहानपणीं कुठल्यातरी शिक्षकानें माझ्या मनावर एक गोष्ट बिंबविली होती. "एखादें निसर्गरमणीय स्थान पहावयाचें असेल तर तें अगदीं सूर्योदयाला पहावें म्हणजे पांखरांचा किलबिलाट, परिमलयुत मंदानिल आणि वनश्रीची विकसित होणारी शोभा इत्यादि इत्यादि गोष्टींनीं माणसाचें मन प्रसन्न होतें." लहानपणीं मनावर झालेले संस्कार मोठेपणीं देखील टिकून राहातात. पहांटे चार वाजतां मी जागा झालों, परंतु शिलाँगच्या थंडीनें मला पांघरुणाखालीं असे घट्ट दाबून धरलें कीं बिछान्यांतून उठावयाची माझी छातीच होईना. झोंपल्या झोंपल्याच विचार करूं लागलों. वॉर्ड सरोवर अगदीं पहांटेलाच बघावयाला पाहिजे असें नाहीं. रमणीचें रूप आणि जलराणीचें सौंदर्य दिवसाच्या अथवा रात्रींच्या

कुठल्याहि प्रहरीं पाहिलें तरी मनोवेधकच वाटणार! चेहऱ्यावरील मुग्ध हास्य दाखवीत येणारी उषा, डोळ्यांतील तेजस्वी प्रकाशाची झळाळी फेंकणारी दुपार आणि मुखमुद्रेवरील क्षणजीवी उल्लास व विलास दाखविणारी संध्या या सर्वांच्या संगतींत जलराणीचें सौंदर्य वेगवेगळ्या छटांनीं चमकत असतें. ऐन अमावास्येच्या रात्रीं मध्यरात्रीची नीरव निःस्तब्ध शांति जेव्हां एखाद्या द्रवपदार्थाप्रमाणें वातावरण कांठोकांठ भरून टाकते आणि किरणांचे पंख पसरून नक्षत्रांचे थवे आकाशांत उडत असतात. तेव्हां ही जलराणी आगळ्या सौंदर्याची प्रचीति दाखविते. पौर्णिमेच्या रात्रीं तर जलदेवीच्या अंगांतून सौंदर्य निथळत नाचत असतें आणि चंद्र-प्रकाशांत न्हाऊन निघालेल्या तिच्या अंगकांतीची तरल शोभा रसिकाला सहजींच बेभान करूं शकते. निद्रेच्या हळुवार अंगुलीस्पर्शानें विचारांची शृंखला केव्हां खंडित झाली तें कळलेंच नाहीं.

अखेरीस मीं वॉर्ड सरोवर पाहिलें तें दुपारीं. मुद्दाम वेडावांकडा आकार देऊन, कडेला नागमोडी रस्ता बांधून, घनदाट वनश्रींत झांकून ठेवलेलें हें सरोवर निश्चित नौकाविहारासाठीं म्हणून बनविलें आहे. त्याच्या



हिरव्या-निळ्या विस्ताराच्या मधोमध एक पांढरा लांकडी पूल आहे.

केळीच्या मोठ्या पानाच्या मधोमध उठावदार पांढरी शीर असावी तसा. जलराणी व वनराणी यांचा संगम मग तो माणसानें घडवून आणलेला असो, अथवा निसर्गानें घडविलेला असो, सौंदर्यलक्ष्मीच्या पदझंकाराने निनादित होतोच होतो. त्याच पदझंकाराचें श्रुतिसंगीत ऐकत कितीतरी वेळ सरोवराच्या कांठानें सहल करीत गेलों मी. प्रत्येक कोंपऱ्यांकोंपऱ्यांतून सरोवराची शोभा वेगळीच दिसत होती. आणि फुलांफुलांतून मध गोळा करणाऱ्या मक्षिकेप्रमाणें मधुरीचा कॅमेरा ती शोभा टिपून घेत होता. मधुरी "चित्रलेखा", "बीज" व "जी" या तीन गुजराती मासिकांची संपादिका आहे. जीवनांतले सुख-दुःखाचे क्षण चटकन टिपून घेऊन त्यांना चिरंत चित्ररूप देण्याची असाधारण कला या मुलीला साधली आहे. कांहीं रूपगर्वित वृक्ष सरोवराच्या आरशांत आपलें रूप न्याहाळीत होते. मधुरीनें त्यांना आपल्या कॅमेऱ्यांत बंदिस्त करून टाकलें. एक लहानसा पक्षी जरासा स्पर्श करून गेला आणि सरोवराचा पृष्ठभाग अनेक लहरींनीं कंपित झाला. निश्चल पांढरा पूल पाण्यांत लपून हंसूं लागला. मधुरीच्या कॅमेऱ्यानें हें दुसरेंहि दृश्य चटकन् टिपून घेतलें. वरून ऊन मधून मधून तापत होतें त्यामुळें चेहरा लाल झाला होता. कपाळावर घर्मबिंदूंची जाळी उमटली होती, तरी शिवसाधना करणाऱ्या गिरिकन्येप्रमाणें मधुरीची चित्रसाधना चालूच होती. तिला कसलेंच भान नव्हतें आणि मला एकलव्याच्या एकाग्रतेचें क्षणोक्षणीं दर्शन होत होतें. अखेरीस उन्हें कललीं. पिंवळसर होऊं लागलीं. तेव्हां मी हळूच म्हणालों, "चहा." आणि मंत्रोच्चारित पाणी शिंपडल्यावर बेहोष मनुष्य एकदम भानावर यावा त्याप्रमाणें ती मुलगी आपल्या समाधींतून एकदम जागृतावस्थेंत आली.

'बरा बझार' हें शिलॉंगचें एक मोठें आकर्षण आहे म्हणतात. त्याची माहिती मिळविण्यासाठीं मी "डायरेक्टरेट ऑफ टूरिझम आसाम"च्या कचेरींत गेलों होतों. तिथला मुख्याधिकारी साडेतीन वाजतांच घरीं जाण्याच्या घाईंत होता. तरी सुद्धां मुंबईच्या हिंदू हॉटेलांतील पोऱ्या तयार जिनसांची यादी एका दमांत सांगतो त्याप्रमाणें त्यानें शिलॉंगमधील प्रेक्षणीय स्थळांचीं यादी आम्हांला भराभर सांगावयाला सुरुवात केली. "तुम्हीं शिलॉंगमध्यें प्रवेश केलांत कीं तुम्हांला सर्वत्र खासी स्त्रियाच

दिसतील. या स्त्रियांचें समाजांतलें स्थान लक्षांत घेण्यासारखें आहें. हे शिलाँगला " बरा बाझार " म्हणून एक मोठें मार्केट आहे. तिथली सगळीं खरेदी--विक्री खासी बायकाच करतात. मीं म्हटलें यांत नवल करण्यासारखें काय आहे ? आमच्या महाराष्ट्रांत देखील बायका खरेदी--विक्री करतात. महाराष्ट्रांतील बहुतेक मच्छिमार्केटें स्त्रियांच्याच हातांत आहेत. शिवाय आमच्याकडे खेड्यापाड्यांतून रोज भरणारे भाजी-बाजार बहुधा बायकाच चालवतात कीं, आश्चर्यचकित होऊन माझ्या तोंडाकडे पहात तो म्हणाला, " खरें ? मला नव्हतें हें माहीत ! परंतु आसाम सरकारच्या प्रवासपत्रिकांत प्रवाशांना सांगण्यासारखी म्हणून ती गोष्ट मुद्दाम नमूद केली आहे. तेव्हां तुम्हांला ती सांगितलीच पाहिजे असें वाटलें मला. " मी म्हटलें, " अहो, ही माहिती मुद्दाम नमूद करण्यांत आसाम सरकारचा नक्की कांहीं तरी हेतु असला पाहिजे. एक तर या खासी ललना फार सुंदर असतील अथवा त्यांचा पोषाख तरी फार सुरेख असेल. " त्यानें गंभीर चेहरा करून मला सांगितलें, " आपण म्हटलेल्या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत असें आसाम-सरकार मानतें. तुम्ही जरूर बरा बाझारांत, फेरफटका मारून या. " या टोकापासून त्या टोकापर्यंत बरा बाझारांत मी तीन–चार फेरे मारले आणि शेवटीं मनाशीं नक्की केलें कीं, मुंबईचा आपला " चिराबाझारच " अधिक प्रेक्षणीय आहे. मला वाटतें कालिदासाच्या " चकित हरिणी प्रेक्षणा " ललनांचा आदर्श मानणारा मीं दाराच्या फटींतून दिव्याचा अंधुक प्रकाश दिसावा त्याप्रमाणें जवळजवळ मिटलेल्या डोळ्यांतून नेत्रप्रभा फेंकणाऱ्या या खासी ललनांच्या चेहऱ्यांचें आणि त्यांच्या मळकट लोकरी कपड्यांचें सौंदर्य पारखण्याला संपूर्णपणें नालायक होतों.

एक संध्याकाळ धूसर, ओलसर, दिव्यांच्या मंद प्रकाशानें रंगलेली तिच्या प्रकाशांत शिलाँगच्या आडरस्त्यानें फिरतांना एक मजेदार प्रसंग घडला. किंचित् रुसलेला एक खासिया तरुण कुंपणाच्या भिंतीला टेकून उभा होता आणि त्याच्यापासून जरा दूर उभी राहून त्याच्याकडे मिस्किलपणें पहात एक खासिया तरुणी गाणें म्हणत होती. तिच्या गाण्याच्या प्रत्येक स्वराबरोबर त्या तरुणाचा चेहरा अधिकच चिडखोर बनत होता. कांहीं वेळानें तो तरुण तिथून झटक्यानें निघून गेला. ती तरुणी मात्र तशीच तिथें

उभी राहिली. मी पुढें होऊन त्या मुलीला विचारलें, "बेबी, तुला इंग्रजी येते का ?" अगदीं सफाईदार इंग्रजीमध्यें तिनें उत्तर दिलें. "जरूर जरूर इंग्लिश बोलूं शकतें मी." मग "मी म्हणालों, तूं आतां जें गाणें म्हणत होतीस त्याचा इंग्रजी अर्थ सांगशील मला ?" माझा विचित्र सवाल ऐकून त्या मुलीनें क्षणभर माझ्याकडे टक लावून पाहिलें व नंतर ती इतकी हसूं लागली कीं, मला वाटलें कीं हिचें हसूं आतां असेंच अखंड चालू राहाणार! दिलखुलास हसूं संपल्यावर त्या मुलीनें आपण गात असलेल्या गाण्याचा अर्थ सांगितला. "जाऊं दे. जाऊं दे मला. एका लहानशा होडींतून, ब्रह्मनदाच्या लाटांवरून, विशाल समुद्रांत. या चावट मुलीनें मला फसविलें. आरशासारखा सपाट आणि चंद्रासारखा सुंदर चेहरा असलेल्या या पोरीनें झोंपेंत माझें चुंबन घेतलें. पण जागेपणीं मात्र ती मला म्हणते 'गेंड्याचें शिंग तुझ्या पाठींत घुसलें तरी मला पर्वा नाहीं छट ! नाहीं माझें तुझ्यावर प्रेम ! जाऊं दे. जाऊं दे मला ब्रह्मनदाच्या लाटांवरून लहानशा होडींतून अनंत सागराकडे. नंतर अगदीं मोकळेपणाणें हंसत तिनें सांगितलें, "मेला लोचटासारखा माझ्या मागें मागें फिरत असतो तो." त्याची चेष्टा केली मीं. कसा रागावून निघून गेला ! तिला शाबासकी देऊन आणि तिचे आभार मानून मीं पुढें गेलों. मनांत विचार आला कीं, बेटा अर्जुन उगीच नाहीं एका पहाडी पोरीच्या मागें फिरला. नागीण जितकी जहरी तितकी ती कसलेल्या मदाऱ्याला अधिक आकर्षक वाटते.

६

वैराण भूमींतील उद्योगशील चेरापुंजी

सकाळच्या कोंवळ्या उन्हांत एस्. टी.ची गाडी चेरापुंजीला येऊन पोहोंचली आणि गांवांतल्या चेराबझारांतच थांबली. अजूनपर्यंत हिरव्या लुसलुशीत रंगांनी नटलेल्या जमिनी आणि मुक्त मस्त अरण्यांनीं झाकलेले डोंगर पहाण्याचा सराव झालेल्या नजरेला शिलाँग–चेरापुंजी रस्त्यावरील उघडे ओके माळ आणि बोडके खडकाळ डोंगर अगदींच अनपेक्षित होते. अनंत हातांनीं ईश्वरानें वरदान द्यावें, परंतु कर्मदरिद्री माणसाच्या फाटक्या झोळींतून तें सारें निसटून जावें त्याप्रमाणें पुष्कारावर्तकांनीं अनंत धारांनीं वरसावें परंतु चेरापुंजीच्या धरतीनें मात्र कोरडें ठणठणीत राहावें असा क्रम आज वर्षानुवर्षें चालला आहे. पर्जन्यवृष्टीचा जागतिक उच्चांक गांठणाऱ्या या भूमीवर वरुणराजानें पांचशेंच काय परंतु नऊशें इंचपर्यंत पर्जन्यवृष्टी केली आहे; परंतु हिंवाळ्यांत देखील चेरापुंजीच्या खासिया ललनांना घोटभर स्वच्छ पाण्यासाठीं वणवण फिरावें लागतें. वर्षा येतो हर्षानें. थयथय नाचत येतो आणि तो येऊन गेल्याची खूण म्हणून या वैराण भूमींत फक्त इंद्रधनूचीं फुलें खडकांच्या फटींतून जागोजाग उमलतात. बाकी सर्वत्र शुष्क. आसाममध्यें सर्वत्रच मऊ सुपीक जमीन असतांना चेरापुंजीलाच जवळ जवळ साडेचार हजार फूट उंचीवर ही खडकाळ जमीन कशी पैदा झाली हें एक कोडेंच आहे. कुणा भूस्तर–शास्त्रज्ञानें तें उलगडलें असल्याचें मला माहीत नाहीं. निसर्गाचा एक नियमच आहे कीं जमीन फलद्रूप नसली कीं त्या जमिनीवर जगणारा माणूस महा-उद्योगी बनतो. सह्याद्रीच्या पश्चिम

भागाला कोंकणांत घनघोर पाऊस पडतो. परंतु त्या खडकाळ जमिनीवर पडणारें पाणी सगळेंच्या सगळें समुद्राची भर करतें, त्यामुळें पोटापुरती पैदास करायलाहि कोंकणांतल्या शेतकऱ्याला छाती फुटेपर्यंत परिश्रम करावे लागतात. चेरापुंजीचें कोंकणभूमीशीं बरेंच साम्य आहे. पाऊस अमाप पण पाणी सगळें निचरून वाहून गेलेलें. त्यामुळें कोंकणी शेतकऱ्याप्रमाणें इथल्या माणसालाहि पोटापुरतें मिळवण्याला फार परिश्रम करावे लागतात. चेरापुंजी व आसपासचा बहुतेक प्रदेश पहाडी खासी लोकांनीं व्यापलेला आहे. या प्रदेशांतून फिरतांना पत्र्याची चंदेरी छपरें असलेल्या लहान लहान घरांचे पुंजके म्हणजेच खासी जमातीचें एक एक खेडें असतें. घरें आंतून बाहेरून व्यवस्थित, घरासमोर झेंडूच्या नानारंगी फुलांची लहानशी बाग आणि जवळच थेंबभर पाणी असलेल्या वहाळाचा पट अशीं या खासी लोकांची वसाहत मोठी चित्रसुंदर दिसते. मुळांत उद्योगी व त्यांत परदेशी ख्रिश्चन मिशनरींचा सहवास, त्यामुळें इतर पहाडी टोळ्यांपेक्षां या लोकांत विलायती झिलई जास्ती.

चेराबझारांत एस्. टी. च्या स्टँडसमोरच एका खासी बाईचें फराळाचें दुकान होतें. त्यावर इंग्रजींत पाटी होती, " उत्तम पाव बनविणार श्रीमती ××× " आसामी लोकांचें मुख्य अन्न भात. पण इथें पाव अथवा बनपाव यांचाच वापर अधिक. युरोपिअन पाद्री जिथें जिथें जातो तिथें तिथें आपल्या बरोबर चार गोष्टी नेतो. बायबल, दारू, डान्स व पाव आणि चार गोष्टींचा नाश करतो. मूळधर्म, पोषाख, संस्कृति आणि राष्ट्रीयत्व. आसाममध्येंहि परकी कॅथॉलिक व तत्सम मिशनऱ्यांनीं हेंच केलें. फक्त अमेरिकन बाप्टिस्ट मिशनरी प्रचारकांनीं जिथें जिथें धर्मप्रचार केला तिथें तिथें त्यांनीं बाट-विलेल्या लोकांमधील दारूचें उच्चाटन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. याच मिशनरी लोकांनी आणखी एक चांगली गोष्ट केली ती म्हणजे त्यांनीं पहाडी लोकांना डोंगराच्या उतारावर हिंवाळ्यांत सुकी शेती करून गव्हाची पैदास करावयास शिकवलें. इतकेंच नव्हे तर त्या गव्हापासून पाव बन-विण्याची कलाहि त्यांनीं पहाडी लोकांना शिकविली. ' उत्तम पाव बनविणार श्रीमती × × × ' च्या दुकानांत खरोखर उत्तम अशा चहाचा स्वाद घेत अर्धा तास थांबलों होतों. स्थानिक " खासी " लोकांची दुकानांत सारखी

ये-जा चालू होती. अर्ध्या तासांत धडपणें इंग्लिश बोलतां येणारा एकहि माणूस आढळला नाहीं. इतकेंच काय पण जुजबी हिंदी समजणारी व्यक्तीहि पण सांपडली नाहीं. उपाहारगृहाच्या मालकिणीला ब्रेड, मटण, चिकन व चा हे चारच शब्द माहिती होते. चहा व फराळाचे पैसे किती तेहि तिला सांगतां येईना. अखेरीस रुपयाची मोड तळहातावर घेऊन मी तिच्यापुढें केली. तेव्हां इमानाने त्यांतले फक्त सात आण्याचे पैसे तिनें उचलून घेतले.

चेराबझारांतून फेरफटका मारतांना मनांत येतें कीं, चेरापुंजीला परमेश्वर अनंत हस्तांनीं पावसाच्या घागरी खालीं करीत असतो. त्याचप्रमाणें मधून मधून अनंत हस्तांनीं संत्र्याच्या टोपल्याहि उपड्या करीत असला पाहिजे. तरुणी कुंचासारख्या टचटचीत हिरव्या हिरव्या गार संत्र्यांनीं भरलेल्या शंकूच्या आकाराच्या टोपल्या पाठीवर घेऊन खासिया तरुणी जेव्हां दाटी-वाटीनें बाजारांत घाईघाईनें वावरतात तेव्हां गोकर्णीच्या आकाराच्या हिरव्या फुलांचा बगीचाच वाऱ्यावर हालतो आहे असें वाटतें. त्यांत आणखी बाजारांत खरेदीसाठीं इकडून तिकडे फिरणाऱ्या खासिया गृहां-गनांच्या पोषाखाच्या विविध रंगांचें मिश्रण सुंदर रंगचित्रच डोळ्यांसमोर लयींत हालत राहातें आणि मन म्हणतें शुष्क धरित्री झेलीत बसली! ईशमनांतील रंगीत स्वप्नें पुढारलेल्या म्हणा अथवा सुधारलेल्या म्हणा खासिया स्त्रियांचा पोषाख मात्र विचित्रच वाटतो जरा! मैदानांतील आसामी स्त्रियांचा नेहमींचा पोषाख म्हणजे मेखला आणि चादर. म्हणजेच शुद्ध मराठींत परकर व पदर. प्रथम परकर नेसावयाचा व त्यांत पंचेवजा लांब कापडाचा एक तुकडा खोवून तो पदरासारखा वक्षःस्थलावरून ओढून खांद्यावर घ्यावयाचा. दुरून हा पोषाख पांचवारी पाटलीपालव नेसल्यासारखा दिसतो. मैदानांतील लोक पुढारलेले. तेव्हां त्यांचा पायघोळ मेखला व चादर हा पोषाख पहाडी स्त्रियांनींहि उचलला. पुढें बायबल घेऊन साहेब गांवांत आला. त्यानें भाषा, धर्म, पोषाख, फार काय देश आणि खंड यांच्याविषयींहि लाज बाळगण्याची शिकवण द्यावयाला सुरुवात केली. आणि स्वतःच्या गोऱ्या बायकोचा लांडा झगा सुंदर पोषाखाचा आदर्श नमुना म्हणून पुढें केला. मेखला गुडघ्यापर्यंत कापून मडमिणीच्या झग्याचें अनुकरण पहाडी पोरींनीं चटकन् केलें. पण वक्षःस्थल पदरानें झांकण्याची देशी शालीनता

मात्र त्यांच्यानें सोडवेना. परंतु लांड्या परकरावर पदर चिटकविलेला पोषाख तर अगदींच विचित्र दिसूं लागला. तेव्हां घराबाहेर पडतांना



काश्मिरी केपसारखी एक लोंकरी शाल पदरावरून गुंडाळली गेली. आणि म्हटलं तर पदर आहे, म्हटलं तर पदर नाहीं असा " मकला " " इन्स्टी " व " जीनसा " यांचा थ्रीपीस पोषाख तयार झाला. चर्च

व युरोपियन संस्कृतीशीं संबंध येणाऱ्या खासिया ख्रिश्चन मुलींना संपूर्ण-पणें नाहीं तरी अर्धवट मडमीण झाल्याचें समाधान मिळालें.

मला नेहमीं वाटतें कीं, धर्मपरिवर्तनासाठीं देशांत येणाऱ्या परकी मिशनऱ्यांना स्थानिक लोकांच्या संस्कृतीशीं आणि राष्ट्रीयत्वाशीं खेळ खेळण्याची संधि कधींहि मिळतां कामा नये. दूर दूर असणाऱ्या आसामच्या टेकड्यांतच कशाला पण देशाचें नाक समजलें जाणाऱ्या मुंबईसारख्या शहराच्या परिसरांतच परकीयांच्या या आक्रमणाचें दुष्परिणाम सहज पहावयाला मिळतात. वांद्र्याला मंगळूरच्या ख्रिश्चन लोकांची पुष्कळ वस्ती आहे. त्यांच्यांतल्या बहुतेक मुली साडी नेसतात. क्वचित् कुंकूहि लावतात व घरींदारीं शक्यतों कोंकणीच बोलतात. उलट अजूनपर्यंत परदेशी धर्मगुरूसमवेत स्वतःला पुढारलेले समजणाऱ्या ईस्ट इंडियन ख्रिश्चनांची रीत पहा. आपली मातृभाषा मराठी आहे अथवा होती हें कबूल करावयाची लाज वाटते त्यांना ! त्यांच्यापैकीं कांहींना तर आपला जन्म टेम्स नदीच्या कांठीं झाला असें खरोखर वाटत असतें. आपली संस्कृति अगदीं गाळीव इंग्रजी आहे असा आव आणून आपण अगदीं अ-महाराष्ट्रीयच काय पण अ-हिंदीहि आहोंत, असा तोरा मिरवावयाची त्यांची हौस पाहिली कीं, हसूं येतें. भारतानें गोवें घेतलें याचा आनंद होण्याऐवजीं भारतांतली एक कॅथोलिक राज्यसंस्था नष्ट झाली याचें आपणांस दुःख होतें असे त्यांच्यापैकीं कित्येक जणांनीं उघड बोलून दाखविलें होतें त्यावेळीं.

भारत निधर्मी किंवा सर्वधर्मी राज्य आहे. तेव्हां या राष्ट्रांत धर्माच्या बुरख्याखालीं अराष्ट्रीय मनोवृत्तीची बीजें पेरून पुढें-मागें राज्यसत्तेला नमवावयाला हरकत नाहीं अशी चुकीची कल्पना अनेक परकीयांच्या मनांत घर करून बसलेली आढळते. म्हणून आसामांत असो वा महाराष्ट्रांत असो परकी मिशनऱ्यांच्या हालचालीवर सक्त नियंत्रण ठेवलें पाहिजे. आणि त्यांच्या तंत्राखालीं असणाऱ्या प्रजेंत स्वदेश व स्वसंस्कृति यांच्या—विषयीं असीम प्रेम निर्माण होईल अशा शिक्षणाची तरतूद केली पाहिजे. आसामच्या पहाडांतील खासी व तत्सम इतर प्रजा या भारतीय संरक्षण व्यवस्थेचा एक मोठा आधार आहे. दुर्दैव असें कीं, या अशा प्रजांमध्यें जाज्वल्य देशाभिमान निर्माण करण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न कोणीच केल्याचें

आढळत नाहीं. बेवारशी कोंकरांप्रमाणें ही प्रजा या पहाडांतून वावरत असते. तिला भारताविषयीं कांहींहि माहिती नाहीं. कांहींहि आकर्षण नाहीं. भारतांतील इतर प्रजेशीं तिचा कोठलाहि संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झालेला नाहीं. उलट आसामांतील दोन वेगवेगळ्या शासनयंत्रणांमुळें ही प्रजा इतर प्रजेपासून हळूहळू दुरावली जात आहे.

शिलाँगमध्यें पाऊल टाकल्यापासून एका विचारानें मन सारखें अस्वस्थ होत होतें. चेरापुंजींत त्या विचारांचें ताण्डव मनांत घुमूं लागलें. या पहाडी जनतेचें सैनिकीकरण करण्याचा कुणीच कसा प्रयत्न केलेला नाहीं. भारतावर जेव्हां परकी आक्रमण होईल तेव्हां याच प्रजेला शत्रूशीं प्रथम मुकाबला कराव लागणार. याच प्रजेला युद्धाची पहिली झळ लागणार! हें ध्यानांत घेऊन या प्रजेची निदान स्वसंरक्षणापुरती सैनिकी तयारी कोणीतरी करवून घ्यावयाला पाहिजे होती. तीन वर्षांपूर्वीं (२५ ऑगस्ट १९५९) तीनशें चिनी सैनिकांनीं भारताच्या ईशान्य सीमेवर आक्रमण केलेलें आहे. लांगजू ठाण्यावर पहारा देत असलेल्या जवानांपैकीं कांहींना त्यांनीं ठार केलेलें आहे. प्रांत सरकारला व संरक्षण खात्याला याचा विसर तर नाहीं ना पडलेला? "चीनचे पंतप्रधान चौ–एन्–लाय यांच्या-विषयीं माझे मनांत नितान्त आदर व प्रगाढ प्रेम आहे" असे उद्गार श्री. कृष्ण मेनन यांनीं मुंबईत १० सप्टेंबर १९५९ रोजीं काढले होते. चिन्यांनीं भारताच्या सीमेवर हल्ला केल्यानंतर बरोबर पधरा दिवसांनी! पण खरोखरच अजूनहि त्यांचे तेंच मत आहे कीं काय? एस्. टी. बस्चा हॉर्न जोरांत वाजला आणि विचारांची शृंखला तुटली. चेराबझारांत थांबलेली बस पुढें पांच मैलांवर असलेल्या मॉब्लांगच्या शेवटच्या स्टँडवर जाण्यासाठीं निघाली होती.

७

आसामच्या लोकजीवनांतील असह्य घोष " लाहे लाहे "

मॉब्लांग हें पांच-पंधरा घरांचें एक चिमुकलें खेडें आहे. तेथील सगळीं घरें खासी जमातीचींच आहेत. गांवांतील बाजाराच्या पसाऱ्यांत, रोज येणाऱ्या एस्. टी. च्या गाड्यांचें ड्रायव्हर्स व क्लीनर्स यांच्या आश्रयावर चालणारीं एक-दोन चहाचीं दुकानें, एक विडी-काडीचें दुकान व एक किराणा मालाचें दुकान इतक्यांचा समावेश होतो. चेरापुंजीहून आलेले पाव कांचेच्या पेटींत ठेवून एक म्हातारी बाजारांतील एका घराच्या ओट्यावर गिऱ्हाइकाची वाट पहात बसलेली असते. गांवाच्या आजूबाजूला सगळीकडे माळजमीनच आहे. तिच्यावर मधून मधून सफेद गवती फुलांचे पुंजके आणि त्या पुंजक्यांत तुरळकपणें लाजरीचीं परागमय गोंडेदार नाजुक लहानशी गुलाबी फुलें फुललेलीं दिसतात. बाकी इतरत्र तऱ्हेतऱ्हेच्या आकाराचे खडक पावसाळ्यांत पांघरलेली शेवाळाची मळकट हिरवी शाल पांघरून उभे असतात.

तासाभरापूर्वींच मी चेरापुंजीला चहा घेतला होता. तरीहि इथल्या चहाच्या दुकानांत शिरलोंच. दुकानाच्या दारांत वासूनें मला हटकलें. " किती चहा पिशील ?" मी मनांत म्हटलें, चहा व चुंबन यांची गोडी अवीट असते. पुराणपुरुषा, तुला कसें समजावून सांगूं हें ? दुकानाची मालकीण मालकिणीच्या तोऱ्यांत सगळा कारभार करीत होती. ऑम्लेट, टोस्ट, चहा भराभर बनवून तिनें माझ्या पुढ्यांत ठेवलें. तोंपर्यंत तिचा मालक मात्र खिडकीशीं अबोलपणें निश्चल बसून होता. अगदीं एखाद्या अचेतन

पुतळ्यासारखा. कुतूहल म्हणून त्याच्याजवळ जाऊन बसलों मीं. गृहस्थाच्या डोळ्यांतली बाहुली खूप खूप आकुंचन पावली होती. माझ्या लक्षांत आलें कीं " हाँगकाँग " च्या चिनी लोकांप्रमाणें खासी लोकांतहि अफू ओढण्याचें व्यसन आहे.

मॉग्लांगहून चेरापुंजीला परत चालत जावयाचें आणि जातांना वाटेंतला धबधबा पहावयाचा असा विचार करून निघालों. कां कोण जाणें ? मॉब्लांग चेरापुंजीच्या उघड्या माळावरचा रुंद रस्ता जणुं कांहीं नेहमींचाच रोजच्या ओळखीचाच असा भासत होता. स्मृतिकोशांत खोल कोठें तरी अंधुक चाळवाचाळव झाल्यासारखें वाटलें. परंतु हा रस्ता असा ओळखीचा कां वाटतो याचें कारण सांपडेना. कित्येकदां एखादें दृश्य पाहून आपल्या मनांत पुसट असे जाणिवेचे तरंग उठतात. परंतु त्या तरंगांची निश्चित रूपरेषा साकार होतच नाहीं. गडद काळोखांत काडी पेटवावी पण ती वाऱ्यानें चट्कन विझून जावी आणि हवी ती वस्तू समोर दिसली असतांहि गोंधळून चांचपडत राहण्याचा प्रसंग यावा त्याप्रमाणें कांहींतरी एखादा प्रसंग, एखादें दृश्य या रस्त्याशीं निगडित आहे. परंतु तें हातीं येत नाहीं असें सारखें वाटत होतें. मनांत अशी कांहीं चाळवाचाळव होत होती तोंच मागच्या बाजूनें वाऱ्यावर तरंगत येणारे दाट पांढरे ढग अंगावर कोसळले. आणि माझ्यापुढें गेलेल्या सोबत्यांना अदृश्य करीत तिथेंच बसून राहिले. भोंवतालच्या जीवनाशीं सभोंवार वावरणाऱ्या माणसांशीं जोडणारा दुवा एकदम तुटल्यासारखा झाला आणि शून्य निर्मनुष्य पर्वतावर आकाशाकडे पहात राहिलेल्या एकाकी यक्षाप्रमाणें मन क्षणभर अचेतन होऊन बसलें. पण हें सगळें क्षणभरच. माणसाच्या मनाप्रमाणें ढगालाहि स्थिर रहाणें मानवत नाहीं. आपल्या शुभ्रांगाचा पडदा उभारून वासू व मधु यांना एखाद्या जादूगाराप्रमाणें अदृश्य करणारा — लपवून ठेवणारा- ढग पुढें सरकूं लागला आणि त्याचे अनेक सूक्ष्म बिंदू सद्यस्नातेच्या ओलसर कुन्तलासारखे सुखद स्पर्श करीत विरून गेले.

क्षणापूर्वीं वातावरण स्वच्छ होतें. तिथें अचानक पंढरपूरच्या वाटेवरी एखाद्या भाविक वारकऱ्याप्रमाणें गडबडा लोळत हे ढग आले तरी कुठून असा विचार माझ्या मनांत आला. तोंच एखाद्या मनकवड्यानें उत्तर द्यावें

त्याप्रमाणें वासू म्हणाला, " डॉक्टर, दोन–तीन हजार फुटांचा खडा पहाड चढून ढगांची ही फौज येऊं लागली आहे आतां. "

खालींच सध्यां पाकिस्तानांत असलेला सिल्हेटचा विस्तीर्ण मैदानी प्रदेश पसरला आहे. त्याच्या एका कुशीला जवळजवळ साडेचार हजार फूट उंचीचा सरळ भव्य कडा आहे. जणू खालच्या प्रदेशावर नजर रोखून ताठ उभी असलेली प्रचंड नागफणाच. अशा कड्याच्या मस्तकावर चेरापुंजीचा परिसर वसला आहे. मला वाटतें शेषमस्तकावरील गेंदाचें फूल मागण्यापूर्वी श्रीकृष्णानें सिल्हेटच्या मैदानांत उभें राहूनच धनुर्धारी पार्थाला त्याची ही प्रचंड फणा दाखविली असावी. याच मैदानांत सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत रात्रींच्या हृदयांतला ओलावा संथ झिमधार जमत असतो. कड्याखालची पोकळीहि तळमळत राहिलेल्या खंडितेच्या उशीप्रमाणें त्या ओलाव्यानें अक्षरशः भिजून जाते. नंतर पहाट फुटते आणि तिच्या मागोमाग सूर्याचीं उष्ण पावलें पूर्वेच्या क्षितिजावरून येतात. थिजलेलें, भिजलेलें वातावरण त्या पावलांनीं चाळवलें जातें आणि क्षणांत सुसंस्कृत मनुष्याच्या प्रगतिशील मनाप्रमाणें ऊर्ध्वगामी होऊं लागतें. वरवर उसळणाऱ्या हवेबरोबरच रात्रभर ओघळलेला ओलावा घनरूपानें साकार होऊं लागतो. आणि हिमगिरीच्या शिखरांशीं स्पर्धा करणारे पांढऱ्या ढगांचे डोंगर तरंगत तरंगत डोंगरमाथ्यावर चढूं लागतात. त्यांतल्याच एका डोंगरानें मी व माझे सोबती यांच्यामध्यें थपकल मारली होती. त्यांतलेच कांहीं कड्याच्या उतरत्या कपारींतून फुललेलें निळें हिरवें शाश्वत शिल्प भासमय करूं पहात होतें. त्यांतलेच एक-दोघे चेरापुंजीच्या माळावर निःस्तब्ध उभ्या असलेल्या एका उंच खडकाभोंवतीं वाऱ्याचा हात धरून गरगर फिरूं लागले आणि फिरतां फिरतां सूर्यकिरणांतून उडालेल्या रत्नांच्या रंगपरागांत मिसळून गेले.

थोडें अंतर चालून गेलों आणि शिवमंदिराच्या गाभाऱ्यांतून संथ लयींत ॐकार नाद ऐकूं यावा त्याप्रमाणें बाजूच्या घळींतून घनगंभीर घोष ऐकूं येऊं लागला. " नक्की आपण धबधब्याजवळ आलों " मधुरी म्हणाली. आणि कड्याच्या अगदीं कडेला जाऊन उभी राहिली. त्या कड्याच्या कडेला जाऊन उभें राहाणें म्हणजे जीवनाच्या कडेला जाऊन उभें राहाण्या-

सारखेंच होतें. परंतु कॅमेऱ्यांत एखादें सुंदर दृश्य पकडण्याच्या भरांत स्वतः-वरच अदृश्य होण्याचा प्रसंग येणें शक्य आहे याचें त्या नादिष्ट मुलीला अनेक वेळां भान राहत नाहीं. तिला वाटलें होतें कीं, घोंघावत पडणाऱ्या प्रचंड धबधब्याचें सुंदरसें चित्र आपल्याला घ्यावयाला मिळेल. पण आयुष्यांत जें अत्यंत तीव्रतेनें, अत्यंत उत्कटतेनें मिळावेंसें वाटतें, तें कधीं कधीं मिळत नाहीं. दैव एखाद्या फसव्या जादूगाराप्रमाणें हातटाळी देऊन निघून जातें याचा तिला अनुभव आला. वाऱ्यानें फटकाविल्यामुळें मघाशीं आमच्या अंगावर कोसळलेल्या ढगांचें कांहीं सगेसोयरे त्या घळींत उतरले होते. आणि दृष्ट लागेल म्हणून पोराला पट्कन पदराखालीं घेणाऱ्या आईच्या थाटांत त्यांनीं खालीं धांवणाऱ्या धबधब्याला झांकून टाकलें होतें. त्या धबधब्याला मधुरीच्या कॅमेऱ्याची दृष्ट लागावयाची नव्हती.

चेरापुंजीला पोहोंचेपर्यंत रस्त्यावर आणखी तीन गोष्टी नजरेला पडल्या. एक चर्चची इमारत. एक रामकृष्ण मिशनची इमारत व एक स्मशान. चर्चच्या नांवानें परिसरांतला सर्वच कारभार चालू होता. रामकृष्ण मिशन नांवालाच उभें होतें. आणि जिथें नांवहि शिल्लक राहात नाहीं असें स्मशान मात्र नांव घेण्याइतक्या सुंदर तऱ्हेनें झोंपलें होतें. चारी बाजूला लहान लहान हिरवट–निळसर रंगांच्या टेकड्या, मध्येंच एक झुळझुळता वहाळ, त्याच्या दोन्ही बाजूला रेशमासारखें झुळझुळीत गवत आणि त्या गवतावर झुलणारीं "ब्लू ॲडमिरल" फुलपांखरें. निळ्या रंगाच्या चमकदार छटा उधळीत मध्येंच भुर्रकन उडणारीं. मनांत आलें, अशा सुंदर शांत ठिकाणीं चिरनिद्रा घेणारा खरोखरच भाग्यवंत.

चेरापुंजीहून परतीची गाडी मिळाली अगदीं कातरवेळेला. मात्र त्या वेळीं घड्याळांत पांचच वाजले होते. शिलाँगला पोहोंचलों तों काळोखी रात्र थंडीनें कुडकुडत होती. आकाशांतला चंद्रमा राजीनामा देऊन निघून गेला होता आणि गगन–मंडळाचें राज्य तारकांच्या लोकसत्तेच्या हातांत आलें होतें. मनांत आलें कीं, घनांधःकाराला देखील त्याचें आगळें आकर्षण आहे खरें ! साऱ्या पृथ्वीला पोटांत घेऊन कसा ऐसपैस पसरला आहे उचंबळ नाहीं, क्षोभ नाहीं, अपरंपार गंभीर. शिलाँग ते गोहाटी पुन्हा

प्रवास. पुन्हा तेंच सौंदर्यदर्शन. परंतु मीं या वेळीं त्या सौंदर्याचें रसपान करण्याच्या मनोवृत्तींत नव्हतों.

लढाई सुरू झाली होती. तरीदेखील गोहाटींत—आसामच्या राजधानींत-फंड गोळा करण्यापलीकडे कांहींच हालचाल दिसत नव्हती. केंद्र सरकार, प्रांतिक सरकार व स्थानिक प्रजा लढाई कशाशीं खातात हें कल्पनेंतहि माहिती नसल्यासारखी वागत होती. सगळें जीवन सगळे व्यवहार नेहमींप्रमाणें " लाहे लाहे " चालले होते. फक्त सांवरीचे बोंड फुटून कापूस उडावा त्या-प्रमाणें तऱ्हेतऱ्हेच्या अफवा मात्र वाऱ्यावर उडत होत्या. या अफवांच्या मागें राष्ट्रद्रोही कॉम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी यांचा हात होता हें सहज कळून येत होतें. हें सगळें असें कां ? या विचारानें मन सुन्न होत होतें. तिबेट गिळंकृत केल्यावर चीनचीं पावलें भारताच्या दिशेनें पडूं लागणार याची कल्पना भारतांतील सर्वच विचारवंतांना आली होती. १९५० साली कै. डॉ. शामाप्रसाद मुकर्जींनीं लोकसभेंत या प्रश्नाचा ऊहापोह केला होता. १९५४ व १९५५ सालीं चीनचे पंतप्रधान चाउ- एन्- लाय भारतांत येऊन ' हिंदी-चिनी भाई-भाई ' च्या घोषणेला मिस्किलपणें हंसत होते. त्या-वेळींहि कांहीं प्रजासमाजवादी पुढाऱ्यांनीं त्यांच्याबद्दल धोक्याची सूचना दिली होती. प्रजासमाजवादी पुढारी हेम बारुआ यांनीं तर आपल्या " लाल नदी, निळे डोंगर " या पुस्तकांत नेफामधील संरक्षण-व्यवस्था कां व कशी सुधारावयाला पाहिजे याविषयीं सूचना केल्या होत्या. १९५९ सालीं चिनी सैनिकांनीं लॉंगजूवर हल्ला केला आणि त्यानंतर दोनच आठवड्यांत डॉ. कुंझरूंनीं लोकसभेंत उघडपणें आरोप केला कीं, "चीनच्या भारतावरील आक्रमणाची माहिती नेहरू लोकांपासून लपवून ठेवीत आहेत. १९५९ सालींच सिक्कीममध्यें श्री. आप्पासाहेब पंत भारताचे वकील म्हणून काम करीत होते. त्यांच्यासारखा चतुर माणूस सरहद्दीपलीकडे काय चाललें आहे याकडे अगदींच डोळे मिटून बसला असेल असें कुणींहि मानूं शकणार नाहीं. ता. २० एप्रिल १९६० रोजीं डॉ. कुंझरूंनीं लोकसभेंत संरक्षण-मंत्र्यावर 'देशाचा आणि बऱ्याचशा कॉंग्रेसवाल्यांचाहि विश्वास नाहीं ' असें म्हणून कृष्ण मेनन यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. श्री. कामत यांनीं तर भारत-तिबेट सरहद्दीवर काय चाललें आहे याविषयीं संपूर्ण

माहिती देणारी पुस्तिकाच छापली होती. या अशा सावधगिरीच्या सूचना मिळत असूनहि आसामांत लढाईची राहो, पण स्वसंरक्षणाचीहि तयारी असूं नये याचें आश्चर्य वाटत होतें. या परिस्थितीला भारताचा गांधीनिष्ठ पंतप्रधान जबाबदार कीं छुपा साम्यवादी संरक्षण-मंत्री जबाबदार असा प्रश्न वारंवार मनापुढें येत होता. बसल्या बसल्या माझ्या हातून एक व्यंगचित्र अभावितपणें रेखाटलें गेलें. बायोनेट लावलेली बंदूक घेऊन चौऊ-एन्-लाय भारताच्या रोखानें चालूच येत आहे व हातांत क्रिकेटच्या बॅट्स् घेतलेले नेहरू व मेनन त्यांच्याकडे पाहून म्हणत आहेत, "ए मित्रा, तुझीच वाट पहात होतों आम्ही." तें व्यंगचित्र पाहून वासू व मधुरी या दोघांनाहि राग आला. वासू नेहरूंचा संपूर्ण पक्षपाती आहे. नेहरूंच्या राजनीतीवर त्याचा नितान्त विश्वास आहे. आणि म्हणूनच तो मेननचे सर्व दुर्गुण माफ करूं शकतो. मधुरी मुंबईतील बहुसंख्य गुजराती स्त्रियांप्रमाणें काँग्रेसवर अंधश्रद्धा राखते. मेनन-कृपालानी निवडणुकीच्या वेळीं तिच्या 'चित्रलेखा' या साप्ताहिकांत कृपालानींना विरोध करणारें व मेननची बाजू उचलून धरणारें लिखाण नेहमीं येत असे. व्यंगचित्रावरून आमच्या वादविवादाला सुरुवात होणार इतक्यांत गोहाटीमधील आमचे मित्र श्री. नानुभाई मेहता काझीरंगा येथील वनस्थळी पाहाण्याची आमची सोय कशी करतां येईल याचा विचारविनिमय करण्यासाठीं आमच्या खोलींत आले.

ऐन दुपारच्या उन्हांत नदीच्या संथ पाण्यांतून वालुकामय शुभ्र तळ दिसावा, त्याप्रमाणें आकर्षक स्मितानें उजळलेल्या चेहऱ्यांतून सुंदर अंतरंगाचें सहज दर्शन घडविणाऱ्या व्यक्तींमध्यें नानुभाईंची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. केवळ काझीरंगा येथील पशुस्थलींचीच नव्हे तर आसाममधील ब्रह्मपुत्राच्या कांठानें जाणाऱ्या राष्ट्रपथावरील गोहाटीपासून दिग्बॉयपर्यंतच्या स्थानांची माहिती त्यांनीं आणली होती, आणि मोठ्या बारकाईनें आमच्या प्रवासाची आंखणी केली होती. फक्त डेल कार्नेजीच्या पद्धतीप्रमाणें स्वतः केलेल्या महत्त्वाच्या कामाचें मोठेंपण स्वतःकडे न घेतां तें आमच्याकडे देण्याचा विचार होता. त्यालाच विचारविनिमय असें गोंडस नांव देऊन आमच्याबरोबर गप्पा मारावयाला ते आले होते. बोलतां बोलतां त्यांनीं एक सूचना केली, "वाटेंत कदाचित् लष्करी अधिकारी

तुमची खासगी गाडी कब्जांत घेणें शक्य आहे. तसें होऊं नये म्हणून तुम्हीं इथल्या डॉ. एस्. पी. कडून एक शिफारसपत्र मिळवून ठेवावें हें उत्तम." मीं म्हटलें, "लष्कराकडे लष्करी गाड्या असतात. वाटेनें जाणाऱ्या खासगी गाड्या लष्करी अधिकारी ताब्यांत घेतात ही निव्वळ अफवा असली पाहिजे." त्यांनीं उत्तर दिलें, "बऱ्याचशा जीप्स सरकारनें ताब्यांत घेतल्याची बातमी आहे. तेव्हां आपण बेसावध राहूं नये. प्रत्यक्ष डी. एस्. पी. लाच भेटूं या म्हणजे खऱ्या-खोट्याचा आपोआपच उलगडा होईल." झालें त्याच पावलीं मी व नानुभाई मिळून डी. एस. पी. कडे गेलों. साहेब कुणाशीं तरी टेलिफोनवर बोलत होते. त्यांनीं हातानेंच आम्हांला आंत येऊन खुर्चीवर बसण्याची खूण केली. मला मागाहून समजलें कीं, नानुभाईची त्यांच्याशीं फार चांगली ओळख होती. बराच वेळ झाला तरी त्याचें टेलिफोनवरील संभाषण संपण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां माझ्यापाशीं असलेल्या वहींत त्यांना भेटण्याचा माझा उद्देश मीं चार ओळींत लिहिला व वही त्यांच्यासमोर सरकाविली. टेलिफोनवर बोलतां बोलतांच मी लिहिलेला मजकूर वाचून माझ्या लिखाणाखालीं त्यांनीं उत्तर लिहिलें. "तुम्ही बेशक जाऊं शकतां. सरकार खासगी मालकांच्या गाड्या वेठीला घेत नाहीं." त्यांचे आभार मानून आम्ही त्यांच्या बंगल्यांतून बाहेर पडलों.

रस्त्यावर आलों तों पलिकडच्या बाजूच्या विजेच्या खांबावर बसलेला एक काळा पक्षी जोरानें उडाला. आणि आपले विस्तीर्ण पंख निश्चल ठेवून तरंगत खालीं येणाऱ्या एका घारीनें निमिषांत पलटी घेऊन पळ काढला. मुठी एवढ्या लहानशा पक्ष्यानें मोठ्या घारीवर हल्ला करून तिला पळवून लावलें याचें मी मनांत कौतुक करीत होतों. तेवढ्यांत तो पक्षी पुन्हा त्याच तारेच्या खांबावर येऊन बसला आणि मला त्याची चटकन् ओळख पटली. "कोतवाल" पक्षी होता तो. विहंगमसृष्टीचे अभ्यासक या चिमण्या पाखराला "पक्षि-सृष्टींतील नेपोलियन" म्हणून ओळखतात. "जो आक्रमण करतो तोच विजयी होतो." हें नेपोलियनचें वचन या पक्ष्याचें जीवनसूत्र आहे. दोन फांटे असलेली सात इंच लांबीची शेवटी व अवघें सहा इंच शरीर मिळून तेरा इंच लांब असलेला हा लहानसा पक्षी! त्याची शक्ति ती किती? पण केवळ हिंमतीच्या बळावर घारीपासून कावळ्यापर्यंत साऱ्या आक्रमक

पक्ष्यांना हा पक्षी 'त्राही भगवान् करून टाकतो' त्याच्या हद्दींत चुकून जरी एखादा शिकारी पक्षी शिरला तरी तीरासारखी झेंप घेऊन " कोतवाल " त्या पक्ष्याला पार हद्दपार करून टाकतो. त्याच्या या पराक्रमावर विश्वास ठेवून " पीळक " वगैरे लहान पक्षी त्याच्याच आश्रयानें आपलीं घरटीं बांधीत असतात. पक्षिसृष्टीवर पुस्तकें लिहिणाऱ्या सलीम अलीसारख्या लेखकानें या पक्ष्याचें मोठें सुंदर वर्णन केलें आहे. तो लिहितो, " मोठ्या बॉम्बर विमानावर एखाद्या लहान लढाऊ विमानानें चपळाईनें हल्ला करावा त्याप्रमाणें कोतवाल पक्षी घारीवर हल्ला करून तिला पिटाळून लावतो. फक्त हिंमत व चपळाई या दोन गुणांमुळें ह्या पक्ष्यानें पक्षिसृष्टींत आपलें असें स्वतंत्र मानाचें स्थान निर्माण केलें आहे.

ला. न...४

८

अनेकविध पशुपक्ष्यांनीं समृद्ध असलेला आसाम

पूर्व-पश्चिम वहाणाऱ्या ब्रह्मपुत्राच्या दक्षिण कांठानें एक सलग रस्ता गेला आहे. हा रस्ता गोहाटीपासून दिग्बॉयपर्यंत आसामांतील बहुतेक महत्त्वाच्या स्थानांना स्पर्श करून जातो. गाईला प्रदक्षिणा घातली कीं, पृथ्वीप्रदक्षिणा केल्याचें पुण्य मिळतें असा शास्त्रार्थ आहे. आसामच्या या राजरस्त्यानें मोटारींतून प्रवास केला तर सबंध आसामचेंच यथार्थ दर्शन होतें असा शास्त्रार्थ आसाम सरकारनें प्रवाशांसाठीं प्रसिद्ध केलेल्या परिचय-पत्रिकेंत लिहिलेला आहे. अर्थात् या रस्त्यानें जाणाऱ्या निरीक्षकास ब्रह्मपुत्राच्या खोऱ्यांत पसरलेल्या मैदानी प्रजेची माहितीच फक्त मिळणें शक्य आहे. आसामच्या डोंगराळ भागांत वसलेल्या बाकीच्या प्रजेची ओळख करून घ्यावयाची तर डोंगरांतूनच पायपीट करावयाला हवी.

या रस्त्यावरील शिवसागर, काझीरंगा, द्रिब्रुगढ, दिग्बॉय इत्यादि ठिकाणें प्रथम पाहून नंतर कोहिमा-इन्फाळवरून मणिपूरपर्यंत जाण्याचा माझा बेत होता. सर्व तयारी झाल्यावर जवळजवळ दुपारीं अडीच वाजतां आमच्या मोटारीनें आसामच्या राजपथावर पदार्पण–नव्हे चक्रार्पण–केलें. प्रवासांत पदोपदीं अडथळा येणार अशी माझी धारणा होती. डोंगरावरून चढून येणारें चिनी सैन्य लाल साम्राज्यवादाचें ध्येय उराशीं बाळगून भारताच्या भूमीवर उतरूं पहात होतें तें थोपवून धरणें अवश्य होतें आणि त्यासाठीं ब्रह्मपुत्राच्या दोन्ही तीरावरील रस्त्यांवरून भारतीय सैन्याची हालचाल फार मोठ्या प्रमाणावर चालू झाली असणार अशी माझी धारणा होती.

नफाच्या डोंगराळ प्रदेशाकडे जाणारें लष्करी साहित्य गोहाटीच्या विमानतळावरून आणि या रस्त्यांवरूनच युद्धभूमीजवळ पोहोंचणें शक्य होतें.



खरें पाहूं गेलें तर गोहाटींतील परिस्थिति पाहिल्यावर आसामच्या राजरस्त्यावरहि सर्वत्र सामसूम असणार हें मला कळावयाला पाहिजे होतें. पण माणसाचें मन आशावादी असतें. तें आपलें म्हणत होतें कीं, कदाचित् भारतीय सैन्य जय्यत तयार असेल. त्यामुळेंच गोहाटीसारख्या शहरांतून सर्वत्र शांतता दिसत असावी. ताशीं पन्नास मैलांच्या वेगानें माझी मोटार जात होती. रात्रीं साडेनऊ वाजतां कोहरा येथील प्रवासी बंगल्याच्या आवारांत मोटार शिरली. अंधाऱ्या रात्रीं दिव्यांनीं उजळलेला तो पांढरा शुभ्र बंगला फार आल्हादायक वाटला.

एकशें सहासष्ट चौरस मैलांचा विस्तार असलेली "काझीरंगा" पशुस्थळी अथवा रक्षितवन (sanetuary) हें साऱ्या भारताचे एक भूषण आहे. एक आफ्रिका सोडली तर इतके विविध पशुपक्षी इतक्या संख्येनें आसामशिवाय जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेंच आढळत नाहींत. इतकेंच नव्हे तर आसाममध्यें वावरणारे कांहीं कांहीं प्राणी जगाच्या पाठीवर दुसरीकडे कुठेंहि आढळत नाहींत. हुलॉक नांवाचा एक पुच्छविहीन वानर फक्त आसामांत आढळतो. भारताच्या इतर कुठल्याही प्रांतांत त्याची वस्ती नाहीं. त्याचें हुलॉक हें नांव पण त्याच्या आवाजावरून पडलें आहे.

इंग्रजींत त्याला गिबन म्हणतात. मोठी विचित्र वागणूक असते या प्राण्याची. नर-मादी वृक्षावर समोरासमोर बसतात. नंतर झाडाच्या एखाद्या फांदीला लोंबकळून काळा नर आपल्या किंचित् उजळ प्रेयसीशीं प्रेमालाप करूं लागतो. तीहि त्याला प्रतिसाद देते, पण त्यांचा तो प्रेमालाप म्हणजे ' हुलॉक हुलॉक ' आवाजानें गुंफलेलें एक खडाष्टक असतें. सारा आसमंत गजबजून निघतो त्याच्यामुळें. त्याच वेळीं झाडांच्या फांद्यांवरून त्याचें प्रेमनृत्य चालू असतें. तें पहात असतांना " आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला। झाली तयास तदनंतर भूतबाधा " हा श्लोकार्ध आठवूं लागतो. आसाममध्यें नुकत्याच झालेल्या दंगलींत आसामी व बंगाली हिंदूंनीं आपलें परस्परांवरील प्रेम व्यक्त केलें तेव्हां पाकिस्तानांतून आसाममध्यें शिरलेल्या मुसलमानांना हुलॉकचा अपूर्व नाच पहावयास मिळाला असें सांगतात.



आसामचें वैशिष्टय दाखविणारा दुसरा प्राणी म्हणजे एकशिंगी गेंडा. आसामांत प्रांत सरकारचें प्रतीक म्हणून ठिकठिकाणीं त्याचे पुतळे उभारलेले आढळतात. कुणी म्हणेल हा अगदीं निर्बुद्ध प्राणी एखाद्या प्रांताचें

प्रतीक म्हणून कां पसंत केला जावा ? पण प्रथमदर्शनीं वाटतो तितका हा प्राणी टाकाऊ नाहीं. कोठल्यातरी इंग्रजी कवीनें गेंड्यावर एक लहानशी कविता करून तो माणसापेक्षां कसा श्रेष्ठ आहे तें दाखविलें आहे. तो म्हणतो,

The great Rhinoceros
Is not exactly one of us
He does not smoke or drink or cus
And is I have heard is monogamus

सिगारेट न ओढणारा, दारू न पिणारा व एक पत्नीव्रत पाळणारा गेंडा अगदीं आपल्यासारखा वागत नाहीं म्हणून तर त्याला श्रेष्ठ समजून त्याचे पुतळे उभारावयाचे ! पण एखाद्याचा पुतळा पहाणें आणि त्याला प्रत्यक्ष पहाणें यांत फार फरक असतो. मीं तर गेंडा व त्याच्याबरोबर आसामांतले इतर पशुपक्षीहि प्रत्यक्ष व जवळून पहाण्याची संधि मिळावी म्हणून काझीरंगाला आलों होतों. अशा ठिकाणीं वन्य पशु बहुधा लवकर सकाळीं अथवा सूर्यास्ताच्या वेळीं पहावयास मिळतात. काझीरंगाला येतांना आदल्या रात्रीं खूप पाऊस पडत होता. तेव्हां सकाळीं जर पावसाची कुरबूर चालू राहिली तर जंगलांत जाणें कठीण हें मीं जाणून होतों. कदाचित् पावसाची पर्वा न करतां मी जंगलांत फिरायला गेलों असतों. पण निवाऱ्याची जागा सोडून पावसांत फिरायला निघण्याइतकें कांहीं रानांतलें पशु रोमँटिक नसतात. त्यामुळें त्यांचें दर्शन दुर्लभच होतें. रात्रीं झोंपतांना या सगळ्या, परिस्थितीचा विचार करीत निराश होऊन मीं झोंपलों होतों. पण माझें नशीब जोरावर होते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आकाश पूर्णपणें निरभ्र होतें आणि पूर्वेच्या वारा पण इतका शांत होता कीं, जंगलांत फिरणाऱ्या जनावरांना आमचा वासहि येणें कठीण होतें. काझीरंगाची भूमि ही कर्दमभूमि आहे. तिथल्या कमरेइतक्या चिखलांतून फिरणें माणसाला अशक्यच. शिवाय इथें सर्वत्र इतकें उंच गवत वाढलेलें असतें कीं त्यांत हत्तीवर बसलेला माणूसहि लपून जातो.

प्रवाशांना या जंगलांत फिरवून आणण्यासाठीं आसाम सरकारनें पंधरा-वीस हत्ती खास शिकवून तयार ठेवलेले आहेत. हे हत्ती वन्य पशूंना घाबरत नाहींत व दाट गवतांतूनहि मार्ग काढू शकतात. साधारणतः असा

समज आहे कीं गेंडा हत्तीच्या अंगावर चालून जातो. पण शेजाऱ्याला निष्कारण त्रास देणें वन्य पशूंच्या रक्तांतच नसतें. गेंडादेखील या नियमाला अपवाद नाहीं. क्वचित् केव्हां तरी एकटा असलेला गेंडा समोर येणाऱ्या पशूवर धडक मारावयास निघतो. पण एकलकोंडेपणाचें पर्यवसान तिरसटपणांत झालें नाहीं तरच नवल ! जगांतील प्रचंडकाय प्राण्यांत भारतांतील एकशिंगी गेंड्याचा चौथा नंबर लागतो म्हणतात. पहिल्या तिघांत आफ्रिकन हत्ती, भारतीय हत्ती व अफ्रिकेंतला सफेद गेंडा यांचा समावेश होतो. एके काळीं हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या तराईतून पेशावर ते ब्रह्मदेशपर्यंत शेंकडों गेंडे फिरत असत. तिबेटी लामांप्रमाणें बिचारे आपलें जीवन शांतपणें व्यतीत करीत होते. पण शिकाऱ्यांनीं आरंभलेल्या हत्याकांडांत व विशेषतः इंग्रजी शिकाऱ्यांच्या हातून त्यांचा अगदीं वंशच्छेद व्हावयाची वेळ आली. सोळाव्या शतकांत बाबराने आपल्या सैनिकांसह भाल्यानें गेंड्याची शिकार केल्याचा उल्लेख आढळतो. सध्यां सबंध आसामांत फार तर दोन सव्वा दोनशें गेंडे संरक्षित जंगलांतून आढळतील.

जंगलांत फिरण्यासाठीं माझ्या वांट्याला एक हत्तीण आली होती. तिचें नांव जयवन्ति कीं वैजयन्ति असें कांहीं होतें. मोठी देखणी, इंद्राच्या ऐरावताची पोरगी शोभेल अशी होती ती. आणि चालत पण होती अशी ऐटींत कीं गवतांतून चालतांना जणूं रेशमी साडी सळसळते आहे असें वाटावें. निघाल्यापासून थोड्याच वेळांत ती एका जराशा उघड्या ठिकाणीं आली आणि माहुतानें खूण केल्याबरोबर उभी राहिली समोरच अगदीं जवळ एक गेंडा अगदीं निश्चल उभा होता. चिलखत घालून पहाऱ्यावर उभ्या असलेल्या एखाद्या विशालकाय योद्ध्यासारखा. जराशी मान हालवून त्यानें आमच्याकडे पाहिलें व मनांत नक्की केलें " अलबेल ". आपली जागा सोडून पुढें मागें होण्याची जरूरी नाहीं. त्याचा फोटो घेण्याची माझी मनीषा जाणून माहुतानें हत्तिणीला सुचकारीत चुचकारीत अशा तऱ्हेनें उभी केली कीं गेंड्याचे नीट मनसोक्त फोटो घेतां आले मला.

बोलतां बोलतां वैजयन्तीच्या माहुतानें आपण काझीरंगाच्या समोरच असणाऱ्या मिकिर डोंगरांतील मिकिर जमातीचा असल्याचें सांगितलें. जंगल व जंगलांतले प्राणी यांच्याविषयीं बरीच माहिती होती त्याला.

त्याच्याकडून दोन गोष्टींची माहिती मिळाली. पहिली म्हणजे बाजारांत गेंड्याच्या नाकावरील शिंगाची किंमत जवळजवळ दोन हजार रुपये इतकी आहे. दुसरी म्हणजे शरीर थंड राखण्यासाठीं चिखलानें अंग माखून घेणारा गेंडा हा सामाजिक आरोग्याचा भोक्त आहे. सबंध मोठ्या जंगलांत फक्त एकाच ठिकाणीं जाऊन तो आपली विष्ठा टाकतो. कित्येक मैल दूर असला तरी त्याच एका जागेवर तो नेहमीं परतून येतो. घाण वाटेल तिथें टाकू नये, शेजाऱ्या-पाजाऱ्यांना त्रास होईल असें वागूं नये, हें समजणारा गेंडा साताक्रूझसारख्या मुंबईच्या सुधारलेल्या उपनगरांत मुलांना प्रातर्विधी-साठीं सार्वजनिक रस्त्याच्या कडेवर बसविणाऱ्या आयांपेक्षां निःसंशय शहाणा म्हटला पाहिजे.

माहुतानें खूण केली व मणिपुरी नर्तिकेच्या थाटांत गर्रकन् वळसा घेऊन वैजयन्ती दुसरीकडे निघाली. त्याच वेळीं एक पांढरा शुभ्र गाय-



बगळा डोक्यावरून पंख हालवीत उडाला. मी लगेच मनांत नक्की केलें कीं, जवळपास कुठेंतरी रानम्हशींचा कळप असला पाहिजे. माझा तर्क खरा ठरला. गिरकी घेऊन बगळा जिथें उतरला त्या दिशेनें माहुतानें

वैजयन्तीला हाकारलें आणि पांच-पंधरा म्हशींचा एक कळप शांतपणें चरतांना आमच्या दृष्टीस पडला. म्हशी गवतांतून चालतात त्या वेळीं गवतांतले अनेक लहान कीटक घाबरून वर हवेंत उडतात. त्यांना खाण्यासाठीं बगळे नेहमींच म्हशींच्या जवळ अथवा त्यांच्या पाठीवरहि येऊन बसतात. विशाल शिंगांच्या पांचपंधरा म्हशी व त्यांच्यामधून वावरणारे बगळे पाहून मनांत आलें कीं, निसर्गाची ही काळ्यावरची पांढरी लिपि केव्हां तरी कागदावर चित्रित केली पाहिजे. आसामी जंगलांतल्या या रानम्हशींचीं शिंगें दिसावयाला मोठीं सुंदर आणि विशाल अर्धचंद्राकृति असतात. त्यांचा घेर मोजला तर जवळजवळ १४ फूट भरतो. या रानम्हशींचीं आसामांतल्या आसामांतच अनेक नांवें आढळतात. आसामी भाषेत त्यांना "मोह" म्हणतात तर नाग लोकांच्या भाषेंत मला वाटतें त्यांचा उल्लेख "गुबीड" असा केला जातो. आसामांतलेच कछारी लोक या म्हशींना 'मिसिप्' म्हणतात तर मणिपुरी भाषेंत त्यांच्यासाठी 'इरोइ' असा शब्द आहे. भाषाभिन्नत्वाचें तत्त्व लागू करून जर आसामचें विभाजन करण्याचें मनांत आणलें तर मला वाटतें कीं आसामच्या खरोखरच ठिकऱ्या उडतील.

हत्तीपेक्षांहि उंच असलेल्या "एलिफंट ग्रास" (हत्ती-गवत) मधून चिखल तुडवीत माहुतानें वैजयन्तीला पुढें काढली. थोडें अंतर चालून गेल्यावर मध्येंच थांबून तिनें सोंड वर केली. आणि तुतारीसारखी दीर्घ किंकाळी फोडली. मला वाटलें कांहींतरी संकट आहे. माहुतानें इकडे-तिकडे नजर फिरविली आणि हत्तिणीला पुढें चलण्याची सूचना केली. सावधपणें पावलें टाकीत गवतांतून चालत ती एका डबक्यापाशीं आली. डबक्याच्या कांठावर एक हरिण मरून पडलें होतें. हत्तिणीनें पुन्हां एक किंकाळी फोडली आणि सोंड हवेंत फिरवून चारी दिशांचा वास घेतला. जणूं काय मृत्यूचीं पावलें आजूबाजूला कोठें रेंगाळत आहेत कीं, काय याचा मागोवा ती घेत होती. माहुतानें वैजयन्तीला जरा खालीं वांकाव-याला लावलें आणि आपल्या सोबत्याला खालीं उडी मारावयास सांगितलें. त्या सोबत्यानें खालीं उतरून हरिणाच्या प्रताचें नीट निरीक्षण केलें. कोणी माणसानें लपूनछपून हरिणाची शिकार केली नव्हती. दुसऱ्या कुठल्या तरी प्राण्यानें छातींत शिंग खपसून त्याची हत्या केली होती. किती नाजूक

सुंदर जीव! पण नियतीच्या एका आंधळ्या वेड्या लहरीबरोबर चक्काचूर झाला त्याचा! माझा व्यवसायच असा आहे कीं, ज्यांत मला मृत्यूच्या थंड शरीराला वारंवार स्पर्श करावा लागतो. शिवाय ओझरता का होईना मृत्यूहि माझ्या शरीराला थंड स्पर्श करून गेला आहे. त्यामुळें त्याचें स्वरूप तितकेंसें भीषण कधींच वाटत नाहीं मला. मृत्यूकडे स्थितप्रज्ञ वृत्तीनें, थोड्याशा तडजोडीच्या वृत्तीनें बघावयाची मला आतां संवय झाली आहे. तरीहि तें हरिण अकारण मरण पावलें असें कांहीं तरी वाटून माझें मन क्षणभर बधिर झालें.

काझीरंगाचा विस्तीर्ण वनप्रदेश तुडवीत आणि भिजलेल्या वाऱ्यावर मंद मंद गतीनें तरंगत गिरक्या घेणारा जमिनीचा व गवताचा वास हुंगींत वैजयन्ती प्रवासी बंगल्याच्या दिशेनें चालू लागली. का कोण जाणे पण वाटेंत पुन्हा ती थबकली आणि त्याच वेळीं समोरून हरिणांच्या एक कळप उड्या मारीत पळत पळत निघून गेला. त्या हरिणांकडे पाहून एका विलक्षण समाधानानें माझें मन भरून आलें. नीटपणें पहिला नव्हता तरीहि त्यांचा तो कळप सारगांचा आहे असें मनाला वाटूं लागलें. किंचित् काळसर अंगावर, अस्पष्ट पांढुरके ठिपके असलेल्या हरिणांना संस्कृत भाषेंत सारङ्ग म्हणतात. या हरिणांचा कळप वेगानें जातो, त्यावेळीं एखादा काळा-पांढरा ढग वाऱ्यावर तरङ्गतो आहे असें वाटतें. ढगालाहि संस्कृत भाषेंत सारङ्ग हें नांव आहे. मेघदूतांतला एक श्लोक आठवला मला—

अर्ध-केसरें फुललीं, बघुनी कंदब लाल निळा
नदीकिनारीं नवकलिकांसह सेवुनि कदलींला
अधिक सुगंधित धरणी हुंगित वनिंचे सारङ्ग
किंचित सिंचित तव पथ करितिल सूचित, सारङ्ग!

वैशाखांतल्या पांढुरक्या ढगासारखें क्षणाक्षणाला वेगळें रूप घेणारें मन मेघदूताभोंवतीं घोटाळत असतां वैजयन्ती काझीरंगाच्या कडेला येऊन उभी राहिली. प्रवासी बंगला तेथून जवळच होता. काझीरंगामधील कोहराचा प्रवासी बंगला खरोखरच सुंदर व विस्तीर्ण आहे त्याच्या बांधकामाला खर्च फार कमी आला. त्यामुळें इतर प्रांतांतहि या बांधकामाचें अनुकरण केलें तर बरें होईल असें एक स्थानिक अधिकारी म्हणत होता. या बंगल्याच्या

भिंती खालीं विटांच्या व वर बांबूंच्या आहेत. आंतून-बाहेरून सिमेंटचा गिलावा केला असल्यामुळें त्या भिंती मजबूत झाल्या आहेत. शिवाय चुन्यानें रंगविल्यामुळें त्या शुभ्र सुंदर दिसतात. बांबू व लांकूड यांची भरपूर पैदास असल्यामुळें आसाम प्रांतात या तऱ्हेचें बांधकाम स्वस्त पडण्याची शक्यता आहे. मुंबईजवळील शिंपवली येथील कोरा ग्रामोद्योग केंद्रांत प्रयोग म्हणून बांबूंच्या ऐवजीं कारवी वापरून अशा तऱ्हेचें बांधकाम केलें होतें. टिकाऊ ठरलें, पण फारसें स्वस्त ठरलें नाहीं. अशा तऱ्हेच्या बांधकामांत लोखंडाचा उपयोग टाळतां येतो. व त्यामुळें तें स्वस्त पडतें. असा मुद्दा दुसऱ्या एक अधिकाऱ्यानें मांडला. पण बैठे घर करावयाचें झाल्यास लोखंडाचा उपयोग करावयाची जरूरी पडत नाहीं असें जेव्हां मी त्याच्या निदर्शनास आणून दिलें तेव्हां तो उगी बसला. मला वाटतें लांकडाच्या चौकटी व बांबू वापरून बांधलेलें घर कलाकृति म्हणून खरोखरच सुंदर ठरेल, पण त्याच्यावर जर सीमेंटचाच गिलावा करावयाचा तर मग विटांचें घर काय वाईट. महाराष्ट्रांत स्वस्त घरांचा प्रश्न सोडवावयाचा झाला तर प्रांतांत पैदा होत नसलेलें सिमेंट स्वस्त दरानें कसें मिळवावयाचें अथवा प्रांतांतच आढळणाऱ्या दुसऱ्या पदार्थांतून सीमेंटसारखा दुसरा पदार्थ कसा बनवावयाचा असले प्रश्न हाताळावे लागतील.

आसामच्या बांधकाम खात्याचें कौतुक करावयाचें तर या प्रवासी बंगल्याच्या बांधकामाबद्दल नव्हे तर तो बांधण्यासाठीं निवडून काढलेल्या जागेबद्दल. बंगल्याच्या दारासमोरील हिरवळीवर उभें राहिलें व सभोवारचें चित्र-सुंदर विहंगम दृश्य पाहिलें कीं, बंगल्याची जागा निवडणाऱ्या अधिकाऱ्याला शाबासकी द्यावीशी वाटते. बंगल्याच्या बाजूलाच एक खोल घळ आहे आणि त्या घळींतील प्रचंड शिलांमधून एक " सदाऽव गांह क्षमवारिसंचयः" असा एक जलौघ जणू सतत नृत्यसाधना करीत वाहात असतो. अशा प्रवाहांत स्नान करण्याच्या आनंदापासून वंचित होण्याचें कुणाला आवडेल? शिलाखंडावरून उतरत मी प्रवाहांत शरीर झोकून दिलें. फेसाच्या हिमशुभ्र पुष्पमालांनीं नटलेली जलवंती आणि भान विसरून तिच्या सहवासाचें सुख उपभोगणारा मी! जीवनाची जाणीव जलप्रवाहांत कणाकणानें विरघळून गेली. विधात्याला देखील माझा हेवा वाटला असेल त्या वेळीं.

९

भाषावेड पांघरून दबा धरून बसलेली घातक धर्मांधता

काझीरंगा वनस्थलीच्या समोरचा रस्ता ओलांडला कीं, निळसर टेकड्यांच्या पायथ्याची तळभूमि दिसते. महाराष्ट्रांतील तळकोंकणासारखीच. दर्शनासरशी डोळ्यांना सुखवून तृप्त करणारी. तिच्याकडे अंगुलिनिर्देश करून मित्रवर्य वासूनें सांगावयास सुरुवात केली, "डॉक्टर, शिवसागर व नवगाँग जिल्ह्यांतील या मिकिर टेकड्यांच्या परिसरांत तिबेटी ब्राह्मी वंशाचें "मिकिर" लोक राहातात. धर्मानें हिंदू असलेल्या या लोकांच्या भाषेचें नागांच्या भाषेशीं बरेंच साम्य आहे. घरांत कुणी मृत्यु पावलें तर हे लोक एक तऱ्हेचें विचित्र नृत्य करून यमाचा उत्सव साजरा करतात. पण वासू सांगत असलेल्या या माहितीकडे माझें फारसें लक्ष लागेना. आजच "मिकिर" हा शब्द कानावर पडल्याबरोबर चाबकाचा जोरदार फटका बसून घोडा उधळावा त्याप्रमाणें माझें मन एकदम बेभान उधळलें. मला आठवलें ६१ सालच्या मार्च महिन्यांत याच 'मिकिर' प्रदेशांत पोलिसांनीं चपला करमरकर नांवाच्या एका तरुण विधवेची गुंडांच्या तावडींतून सोडवणूक केली होती! आसामी मुसलमानांनीं तिच्यावर पुनः पुन्हा बलात्कार करीत तिचा हातोहात विक्रय करून तिला पळवून आणून या 'मिकिर' वस्तींत लपवून ठेवली होती!

"जान देबो जबान देबो ना" (प्राण देऊं पण भाषा देणार नाहीं) अशा गर्जना करीत बंगाली व आसामी हिंदूंनीं प्रांतभाषांच्या नांवानें एक भयंकर भस्मासुर निर्माण केला. त्या बुद्धिहीन हिंदूंना कळलेंदेखील नाहीं

कीं, त्या भस्मासुराचें डोकें व हात संपूर्णपणें इस्लामी होते! आणि त्याच इस्लामी भस्मासुरानें एकटी चपला करमरकरच काय पण अनेक 'मिकिर' इतर आसामी व बंगाली हिंदू (मुसलमान नव्हे) ललनांचा अपहार करविला. या भाषिक भेदाच्या खुळानें हिंदूंना इतकें मूढ करून टाकलें होतें कीं, कछार जिल्ह्यांतील बंगाली हिंदूंनीं भाषिक वाद लढविण्यासाठीं व भाषिक मागणीला जोर येण्यासाठीं आपल्या संग्राम परिषदेचें अध्यक्षस्थान अबदुर रहमान चौधरी नांवाच्या एका मुस्लिम व्यक्तीला दिलें! वेळ पडल्यास पाकिस्तानच्या मदतीनेंहि आम्ही आमच्या जिल्ह्यांत बंगाली भाषेला कायम राखूं अशा घोषणा केल्या आणि "अल्ला हो अकबर"च्या आरोळ्या ठोकीत बंगाली मुलींना आपल्या मुसलमान बंधूंच्या (?) हातांत राखी बांधावयाला लावलें! तेच मुसलमान बंधू आपल्या हिंदू आसामी भगिनींच्या शीलावर उठतील या शक्यतेची कल्पना असूनहि तिकडे त्यांनीं डोळेझांक केली. भाषाभिमानाच्या वेडानें पछाडलेल्या बंगाली अदूरदर्शीपणाचा हा इतिहास आसामच्या भूमीवर कोळपलेल्या रक्ताच्या काळ्याकुट्ट अक्षरांत लिहिलेला आहे.

कछारमध्यें "जान देबो जबान देबो ना" म्हणून आरोळ्या ठोकीत आसामी लोकांच्या विरुद्ध चाललेल्या बंगाली दंगलींत भाग घेणाऱ्या मुसलमानांना पाकिस्तानची प्रेरणा मिळाली होती. (मराठी मुसलमानांची मादरी जबान उर्दू आहे म्हणून सांगणाऱ्या मराठी मुसलमानांची प्रेरणाहि या संदर्भात तपासण्यासारखी आहे.) आणि त्याचें प्रत्यंतर तावडतोब आलें. 'कायमची पीडा ज.ऊं दे एकदांची' असें ठरवून आसामी पुढाऱ्यांनीं सबंध कछार जिल्हाच बंगाल प्रांतांत घालावा असा विचार मांडावयास सुरुवात केली. पण हा विचार मुसलमानांच्या दृष्टीने इष्ट नव्हता. कछार जिल्ह्यांत मुसलमानांची वस्ती पुष्कळ. तोच जिल्हा बंगालमध्यें गेला कीं मुसलमानांची आसाममधील लोकसंख्या एकदम घटणार होती. त्यामुळें आसाम प्रांतांतील त्यांचें राजकीय वर्चस्वहि घटणार होतें. शिवाय दररोज शेंकड्यांच्या हिशेबानें आसामांत बेकायदेशीरपणें घुसणाऱ्या पाकिस्तानी मुसलमानांचें पहिलें आश्रयस्थान नष्ट होणार होतें. झालें मुसलमान पुढाऱ्यांनीं तावडतोब टोपी फिरविली. कछारमधील संग्राम-परिषदेला विरोध करणाऱ्या

शांति-परिषदेच्या शाखा सर्वत्र उभ्या झाल्या आणि संग्राम-परिषदेंतील पूर्वींच्याच मुसलमानांनी घोषणा द्यावयाला सुरुवात केली. " आसामी थाक्ते आसामिया भाषा बोलते होबे " (आसामांत राहावयाचें तर आसामी भाषाच बोलावयाला शिकलें पाहिजे). मात्र ही घोषणा अस्सल बंगाली भाषेंत सुरू झाली ! बंगाल्यांशीं हातमिळवणी करून ज्यांनीं आसामी जनतेची ससेहोलपट केली त्यांनींच आतां आसामी जनतेची कड घेऊन बंगाली लोकांविरुद्ध चळवळ सुरू केली. दोन्ही चळवळींच्या मिषानें रक्तपात, बलात्कार, अत्याचार व अपहरण करून आसामी व बंगाली हिंदूंची होळी केली. आसाममध्यें मंत्रिपदें विभूषित करणारे फकुद्दिन अहमद, मोइनूल हक्क, आसामचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस हैदर हुसेन व इतर मुस्लिम कर्मचारी यांचा या बेबंदशाहीशीं घनदाट संबंध होता असा प्रवाद आसामांत सर्वत्र ऐकूं येतो.

आसामांतील भाषिक दंगलीचे दोन परिणाम झाले. पहिलाः—बंगाली हिंदू बहुसंख्येनें निघून गेल्यामुळें प्रांतातील हिंदूंची लोकसंख्या घटली. दुसराः- आपल्या गुंडगिरीला मोकळें रान मिळूं शकतें अशी खात्री झाल्यामुळें पाकिस्तानांतून मोठ्या संख्येनें आयात केलेल्या मुसलमानांसह आसामांतील मुसलमानांनीं खासगी मालमत्ताच काय, पण सरकारी संरक्षित जमिनीहि जमावानें ताब्यांत घ्यावयास सुरुवात केली. पर्यायानें मुसलमानांची वस्ती किती तरी वाढली. किती तरी पटींनीं वाढली.

भारतभंगाच्या वेळीं आसामचा सिल्हेट जिल्हा बहुसंख्य मुस्लिम म्हणून पाकिस्तानांत घातला गेला. आजहि बहुसंख्य मुस्लिम म्हणून काश्मीरची समस्या सार्वमताच्या सीमेवर टक्कर खाते आहे. कदाचित् काश्मीरचा कांहीं भाग पाकिस्तानच्या हातांत अलगद दिला जाईल. कांहीं वर्षांनीं आसामहि बहुसंख्य मुस्लिम म्हणून पाकिस्तान त्याची मागणी करूं लागेल. अशी रास्त भीति पुष्कळ आसामवासीयांना वाटूं लागली आहे. एक 'भिकिर' गृहस्थ म्हणाले, " आसामांतील भाषिक दंगल ही पाकिस्तानकडून आसामवर होणाऱ्या निःशस्त्र आक्रमणाचा केवळ एक भाग होता." किंबहुना या आक्रमणाकडे हिंदूंचें लक्ष जाऊं नये म्हणून तर आसामांतील मुस्लिम सरकारी अधिकाऱ्यांनीं भाषिक वादाच्या आगींत तेल ओतण्याची सतत

पराकाष्ठा केली. आजहि याच मुस्लिम अधिकाऱ्यांच्या मदतीनें तें आक्रमण अनेक वाटांनीं चालू आहे. दररोज शें- शंभर पाकिस्तानी मुसलमान निर-निराळ्या मार्गांनीं आसामांत घुसत आहेत व आमच्या जमिनी बळकावीत आहेत आणि कुणीच याचा खरा प्रतिकार करीत नाहीं !

मुसलमानांकडून आसामवर होणाऱ्या आक्रमणाचा इतिहास फार जुना आहे. पण आज त्याला एक नवीन स्वरूप येऊं पहात आहे. सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं म्हणजे १९११ सालीं गोलपारा येथील कांहीं मुस्लिम जमीनदारांनीं आपल्या जमिनी जुन्या हिंदू कुळांकडून हिसकावून घेतल्या आणि त्या पूर्व बंगालमधून मुद्दाम बोलावून आणलेल्या मुसलमानांस कसावयास दिल्या. त्यानंतर हिंदू कुळांकडून जमिनी काढून घ्यावयाच्या व त्या बंगालमधून मुद्दाम बोलावून आणलेल्या मुसलमानांना खेडावयासाठीं वांटून द्यावयाच्या असें सत्र सुरू झालें. या चळवळीमागें बंगालमधील गरीब धर्मबांधवांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याचाच फक्त हेतु नव्हता. ही चळवळ म्हणजे आसामांतील मुसलमानांचे संख्याबळ वाढविण्याचाहि एक डाव होता. असा निष्कर्ष लोकसभेचा सदस्य असलेल्या एका प्रजासमाजवादी पुढाऱ्यानें आपल्या पुस्तकांत व्यक्त केला आहे. १९११ सालीं आंसामांतील मुसलमानांची संख्या फक्त ३,५५,३२० होती. तीच १९३१ सालीं ९,४३,२५२ च्या वर गेली आणि १९४१ सालीं सरकारी माहितीप्रमाणें ती १३,०५,९०२ इतकी भरली. या संदर्भात १९३१ सालच्या जनगणनेच्या (सेन्सस) रिपोर्टांतील उतारा लक्षपूर्वक वाचण्यासारखा आहे :

Probably the most important event during the last twenty five years, an event which moreover seems likely to alter permanently the whole future of Assam and to destroy more surely than did Burmese invader of 1820. The who structure of Assamese culture & civilization, has been the invasion of vast hoards of land-hungry Bengali imigrants. Mostly Muslims from the districts of Eastern Bengal and in perticular from Mymensingh. I have already remarked that by 1921 the first Army-Corps of the invaders had conquered

Golpara. The second Army-Corps which followed then in the years 1921-1931 has consolidated their position in the district and has also completed the conquest of Nowgong. The Borpet sub division of Kamarup has also fallen to their attack Darang is being invaded. It is sad but by no means improbable. That in another thirty years Sibasagar district is the only part of Assam in which an Assamese will find himseif at home. ही झाली इंग्रजीं सत्तेखालीं असलेल्या आसामाची कथा !

हिंदू धर्म व मुसलमानी धर्म एकत्र राहूं शकत नाहींत असें ठरवून इंग्रजांनीं हिंदुस्तानचे हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन तुकडे केले. त्यामुळें बहुसंख्य बंगाली हिंदू पूर्व बंगालमधून निर्वासित होऊन आसामांत आले. त्यांतले बहुतेक कछार जिल्ह्यांत स्थाईक झाले. आसामांतून विशेषतः कछार जिल्ह्यांतून पूर्व बंगालच्या भिकारी भूमीवर जाण्याचा धर्मवेडेपणा फारच थोड्या मुसलमानांनीं दाखविला ! या संदर्भांत आसामांतील भाषा-वादाचें भूत कां, कसें व कोणीं उभें केलें व त्या भुतानें कछार जिल्ह्यांतच आपलें भीषण स्वरूप कां धारण केलें हें समजणें सहज शक्य आहे. आज पुष्कळसे बंगाली हिंदू पुन्हा पश्चिम बंगालमध्यें निर्वासित म्हणून गेले व त्या वेळेपासून या क्षणापर्यंत धीट बनलेल्या आसामी मुसलमानांनीं पूर्व बंगालमधून लाखों मुसलमानांना बेकायदेशीरपणें आसामांत आणून पद्धत शीरपणें मुसलमानी वस्ती वाढवावयाला सुरुवात केली आहे ! आज भारताच्या उत्तर सीमेवर लढाई चालू झाली आहे. त्याच वेळीं पूर्व बंगालमधून शेंकडों मुसलमान आसामच्या प्रदेशांत घुसत आहेत. हिंदुद्वेषावर उभारलेल्या पाकिस्तानांतून आलेले हे लोक " आमार बंधु " म्हणून जवाहरलालजींच्या गळ्याला मिठी मारणार नाहींत. ते पंचस्तंभी आहेत व पंचमस्तंभी राहाणार. भारतासकट जवाहरलालजींना आणि जवाहरलालजींसकट भारताला रसातळाला नेण्यासाठीं शक्य ती कारवाई करणार ! आसामांतच काय मुंबईंतहि मुसलमानांच्या तोंडून एक वाक्य मी सतत ऐकलें आहे. तें म्हणजे " पाकिस्तानकडे वांकडी नजर करून पहाण्याची चीनची छाती नाहीं.

भारतासारख्या नामर्द राष्ट्रावर हल्ला करणें सोपें आहे तसें पाकिस्तान-बाबत नाहीं ! ''

भारतांत घुसणाऱ्या परकी मुसलमानांना हांकलून देणें जरूरीचें आहे. हिमालयाचीं शिखरें हिंदुस्तानच्या रक्तानें रंगल्यामुळें आज अनेक समस्यां-कडे नव्या दृष्टिकोनांतून पहाणें भाग आहे. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिति वाईट आहे म्हणून हे मुसलमान भारतांत आसऱ्यासाठीं येत आहेत. त्यांच्या-कडे दयार्द्र दृष्टीनें पाहिलें पाहिजे असा खुळचट दृष्टिकोन ठेवून जर भारताचे राज्यकर्ते वागूं लागले तर म्हणावे लागेल कीं, व्रजन्ति ते मूढधियः पराभवन् भवन्ति मायाविषु येन मायिनः ।। शठांशीं शठनीतीनेचे जे कोणीं बुद्धिहीन वागूं शकत नाहींत त्यांच्या ललाटीं पराभवच लिहिला जातो.

काझीरंगाहून जरा दूर असलेल्या एका खेड्यांत थांबलों होतों. तेथील चहाच्या दुकानांत एक गृहस्थ भेटले. बोलतां बोलतां त्यांनीं माहिती सांगि-तली, " आतांपर्यंत जवळ जवळ सहा लाख पाकिस्तानी आसामांत बेकायदे-शीर रीतीनें घुसले आहेत ! गवतर्षीं आसामचे मुख्य मंत्री चालिहा भारताचे अर्थमंत्री व गृहमंत्री यांना भेटले व " पाकिस्तान्यांचें हें बेकायदे-शीर आक्रमण थांबविण्यासाठीं कित्येक मैल लांब असलेल्या आसामच्या सरहद्दीवर कांटेरी तारांचें कुंपण घालण्याची त्यांनीं सूचना केली. '' मीं चिडून म्हणालों, "प्रांतांच्या मुख्यमंत्र्याविषयीं भलतीच माहिती सांगून असला विनोद करणें लोकशाहींतच शक्य आहे ! '' ते शांतपणें म्हणाले, " आपण मुंबईहून आलां अहांत ना ? जरा माझ्या घरीं याल तर मीं सांगितलेली माहिती पुराव्यानिशीं खरी असल्याचें सिद्ध करून देईन तुम्हांला ! त्यांच्या घरीं गेल्यावर कपाटांतून वर्तमानपत्रांचीं कात्रणें चिटक-विलेली एक जाडी वही काढून त्यानी माझ्यासमोर ठेवली. त्यांत १३ मे १९६१ च्या 'टाइम्स आफ इंडिया' मधून काढलेल्या कात्रणांत श्री. चालिहा यांच्या कांटेरी तारेच्या कुंपणाचा उल्लेख होता. मी कपाळाला हात लावून म्हटलें, " शत्रु समोर असतांना शनिवारवाड्याला सोंवळीं गुंडाळणाऱ्या ब्राह्मणांनो, तुमच्याइतकीं बुद्धिमान् माणसें अजूनहि हिंदुस्तानांत आहेत तर !

काझीरंगाच्या वनस्थलींत आसामांतील कांहीं प्राण्यांची तोंडओळख झाली. काझीरंगा समोरच्या मिकिरवस्तींत आसामांतील कांहीं समस्यांची

तोंडओळख होण्याची संधि मिळाली. वर्तमानपत्रांतील कात्रणें जमविणाऱ्या सद्गृहस्थांशीं बोलतांना आसामाविषयीं आणखी कांहीं माहिती समजली. त्यांच्या सांगण्याचा सारांश असा कीं, आसामचा गिरिप्रदेश स्वायत्त व स्वतंत्र करून आसामांतील मैदानी प्रजेशीं असलेले त्यांचे संबंध शक्यतों पूर्णपणें तोडून टाकावे अशी एक चळवळ आसामांत चालू आहे. पहाडी प्रजेच्या नांवानें हें सत्तेंच सिंहासन मागण्याच्या मुळाशीं परकीय ख्रिश्चन धर्मगुरूंच्या फुटीर पंथवेडाची प्रेरणा आहे व आपली ती मागणी पुरी करून घेण्यासाठीं त्यांनीं पहाडी प्रजेच्या भाषाभिन्नत्त्वाचें निमित्त पुढें केलें आहे. या फुटीर जमातवेडाला वेळींच आळा घातला पाहिजे. नाहींतर अजूनहि भारतांतून फुटून स्वतंत्र होऊं पहाणाऱ्या नागभूमीची पुनरावृत्ति सर्वत्र झाल्याशिवाय राहाणार नाही. पर्वतापलीकडून येऊं पहाणाऱ्या लाल संकटाशीं मुकाबला करावयाचा तर भारताची उत्तर सीमा भजबूत असली पाहिजे व तशी ती करावयाची असेल तर वंशभिन्नत्व, संस्कृतिभिन्नत्व, फुटीर जातवेड, भाषाभिन्नत्व असल्या गोष्टींना आळा घालून खरोखरीची राष्ट्रीय वृत्ती व राष्ट्रीय समाज यांची आसामांत जोपासना करावयाला पाहिजे. बोलतां बोलतां त्या सद्गृहस्थांनीं आणखीहि थोडीशी माहिती सांगितली. ती अशी कीं, मिकिर व जन्तिया या दोन पहाडी जमातींनीं स्वतंत्र गिरि-राज्याला विरोध केला असून आसामी भाषा शिकण्याची तयारी दाखविली आहे. या दोन्हीहि जमाती धर्मानें हिंदू आहेत.

१०

सर्वोदयवाद्यांची तत्त्वनिष्ठा आणि कॉम्युनिस्टांची फितुरी

पाऱ्यासारखी जड थंड दुपार. झाडांच्या पानांपानांवरून ठिबकणारी समोरची भातशेती पण सगर्भेसारखी सुस्तावून लोळणारी. आपल्याच कल्पनारम्य विश्वांत रंगून गेलेल्या स्वयंतुष्ट व आत्मकेंद्रित मुलासारखा आकाशाकडे टक लावून शेतांत मध्येंच उभा असलेला निश्चल वृक्ष. आणि त्याच्या छायेंत तळ्यांतला मासा गळाला लागावयाची वाट पहात कांठावर शांतपणें बसलेला उघडा-बोडका आसामी माणूस ! सारें कसें शांत निवांत वाटत होतें. काझीरंगा–दिब्रुगढ रस्त्यावर थांबलेल्या माझ्या गाडीच्या पुढच्या अंगाला टेंकून मी त्या दृश्याकडे पहात होतों. इतकी असीम शांतता ! इतकें निश्चित जीवन ! दूरदूर क्षितिजापर्यंत जाऊन भिडलेल्या रस्त्यावर माझ्या गाडीशिवाय चिट्पांखरूहि नव्हतें. अत्यंत शांत अशा निसर्गरम्य ठिकाणीं माणसाच्या मनालाहि हवी तशी मनःशांति मिळते. ती वेळ आणि तें स्थळ मनःशांति मिळवावयाला खरोखरच अत्यंत योग्य होतें. परंतु दगड बसल्यावर तावदानाची मोठी कांच फुटावी त्याप्रमाणें त्याच वेळीं त्याच ठिकाणीं माझें मन अचानक फुटून चक्काचूर झालें ! एका भरारींत कावळाहि पोंचूं शकेल इतक्या अंतरावर लढाई चालू असतांना या रस्त्यावर इतकी शांति इतकी निश्चितता !! ज्या रस्त्यावर युद्धसाहित्यानें व सैनिकांनीं भरलेल्या शेंकडों-हजारों मोटारी पळतांना दिसावयाला पाहिजेत होत्या त्या रस्त्यावर वारादेखील धूळ उडवीत नव्हता ! हें असें कां ?

हे असें कां ? हा एकच प्रश्न समोर नाचूं लागला. ज्या पुरुषानें या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्वासहित सर्व जीवन समर्पित केलें तो पुरुष पर्वतधारांवरून मधमाश्यांचें मोहोळ उठावें त्याप्रमाणें चिनी सेना आक्रमणासाठीं येत असतांना आपल्या देशाच्या संरक्षणाची कांहींहि तरतूद न करतां स्वस्थ बसला आहे हें खरेंच वाटेना. पण डोळ्यासमोर दिसणारी परिस्थिति नाकारतां येत नव्हती. मला आठवलें, गेल्या महायुद्धाच्या सुरुवातीलाच महात्मा गांधी ब्रिटिशांना म्हणाले होते. " युद्धाचें संहारक स्वरूप मला समजतें म्हणून मी युद्ध टाळूं पहातों असें नाहीं. मला अहिंसा प्यार आहे. अहिंसा व प्रेम यांच्या बळावर युद्ध न करतांहि शत्रूला जिंकतां येतें. त्याचें हृदयपरिवर्तन करतां येतें. इतकेंच नव्हे तर त्याचा पराभवहि करतां येतो, असा माझा विश्वास आहे. " महात्माजींना आपलें तत्त्वज्ञान परिस्थितीच्या निकषावर तपासून पहाण्याची संधि कधींच मिळाली नाहीं. स्वातंत्र्ययुद्ध म्हणून कितीहि गौरविलें गेलें असलें तरी ब्रिटिशांविरुद्ध केलेली चळवळ हें कांहीं रणांगणावरील युद्ध नव्हतें. तुरुंग व लाठीहल्ला व क्वचित् गोळीबार हींच शस्त्रें ब्रिटिश राज्यकर्ते प्रामुख्यानें वापरीत होते. व त्या अत्यंत मर्यादित संहारशक्ति असलेल्या शस्त्रांचा हिंदी लोक निःशस्त्रपणें प्रतिकार करीत होते. त्या शस्त्रांत हंगेरींतील स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यासाठीं कॉम्युनिस्ट रशियानें वापरलेल्या क्रूर शस्त्रबळाची भीषणता कणांशानेंहि नव्हती. मला भीति वाटूं लागली कीं, अंधश्रद्धेनें गांधीवादाचा अंतिम विजय गृहीत धरूनच तर नाहींना पंडितजी अजूनपर्यंत निश्चित मनानें बसून राहिले ! जें तत्त्वज्ञान महात्माजींना परिस्थितीच्या निकषावर पारखून घेतां आलें नाहीं तेंच तत्त्वज्ञान तेंच आपल्या गुरूचें तत्त्वज्ञान आंतरराष्ट्रीय राजकारणांतही यशस्वी करून दाखविण्याच्या आकांक्षेनें आणि ईर्ष्येनें तर नाहीं ना भारताचे पंतप्रधान पछाडले गेले ! मला ठाऊक होतें कीं, भारत सर्वांचाच मित्र आहे. त्याचा कुणीहि शत्रु नाहीं हे सिद्ध करण्यासाठीं नेहरूंनीं तटस्थता व अलिप्तता वाद यांचा आपल्या धोरणांत निश्चितपणें समावेश केला आहे. भारताच्या संरक्षणासाठीं म्हणून लागणारी साधनसामुग्री त्यांनीं पाश्चात्यांकडून खरेदी केली तशीच कॉम्युनिस्टांकडूनहि खरेदी केली आहे. आपणांशीं संबंध नसलेलीं पर-

राष्ट्रांचीं भांडणें खंडित व्हिएटनामविषयीं जुळवून आणलेल्या जिनीव्हा कराराप्रमाणें त्यांनीं युद्धसंकट टाळून सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. फार काय त्यांनीं चीनच्या पुढाऱ्यांबरोबरहि गांधीवादाच्या सिद्धतेसाठींच 'पंचशील' करार केलेला आहे. या सर्व कथा आठवून माझें मन मला विचारूं लागलें, " जागतिक समस्या गांधीतत्त्वज्ञानानें सोडवूं पहाणारा अजूनपर्यंत गांधीवादाचा निःसीम भक्त असलेला भारताचा पंतप्रधान चीन साम्राज्यशाही वृत्तीनें भारतावर आक्रमण करणार नाहीं अशा अंधविश्वासानें बेसावध आणि निष्क्रिय होऊन तर नाहीं ना बसलेला ? मेनन–कृपालानी निवडणुकीच्या वेळीं कुणीतरी म्हणाले होते कीं, नेहरूंच्या सुवर्णमूर्तीचे पाय चिनीमातीचे आहेत–नव्हे ती सबंध मूर्तीच चिनी मातीची आहे ! मला तें तेव्हांहि पटलें नव्हतें. आतांहि पटेना ! परंतु असें मात्र वाटूं लागलें कीं, गांधीजींच्याच भूमीवर गांधीवादाचा पराजय झाला. असें तर इतिहास लिहिणार नाहीं ना ? मला आठवलें कॉम्रेड देशपांडे मला एकदां म्हणाले होते कीं, गांधीवादाच्या मर्यादा हिंदुस्तानच्या मर्यादेबाहेर कधींच जाऊं शकणार नाहींत. कदाचित् हिंदुस्तानच्या सीमेवरच एक दिवस गांधीवादाचा पराभव होण्याची शक्यता आहे. भारताच्या बुद्धिमान पंतप्रधानांच्या कुशल राजनीतीचा पराभव करून एका दिवंगत कॉम्युनिस्टाची भविष्यवाणी खरी ठरणार कीं काय अशी भीति माझ्या मनांत निर्माण झाली आणि मन वेदनेनें कळवळून उठलें. पण त्याच क्षणीं मला एकदम आठवलें कीं, देशाच्या संरक्षणाविषयीं गांधीजींनीं आपले विचार अत्यंत स्पष्ट व निःसंदिग्ध भाषेंत मांडलेले आहेत. त्यांनीं लिहिलें आहे कीं, " स्वतंत्र भारत हा अकल्पित आक्रमण किंवा तत्सम परिस्थिति थोपवून धरण्याइतकी साधनसामुग्री नक्कीच जवळ बाळगील आणि नंतर जरूर पडली तर सारा देश अत्यंत त्वरेनें तयार व सज्ज करण्याची आशा बाळगील. " ते विचार आठवून मला वाटलें गांधीजींचे वारस जवाहरलालजी अकल्पित आक्रमणाला तयार नसण्याइतके नक्कीच अंधविश्वासाने बेसावध व निष्क्रिय राहिले नसणार. पण मग समोरच्या परिस्थितीचा अर्थ काय ? एकच गोष्ट शक्य वाटूं लागली. मुंबईच्या परिस्थितीविषयीं मुरारजी भाईंनी निःपक्षपाती व सर्वांगीण माहिती न सांगितल्या-

मुळें 'मुंबईच्या प्रश्नावर' नेहरूजी जसे तोंडघशीं पडले तद्वतच श्री. मेनन व त्यांच्या खासगींतील सैन्याधिकारी याच्या चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवून भारताचे पंतप्रधान आज तोंडघशी पडले आहेत. संभाजीराजे व कलुषा कब्जी यांच्या इतिहासाची पुनरावृत्ति होते आहे. एक विचार पुन्हा उसळी मारल्यासारखा मनांत आला, "पण एकटे मेननच का या परिस्थितीला जबाबदार आहेत? मंत्रिमंडळांतले बाकीचे मंत्री का झोंपीं गेले होते! त्यांनीं कां नाही नेहरूजींना सावध केलें? त्यांनी का नाही भारताच्या संरक्षणाच्या प्रश्नांत स्वत: मन घातलें? कीं नेहरूंसकट मंत्रिमंडळांतील हे लोक परस्परांशीं संबंध न राखतां फक्त आपापल्या खुर्च्या सांभाळून बसतात? राजकारण हा अभ्यासाचा विषय आहे. माझ्यासारख्या वैद्यविद्येच्या विद्यार्थ्याला त्यांतली गहनगूढें समजणें कठिण. शिवाय संपूर्ण अंतर्गत माहिती नसतांनाच मी आपला नाना तर्क लढवीत बसलों. तळ्याच्या कांठावर बसलेल्या आसामी माणसानें हातांतला गळ सटकन उचलला. गळाच्या दोराला लटकणारा मासा उन्हांत तडफड करीत होता.

दिब्रुगढला पोहोंचलों तेव्हां रात्र पडून अंधार झाला होता. गोहाटीहून निघतांनाच दिब्रुगढमधील एका बऱ्यापैकीं समजल्या जाणाऱ्या हॉटेलचें नांव व पत्ता लिहून घेतला होता. त्याच हॉटेलच्या दारासमोर गाडी उभी करून आंत शिरलों. डोक्यांत विचारांचा गोंधळ चालू होता. त्यामुळें पुढें आलेल्या अन्नाचा स्वाद शोधण्याच्या मन:स्थितींत नव्हतों. आणि शिवाय भुकेपोटीं कुठलेंहि जेवण मग तें मालवणी असो अथवा मारवाडी असो– गोडच लागतें मुळीं. गांवांतलें सर्वांत मोठें हॉटेल होतें तें. पण त्यांत प्रवाशांना राहण्यासाठीं बनविलेल्या खोल्या काड्यांच्या पेटीएवढ्या व लांकडी पार्टिशनें घालून केलेल्या होत्या. प्रत्येक खोलींत दोन बिछाने पुष्कळसे मच्छर आणि अगणित ढेकूण होते. आसामांत शिरणाऱ्या पाकिस्तानी मुसलमानांप्रमाणें त्या ढेकणांनीं प्रत्येक मोक्याची जागा काबीज करून ठेवली होती. आणि भारतांतल्या कॉम्युनिस्टांप्रमाणें मच्छरांनींहि त्या ठिकाणीं गुणगुणता प्रचार ,सतत चालू ठेवला होता. अशा परिस्थितींत कुंभकर्णाच्याहि झोंपेचें खोबरें झाल्याशिवाय राहातें ना. सूर्योदयापूर्वींच

जागा झालों असें म्हणण्यापेक्षां रात्रभर जागा होतो. तो सूर्योदयापूर्वीच बिछाना सोडून बाहेर आलों म्हणणें वस्तुस्थितिनिदर्शक ठरेल.

रस्त्यावरील दुकानांच्या दारात झोपलेलीं माणसें वजा जातां संबंध रस्ता निर्मनुष्य होता. फिरत फिरत थोडेसें अंतर चालून गेलों. आणि अचानक ब्रह्मपुत्राच्या कांठावरच पोहोंचलों. काकासाहेब कालेलकरांनीं नद्यांना 'लोकमाता' म्हणून संबोधिलें आहे. भट्टीसारख्या तापलेल्या खोलींत झोपेशिवाय सगळी रात्र तळमळून काढल्यानंतर नदीच्या शांत-शीतल कांठावरील वाळूंत बसलेल्या व्यक्तीला काकांनीं वापरलेला लोकमाता शब्द किती सार्थ आहे याची चटकन् प्रचीति यावी हें स्वाभाविकच आहे. आईच्या प्रेमळ हातांचीं बोटें हळुवारपणें डोळ्यांवरून फिरावीं त्याप्रमाणें नदीवरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळुका केसांतून झुळझुळत होत्या आणि मस्तकाला कांठावरल्या वाळूचा स्पर्श आईच्या मांडीसारखाच मऊ व आश्वासन देणारा भासत होता. हळूहळू उगवती उजळूं लागली. धूसर तांबूस प्रकाशांत मधूनच शुभ्र प्रकाशाच्या धारा जरतारीसारख्या लकाकूं लागल्या. थंड उत्तेजक वाऱ्यावर पांखरांची किलबिल भिरभिरूं लागला आणि आसामची लोकमाता स्वयंप्रभा समुज्ज्वला होऊन समोर उभी राहिली. मनांत आलें अशा नदीच्या कांठीं राहाणारे लोक भाग्याचे !

पण केव्हां केव्हां हीच लोकमाता चारी दिशांना आपल्या कृपेचा उत्पात माजविते आणि तेव्हां तिच्या पुराचा सर्वांत जास्त तडाखा दिब्रुगढला बसतो. वर्षानुवर्षे आपण वर्तमानपत्रांत बातमी वाचत आलों आहोंत कीं, "ब्रह्मपुत्राला पूर आला. दिब्रुगढ व आजूबाजूचा कित्येक मैलांचा प्रदेश पाण्याखालीं आहे." मला वाटतें एकदां केव्हां तरी कंपोज केलेला मजकूर व बनविलेले चित्रांचे 'ब्लॉक्स' कांहीं फेरबदल न करतां प्रत्येक खेपेस परत परत छापले तरीहि चालेल, इतकी ती बातमी सामान्य झाली आहे. हिमालयोद्भव नद्यांचें एक दुःख आहे. बर्फ वितळलें म्हणून आणि पाऊस अधिक पडला म्हणून दोन्ही कारणांनीं या नद्यांना पूर येतात व पुराबरोबर वाहून आलेल्या गाळानें पात्र भरलें कीं, जिथें त्या नद्या मैदानांतून वाहातात तिथें त्यांच्या प्रवाहाची दिशा बदलते. दिब्रुगढ हें उत्तर आसामांतील महत्त्वाचें ठिकाण. तें मूळ जागेवरून हालवून दुसरीकडे नेणें अशक्य. त्या-

मुळें कजाग बायकोचीं बोलणीं खात निर्लज्ज चिवटपणानें घरांतच राहाणाऱ्या बावळट नवऱ्याप्रमाणें प्रत्येक खेपेला ब्रह्मपुत्राच्या पुराचा व बदलत्या पात्राचा तडाखा सहन करीत तें आपल्या जागेवर स्थिर आहे ! दरवर्षी येणाऱ्या या अशा पुरांची समस्या सोडविण्याचे प्रयत्न भारत सरकारनें हल्लींच सुरू केले आहेत. पुण्याजवळ खडकवासल्याला एक प्रयोगशाळा आहे. तिथे पद्मश्री जोगळेकर हे या विषयावरील एक तज्ज्ञ आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं ब्रह्मपुत्राच्या पुराला अडवून दिब्रुगढ पाण्याखालीं जाऊं नये म्हणून नदीच्या पात्रांत तिरकस बांध घालण्यांत आले आहेत अशी माहिती एका स्थानिक सरकारी अधिकाऱ्यानें मला सांगितली. इंग्रजींत अशा तऱ्हेच्या दगडी बांधांना 'ग्रॉयन' असा शब्द आहे. हे बांध पाहिल्यावर मला पुराणांतली सहस्रार्जुनाची कथा आठवली. आपल्या हजार हातांनीं त्यानें म्हणे एकदां नदीचें सबंध पात्रच अडवून धरलें होतें ! या दगडी बांधाशिवाय नदीकांठीं तिच्या पात्राला समांतर असा एक लांब वाळूचा बांधहि दिब्रुगडच्या सीमेवर उभा केलेला आहे. पुराच्या वेळीं पाण्याची वाढलेली पातळी अडविली जाऊन दिब्रुगढच्या दिशेनें पाणी पसरूं नये म्हणून ही व्यवस्था केली असावी. माझ्या एका प्रश्नाचें उत्तर मात्र सरकारी अधिकाऱ्यांपैकीं कोणींच दिलें नाहीं. दिब्रुगढच्या बाजूनें नदीच्या पात्रांत घातलेल्या दगडी बांधांनीं पुराचा वेग अडविला जाईल व नदीच्या कांठाशीं समांतर असलेला कांठावरील वालुकाबंध पाणी दिब्रुगढच्या दिशेनें पसरूं देणार नाहीं. परंतु पुराच्या पाण्याचा अडविला गेलेला वेग व त्याचा प्रचंड लोंढा आपल्या सर्व शक्तिनिशीं समोरच्या कांठाकडे धावणार व तिथला सारा प्रदेश व लोकवस्ती आणखी दूरपर्यंत आपल्या पोटांत घेणार त्याचें काय ? नदीच्या पात्रांत उभा राहिलेला सहस्रार्जुन फक्त दिब्रुगढच्या संरक्षणासाठींच कां आहे ? कुणीं तरी सांगितलें कीं, शेती-सुधारण्यासाठीं जे कालवे काढले जातात त्यांच्या कांठावरील माती, जलप्रवाहामुळें धुवून जाऊं नये म्हणून दोन्ही कांठांवर मुद्दाम झाडें लावलीं जातात. त्याचप्रमाणें ब्रह्मपुत्राच्या दोन्ही बाजूला मधून मधून कांहीं ठिकाणीं उंच बांध घालून त्यांवर सध्यां झाडें लावण्याचे प्रयत्न चालू आहेत. तत्त्वतः ही कल्पना बरोबर आहे, पण पूर नेहमीं येतात व झाडें वाढून त्यांच्या मुळांनीं बांधाची माती घट्ट पकडून

ठेवल्याची परिस्थिति निर्माण व्हायला थोडा अधिक वेळ लागतो. तेव्हां कांहीं ठिकाणीं ' फुटतां सागर सिकता-सेतूचें काय त्या पुढें चाले '' अशी परिस्थिति होण्याचा संभवहि खरा. कांहींहि असो. पुण्याच्या प्रयोगशाळेंतील भगीरथ आज नाहीं उद्यां ब्रह्मपुत्राच्या उच्छृंखलपणाला लगाम घालणार याविषयीं मात्र सर्वांचीच खात्री आहे. सर्वांचाच विश्वास आहे.

प्रवासांत डोळे व कान उघडे ठेवले तर अनेक गंमती माहिती होतात असा माझा अनुभव आहे. दिब्रुगढमध्यें उघड्या कानांना दोन गोष्टी ऐकावयाला मिळाल्या. सर्वोदयावाद्यांचे तत्त्वनिष्ठ भाषण आणि कॉम्युनिस्टांचा देशद्रोही प्रचार. सर्वोदयवाद्यांचें म्हणणें होतें, " आपल्याला कुठेंच पळून जावयाचें नाहीं. इथेंच शांतपणें प्रार्थना करतां करतां मृत्यूला आलिंगन द्यावयाचें आहे. चिनी लोकांशीं आमचें कुठलेंच शत्रुत्व नाहीं आम्ही त्यांना बंधूच समजतों. परंतु आज ते आमच्यावर हल्ला करावयास येत आहेत तर आम्ही त्यांच्याशीं असहयोग करूं. "– सर्वोदयवाद्यांचें स्वतःचें धैर्य संशयातीत होतें. त्याच्यामुळें क्वचित् ठिकाणीं जनतेंतहि एक प्रकारचें नीतिधैर्य वाढीस लागत होतें. परंतु चिनी दिब्रुगढपर्यंत येऊं शकतील ही कल्पनाच मला असह्य होती. शिवाय रणांगणावरील चिनी सैनिक म्हणजे केवळ एक कटपुतळी असतो. त्याला स्वतःचें असें हृदय–मन-उरलेलेंच नसतें. दुरून कुठून तरी हालविल्या जाणाऱ्या सूत्राच्या गतीनें तो हालत असतो. तेव्हां अशा यांत्रिक व्यक्तीसमोर सर्वोदयाची दिव्य विचारसरणी कितपत उपयोग पडेल तेंहि मला उमजत नव्हतें. मला असेंहि समजलें कीं, कांहीं गांवांतून सर्वोदयवादी सांगत होते कीं, आमची तर अहिंसेवर दृढ निष्ठा आहे. आज जर आपण पूज्य गांधीजींना विसरलों तर मग भारतापाशीं उरलेंच काय ? अहिंसक प्रतिकार करतां करतां जर आपण मृत्यु पावलों तर चीनच्या इतिहासांत लिहिलें जाईल कीं ही एक अशी अजब प्रजा होती कीं जिनें गुलाम होण्यापेक्षां मरण पसंत केलें. तिनें आमच्याविरुद्ध शस्त्र उचललें नाहीं. पण इतका असहयोग केला कीं आम्हीं तिथें त्यांच्या भूमींत टिकूंच शकलों नाहीं. अर्थात् ज्यांची बंदुकीवर निष्ठा आहे त्यांनीं खुशाल बंदूक उचलावी. पण डरपोकपणें गांव सोडून पळून मात्र कोणींहि जाऊं नये. " परमेश्वराच्या स्वप्नरंजनांतून विश्वाची उत्पत्ति होते आणि सत्पुरुषांच्या

स्वप्नरंजनांतून विश्वाची घडण होत असते असा ज्यांचा दृढ विश्वास आहे त्यांना सर्वोदयवाद्यांच्या विचारसरणींतील तर्कपद्धति नक्कीच मान्य व्हावयास पाहिजे. परंतु प्रचारांतील शेवटची पळवाट मात्र मला वाटतें त्यांनीं सुज्ञपणें माझ्यासारख्या मर्यादित तर्कशक्तीच्या माणसांसाठीं ठेवली असावी. अहिंसा पेलत नाहीं म्हणून

ज्वलंत तव अस्त्र हे नच समर्थ मी घ्यावया
क्षमस्व भगवन् म्हणूनिच धरीं करीं शस्त्र मी ।।

अशी पूज्य बापूजींची क्षमा मागणारा मी ! सर्वोदयाचें तत्त्वज्ञान आत्मसात् करणारा पिंडच निसर्गानें मला दिलेला नाहीं याचें वाईट वाटतें मला, माझा तर्क आहे कीं, बहुसंख्य लोक माझ्यासारखेच असावेत.

सबंध भारताचें भ्रमण करून आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठीं ठिकठिकाणीं मारुतीची स्थापना करणाऱ्या समर्थ रामदासांचें नांव महाराष्ट्रीयांना प्रातःस्मरणीय वाटतें. कालांतरानें आणखीहि एका सत्पुरुषाचें नांव महाराष्ट्रीयांना प्रभात-चिंतनीय वाटेल. ते म्हणजे पूज्य विनोबांचें ! ब्रह्मपुत्राच्या उत्तर किनाऱ्यावर नेफांतील सुबानसरी विभागाच्या सरहद्दीपासून चौदा मैल असलेल्या लखीमपूर शहराजवळ वर्षापूर्वीं विनोबांनीं मैत्री आश्रमाची स्थापना केली. भारताच्या शेजारीं असलेले नेपाळ, भूतान, सिक्कीम, ब्रह्मदेश, तिबेट इत्यादि देशांशीं मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत ही या आश्रमाच्या स्थापनेमागची मूळ कल्पना आहे. बुद्धकालानंतर धर्म वा तत्त्वज्ञानप्रचारक भिक्षूंची नवी पैदास विनोबाजींच्या हस्तें होते आहे. त्यांचें कर्तृत्व कालांतरानें कदाचित् इतिहासाच्या पानोपानीं लिहिलें जाईल. नाहीं तरी सबंध उषःप्रदेश अथवा आग्नेय एशिया भारतानें निर्भय भिक्षूंच्या जोरावरच आपलासा केला होता. सैनिकांच्या नव्हे !

उघड्या कानांना सर्वोदयवाद्यांच्या युद्धनीतीविषयीं माहिती ऐकावयास मिळाली तशीच कॉम्युनिस्टांच्या कुटिल कारवायांबद्दलचीही माहिती ऐकावयास मिळाली. मायदेशाच्या या मारेकऱ्यांनीं आसामांत चालविलेल्या फंदफितुरीची हकीकत अत्यंत चीड आणणारी आहे. आसाम प्रांतांतली शासनसंस्था खिळखिळी करून टाकावयाची, आसामची अज्ञान प्रजा शक्य

तितकी आंतून पोखरून ठेवावयाची व वेळ येतांच चिनी आक्रमणाचा मार्ग सुकर करून द्यावयाचा. या हेतूनें या लालरंगीं अघोरपंथीयांनीं व त्यांच्या शय्या-सोबत्यांनीं बऱ्याच वर्षांपासून या प्रांतांत आपलें बस्तान बसविलें आहे. "आसामी थाके आसामिया भाषा बोलते होबे" ही अस्सल बंगाली घोषणा मुसलमानांच्या तोंडांत कोंबून बंगाली कॉम्युनिस्टांनीं भाषावादाच्या निमित्तानें आसामच्या शासन-यंत्रणेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला, असें जेव्हां कुणी तरी मला सांगितलें, तेव्हां मला मुळींच नवल वाटलें नाहीं! त्यांच्या नेहमींच्या रिवाजाला अनुसरूनच होतें तें. देशविच्छेदनाच्या दुष्कर्मांत स्वयंनिर्णयाच्या गोंडस नांवाखालीं यांनींच नव्हती का, जीनांची भागीदारी केली. पंजाबांत शीखांच्या फुटीर जमात-वेडाला यांनींच नाहीं का चिथावणी दिली!

डोळे मुरडलेली, कंबरेंत लचकलेलीं आणि डोक्यावर हात नेऊन आपल्या जोबनशाहीचा खुला बाजार मांडणारी सिनेतारका रस्त्यावरील दिव्याच्या मंद प्रकाशांत चित्ररूपानें एका भिंतीवर उभी होती. तिच्या पायांशींच, तिच्याच साक्षीनें तीन व्यक्तींत संवाद चालला होता. "आपल्याला सांगितलें पाहिजे कीं, मुक्तिफौज येईल, त्या वेळीं मुसलमानांना भिण्याचें कांहींच कारण नाहीं. चिनी व पाकिस्तानी पंतप्रधानांचा समझौता झाला आहे. त्याप्रमाणें चीन व पाकिस्तान अर्धा अर्धा आसाम वांटून घेणार आहेत. म्हणून चिनी सैनिक आले. तर मुसलमानांनीं त्यांना सर्व प्रकारची मदत केली पाहिजे." दिव्याच्या खांबाचा आडोसा सोडून इंग्रजींत चाललेलें हें संभाषण जरा जवळ जाऊन नीटपणें ऐकण्याची संधि मिळण्यापूर्वींच तिघांनीं तीन वाटा धरल्या. झालेला प्रकार माझ्यासारख्याला तरी अगदींच अनपेक्षित नव्हता.

मला स्वतःला कॉम्युनिस्टांच्या देशद्रोही कारवायांचा अनुभव १९३१–३२ सालापासूनचा आहे. त्यासाठीं श्री. उमियाशंकर दीक्षितांनी आम्हां मुंबईच्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांना या लाल टोळीच्या बाबतींत सावध राहण्याची सूचना दिली होती. त्या वेळीं कायदेभंगाच्या चळवळीला पायबंद घालण्या-साठीं परळ विभागांत कॉम्युनिस्टांनी जंग जंग पछाडले होते. पण जनतेच्या प्रचंड उत्साहापुढें या मूठभर फितुरांचें कांहींहि चाललें नाहीं! बेचाळीसच्या

ब्रिटिश-विरोधी चळवळींत साम्राज्यवादी इंग्रजांची साथ करून या राष्ट्रघातक्यांनीं आम्हां भूमिगत कार्यकर्त्यांना पकडून देण्याचे प्रयत्न वेळोवेळीं केले. परंतु त्याहि वेळीं राजकारणापासून अलिप्त असलेल्या सामान्य हिंदवासियांनीं आपल्या देशप्रेमाच्या बळावर वा लाल फितूरांचे डाव अनेक वेळां उधळून लावून आमचें संरक्षण केलें! लाल चीनचीं पावलें भारताच्या सीमेच्या रोखानें पडूं लागल्यापासूनच मलाच काय, पण सर्वांनाच कम्युनिस्टांच्या पंचमदळी पिसाटपणाची ओळख पटली. भारतमातेच्या पोटीं जन्म घेऊन तिची कूस इंच इंच फाडावयास निघालेले कॉम्युनिस्ट व त्यांचे नादान शय्यासोबती यांच्या कसाब-करणीची ओळख आतां सर्वांनाच पटली आहे. फितुरी व देशद्रोह हाच ज्यांचा धर्म आहे असे कॉम्युनिस्ट आसामांत राष्ट्रघातकी कारवाया करणार ही गोष्ट मला अनपेक्षित नव्हती. परंतु त्यांच्या प्रचाराची ही दिशा मात्र मला नवीन वाटली! दुर्दैव असें कीं, आसामांतली सरकारी यंत्रणा इतकी बेदरकार व बेसावध आढळली कीं या माहितीचा तिच्यावर काडीमात्र परिणाम होईना! बारकाईने पाहिल्यावर आसामच्या सरकारी यंत्रणेचीं तीन व्यंगें नजरेसमोर उघडीं पडलीं. पूर्वींच्या अनुभवी बंगाली अधिकाऱ्यांऐवजीं उच्चपदस्थांच्या नात्यांतले अननुभवी 'शकार' महत्त्वाच्या जागांवर नेमले गेले आहेत. भारताशीं ज्यांची निष्ठा नक्की नाहीं असे मुसलमान अधिकारी नको तिथें काम करीत आहेत व कांही ठिकाणीं प्रत्यक्ष कॉम्युनिस्ट विचारसरणीचे लोकच थोड्या महत्त्वाच्या अधिकारपदांवर आहेत!

सीमेवर युद्धाची आग धुमसूं लागली आहे; तरीहि या प्रांतांत लाल व हिरवे फितुर आपल्या घातपाती कारवाया अनिर्बंधपणें करूं शकतात आणि राज्ययंत्रणा आंधळ्या बेसावधपणानें त्यांच्या बाबतींत निष्क्रिय राहते याची मला भयंकर चीड आली.

११

विविधतेंतील एकतेचा प्रत्यय

बकुलफुलांचे हार रात्रभर
दवांत भिजुनी हरिमुकुटावर
दलांदलांतुनि फुलले सुंदर
हरि हरि गोपाल गोविंदराम
बोहग बिहु चल खेळू या
हुकरी गीतें गाऊं या

दिब्रुगढच्या परिसरांत माझ्या कानांवर पडलेल्या एका आसामी गीताचें हें भाषांतर आहे. कोणत्याहि समाजांतील लोकगीतें व वेळोवेळीं साजरे केले जाणारे सण यांवरून त्या समाजाची मनोरचना, अभिरुचि व संस्कृति यांच्याविषयीं सहज कल्पना करतां येते. आसामांतील बहुतेक जिल्ह्यांत व बहुतेक जाति-जमातींत बोहाग बिहूचा सण मोठ्या धामधुमीनें उजवला जातो. चैत्री अमावस्या व वैशाखाचे पहिले सहा दिवस मिळून एकंदर सात दिवसांचा हा उत्सव! त्यानंतर शेतकरी शेतांतील धान्यपेरणीच्या तयारीस लागतो.

बोहाग बिहूचा पहिला दिवस "गारुबिहू" अथवा गुरांचा सण म्हणून मानला जातो. त्या दिवशीं गाई–बैलांना चांगले स्वच्छ धुऊन शृंगारतात. त्यांच्या शिंगांना हळद लावतात आणि त्यांची पूजा करून त्यांना गूळ व

वांगी खावयास देतात. शेतीच्या व्यवसायांत गुरें हा अविभाज्य घटक कृतज्ञ शेतकरी कुठल्या तरी सणाच्या निमितानें आपल्या गुरांना एक दिवस विश्रांति देतो. भरपूर अन्न देतो व त्यांची पूजा करतो. महाराष्ट्रांत आश्विन वद्य बारस ही वसुबारस म्हणून समजली जाते. त्या दिवशीं घरांतील गोऱ्ह्याची पूजा करून त्याला बाजरीची भाकरी खाऊं घालतात. आषाढी पौर्णिमेला तर बैलपोळ्याचा सण अत्यंत धामधुमीनें साजरा होतो. आणि शृंगारलेल्या गुरांचें कौतुक होतें. मद्रास, म्हैसूर भागांत संक्रांतीचा दुसरा दिवस "माट्टु-पोंगल, अथवा गुरांचा सण म्हणून समजला जातो. गारु बिहू माट्टु पोंगल अथवा बैलपोळा हे समानार्थी शब्द आहेत. भाषाभिन्नत्वानें विभागला गेला असला तरी सबंध भारत हा एक संस्कृति असलेला देश आहे हें या व अशा सणांवरूनहि सहज समजून येतें. गारुबिहूच्या दुसऱ्या दिवसापासून "मान्हु बिहू" म्हणजे माणसाचा सण अथवा मित्रोत्सव सुरू होतो. नेमकी हीच कल्पना असलेला असाच सण काणुम्-पोंगल नांवानें म्हैसूर-मद्रासकडे संक्रांतीच्या तिसऱ्या दिवशीं साजरा केला जातो. मान्हु बिहूची पूर्वरात्र- हिला उरुका म्हणतात- मोठी धामधुमीची असते. अगदीं चैनीची रात्र म्हणावयास हरकत नाहीं. मान्हु बिहूच्या दिवशीं सगळा वेळ मासे पकडण्यांत अथवा हरिणांची शिकार करण्यांत घालावयाचा आणि रात्रीं जें कांहीं मिळालें असेल तें शिजवून वनभोजन साजरें करावयाचें दुसऱ्या दिवसापासून मित्रोउत्सवाला खरी सुरुवात होते. आणि त्याच दिवसापासून नातेवाइकांच्या आणि इष्टमित्रांच्या भेटीगांठी घेणें, त्यांना फराळाला बोलाविणें आणि घरीं विणलेले पंचे भेट म्हणून देणें असे कार्यक्रम चालू होतात.

आसाम प्रांत बराचसा वस्त्र-स्वावलंबी आहे. प्रत्येक घरीं हातमाग असतो व वर्षभर त्या मागावर कापड विणण्याचें काम चालू असतें. भेट दिल्या जाणाऱ्या या पंचांना "गॉमोचा" म्हणतात. मी आपला 'गांवचा' हा शब्द लक्षांत ठेवला. कोंकणांतून फणसपोळी, काजूगर इत्यादि वस्तू नाहीं का आपण गांवची भेट म्हणून आणीत ? तसेंच गांवची भेट म्हणून दिलेला पंचा तो गॉमोचा. बाकी हा पंचा नेसलेला आसामांतला काळा-सांवळा कायस्थ, उचलून आणून कोंकणांतल्या खेड्यांत ठेवला तर

निदान तो बोलेपर्यंत गांवचा म्हणून सहज खपून जाईल. परप्रांतीय म्हणून ओळखूंहि येणार नाहीं. आपल्याकडील कोंकणी पोरगें गौरी-गणपतीला नाचायला जातात तसेच बोहग बिहूच्या दिवसांत आसामांतील तरुण पोरगे घरोघर नाचावसाला जाऊन पोस्त मागत असतात. त्यांच्या नाचांना "बिहूनाछ" असें म्हणतात. त्यांचीं गाणीं बिहूनाम अथवा बनगोशा या नांवानीं ओळखलीं जातात व त्यांना स्वतःला हुकरी-नर्तक अथवा हुकरी-गायक अशी संज्ञा आहे. बोहग बिहूच्या दिवसांतच "सोरी-भटेयली" म्हणजे उघडे बाजार व जत्रा भरतात. भटेयली म्हणजे मुळांतली इंद्रपूजा असावी. एक लांकडी खांब मध्यें पुरुन त्याची पूजा करतात व त्याच्या भोंवतीं जत्रा भरते. कांहीं ठिकाणीं या खांबाचा 'इंद्रध्वज" असाहि उल्लेख मी ऐकला. माझी कल्पना आहे, हें श्रीकृष्णानें सुरू केलेल्या इंद्रपूजेचें आसामांतील बदलेलें स्वरूप असावें.

बोहाग बिहूच्या वेळीं आसामांतील निरनिराळ्या ठिकाणीं व निरनिराळ्या जमातींत होणारीं वेगवेगळीं नृत्यें— खरोखरच अभ्यासनीय आहेत. कदाचित् या लोकनृत्यांतूनच मणिपुरांतील शास्त्रीय व प्रगत नृत्याचा जन्म झाला असावा. बिहूनाचाचीं कांहीं चित्रें तेजपूरजवळ सांपडलीं आहेत, पण तीं बहुधा नवव्या शतकांतलीं असावींत. आसामांतील एक प्रथितयश लेखकमहाशय मला म्हणाले कीं, आसामांतील पहाडी टोळ्यांचीं गाणीं-नाच व संस्कृति हीं अगदीं वेगळींच आहेत व त्यांच्यावर चीन, ब्रह्मदेश— तिबेट वगैरे भारताच्या बाहेरील देशांची दाट छाप पडली आहे. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं एक—दोन पाश्चात्य लेखक व कांहीं ख्रिश्चन मिशनरी यांच्या पुस्तकांचा आधार दिला. मीं मनांत म्हटलें, "साहेब गेला तरी साहेबाची गुलामी अजून रेंगाळतेच आहे." मी त्या लेखकमहाशयांना विचारलें, "बाहेरील देशांपेक्षां पहाडी टोळ्यांच्या नाच-गाण्यांवर आणि संस्कृतीवर भारताचीच छाप पडली असण्याची शक्यता अधिक नाहीं का? आसामचा उल्लेख हिंदुस्तानच्या इतिहास-पुराणांत वारंवार आढळतो. भगवान् बुद्धांचा लौकिक भारतांतून पार आग्नेय आशियांत सर्वत्र पसरला. उत्तरेकडे जिथें हजार बुद्धांची गुंफा आढळते त्या गोबीच्या रणापर्यंत तो गेला. एखादा ह्यू एन् त्सांग सोडला तर वैचारिक प्रवाह

बाहेरून भारतांत आल्याचे फारसे उल्लेख नाहींत. अशा स्थितींत आसामांतील पहाडी टोळ्यांचीं नृत्यगानें बाहेरील परंपरेचीं आहेत असें आपण कसें म्हणूं शकतां? श्रीकृष्णपत्नी रुक्मिणी ही आसामांतील निश्मी जमातीची होती व बाणासुराची राजधानी म्हणजे सध्यांचें तेजपूर हे श्रीकृष्णाची नातसून उषा हिचें माहेर होतें. या पौराणिक कथा सोडल्या तरीहि आसामपासून चीनपर्यंतचे खुष्कीचे व्यापारी मार्गच काय पण समुद्रावरील मार्गहि भास्करवर्म्यासारख्या प्रतापी राजाच्या अधिपत्याखालीं होते असें इतिहास सांगतो. भारत-चीन जलमार्गावर– भास्करवर्म्याचीं जहाजें गस्त घालीत असा उल्लेख आहे. ऐतिहासिक संदर्भ सोडून दिले तरीही इतर भारतीय प्रांतांतील नाच व गाणीं आणि सांस्कृतिक सण यांचें आसामांतील पहाडी नाच-गाणीं व सण यांच्याशीं कांहीं साम्य आहे कीं नाहीं याचा आपण कधीं तपास केला आहे का?" लेखकमहाशयांचें वाचन दांडगें होतें. मला माहीत नसलेल्या पुष्कळशा साहेबांचीं नांवें आतां सांगून आपला मुद्दा मला पटवून द्यावयाचा त्यांनीं प्रयत्न केला. मी नम्रपणें विचारलें, "भगवान् बुद्ध चीनमधल्या निवडुंग प्रांतात जन्माला आला व तिथून तो धर्मप्रसारासाठीं भारतांत आला असें एका पाश्चात्य ख्रिश्चन मिशनऱ्यानें लिहिलें आहे. त्याचें नांव आपणांस आठवतें का?" विनोद न कळण्याइतका गृहस्थ मठ्ठ नव्हता. माझ्या दुप्पट नम्रपणानें त्यानें टोमणा मारला. "असल्या गोष्टींचा अभ्यास पूर्वग्रहदूषित मनानें कधींच करतां येत नाही!" मीहि म्हणालों आपलें म्हणणें सर्वथैव खरें आहे!

अगदीं मूळस्वरूपांतील अधिकृत असें बिहूनृत्य आसामच्या ईशान्येकडील सुबानसरी जिल्ह्यांतील "मिरी" लोकांत पाहवयाला मिळतें. दिब्रुगढजवळहि "मिरी" स्त्री-पुरुष नाचतांना आढळतात. त्यांत दोन पुरुष मृदंगवादन करतात व त्या मृदंगाच्या तालावर दोन मुली नाच करतात. नाच करतांना हुबेहूब आपल्याकडील तमाशांतल्यासारखे त्यांचे एकमेकांना सवाल-जबाब होत असतात. आसाममधील कांहीं उच्चवर्णीय हिंदू मुली नाचण्या-गाण्यांत भाग घेत नाहींत परंतु पूर्व दरांगमधील उच्चवर्णीय "अहोम" व "कलिता" मुली आणि जोरहाटजवळील "चौदांग" मुली नृत्य करणें कमीपणाचें समजत नाहींत. उत्तर लखिमपूरमध्यें हिंदू

धर्मीय "मिरी" लोकांतहि स्त्रिया नृत्यांत नेहमीं भाग घेतात. त्यांची कांहीं नृत्यें तर अतिशय प्रेक्षणीय वाटतात. गुजरातमधील रासनृत्याप्रमाणें या लोकांतहि स्त्री-पुरुषांचा एक संमिश्र नाच आढळतो. त्यांत मृदंगाच्या तालावर पुष्कळसे पुरुष बांसरी वाजवीत वर्तुळाकार फेर धरतात. व त्या वर्तुळाच्या बरोबर आंतल्या बाजूला पुष्कळशा स्त्रिया गोल समांतर परंतु बरोबर विरुद्ध दिशेनें नाचत राहातात. मिरी लोकांच्या आणखी एका नृत्यांत फक्त स्त्रियाच गोल गोल नाचतात आणि त्यांच्यापैकीं एक मुख्य स्त्री गाणें म्हणते. हा नाच पहातांना आपण गुजराती प्रमदांचा 'गरबा' पहात असल्याचा भास होतो. साधारण १८९० पर्यंत मिरी लोकांचीं नृत्यें आसामांत फारच लोकप्रिय होतीं अशी माहिती एका आसामी कवीनें सांगितली. तो म्हणाला, "दुसऱ्या महायुद्धाचीं पावलें आसामांत पडून गेल्यावर सध्यांच्या आर्थिक तंगीच्या दिवसांत या नाचांनाहि मंदी आली आहे."

अहोम् लोक येण्यापूर्वीं आसामांत कछारी लोकांची मूळ वस्ती होती. त्यांचीं गाणीं, नाच व सण संपूर्णपणें इतर हिंदूंसारखेच आहेत. दरांग जिल्ह्यांतील कछारी सात दिवस बिहू उत्सव करतात. आणि गाई-बैलांना हळद व तांदुळाचे पीठ लावून पोळ्याचा सण साजरा करतात. या लोकांत कधीं कधीं दोनच मुली राधाकृष्णाचा नाच करतात. एक मुलगी होते राधा, दुसरी मुलगी होते कृष्ण. हवाइयन हुलाहुलाचा नाच पाहून आणि भोगून आलेल्या परकीयांनीं हा नाच केवळ स्त्री-पुरुषांचें लैंगिक आकर्षण प्रदर्शित करणारा एक नाच आहे असें ठरविलें. व गो स्वामीसारख्या लेखकांनी इतर स्थानिक लेखकांसह त्यांची री ओढली. वास्तविक राधाकृष्णाचा नाच या ना त्या तऱ्हेनें भारतांतील प्रत्येक प्रांतांत खेळला जातो. या नाचाचें मर्म व राधाकृष्णाच्या प्रेमाविषयींच्या भारतीय कल्पना परदेशीयांना समजावून सांगितल्याशिवाय समजणें कठीण ! एखाद्या 'ग्रँट डफनें शिवाजीमहाराज लुटारू होते असें म्हणणें अथवा दुसऱ्या परकीयानें रामकृष्ण परमहंस स्त्रीवेषानें विकृत नाच करीत असें म्हणणें हें जसें भारतीय दृष्टिकोन नसल्यामुळें घडून येतें, तसेंच कछारी लोकांतील राधाकृष्णाचा नाच लोकांच्या लैंगिक भावना उद्दीपित करण्यासाठीं केला

जातो असें लिखाण भारतीय दृष्टिकोण नसल्यामुळें लिहिलें गेलें ! दुसऱ्याच्या प्रतिव्रतांशीं सलगी करण्याचें सुलभ साधन या दृष्टीनेंच ज्या समाजामध्यें नृत्याकडे पाहिलें जातें त्या समाजांतील व्यक्तींना राधाकृष्णाच्या प्रेमांतली उदात्तता व आत्मसमर्पणाची भावना कळणें कठीण ! त्यांना तुळशीचें पान दिव्यत्वाचें प्रतीक न वाटतां लैंगिक प्रतीक वाटणें सहाजिक आहे ! रेव्हरंड सिडने एन्डलला तर कछारी नाचांचा अर्थच कळेना. त्यानें फक्त त्या समाजांतलीं गाणीं एकत्रित केलीं. वास्तविक त्या गाण्यांवरूनहि त्याला कछारींच्या नाचांचा अर्थ कळावयास हवा होता. परंतु दंवांत भिजून फुलणाऱ्या श्रीकृष्णाच्या मुकुटावरील फुलांच्या हारांचें सौंदर्य समजावयाला हृदयांत श्रीकृष्णभक्तीचा उमाळा असावयास लागतो. तो त्याच्यापाशीं कुठून असणार ?

साहेब गेला तरी साहेबानें लादलेली मानसिक गुलामगिरी अजूनहि गेलेली नाहीं. याचा अनुभव मात्र आसामांत पदोपदीं येत होता. कुठल्या तरी परकीय सोम्या गोम्या मिशनऱ्यानें इथे भारतांत येऊन ठाण मांडावें, इथल्या आदिवासी अथवा पहाडी टोळ्यांत फिरून त्या लोकांचीं नग्न अथवा अर्ध-नग्न छाया चित्रें घ्यावीं आणि वरवर पहाणी करून त्या लोकांविषयीं चुकीच्या कल्पनांनीं भरलेलें एखादें पुस्तक लिहावें आणि मग तज्ज्ञपणाचा आव आणून या लोकांची संस्कृति भारतीय संस्कृतीपेक्षां अगदीं भिन्न आहे. ती शक्य तो मूळ स्वरूपांतच सांभाळली पाहिजे असें हेतूपूर्वक विधान करावें ! बस्स ! झालें ! त्या परकीयांच्या शब्दांवर विश्वास ठेवून हिंदी लेखकांनीं व राज्यकर्त्यांनींहि त्यांचा उदोउदो करावा आणि मग इतर भारतीय प्रजेच्या आक्रमणामुळें पहाडी लोकांची मूळ संस्कृति नष्ट होईल अशी घोषणा करून त्यांना स्वायत्त अथवा केंद्रशासित प्रदेशांत राखावें, शेंकडों वर्षें संबंध असलेल्या त्यांच्या शेजारच्या प्रजेपासून त्यांची संपूर्ण ताटातूट करावी, इतकेंच नव्हे तर त्यांच्यापासून वेगळें होण्याची भावनाही वाढीस लावावी ! आहे कीं नाहीं गंमत ! एखाद्या प्रदेशाची अथवा प्रजेची संस्कृति वेगळी आहे असें मानून तो प्रदेश अथवा ती प्रजा इतर भारता-पासून वेगळी करून केंद्रशासित ठेवावयाची ही कल्पनाच मुळीं स्वराज्यांत विकृत वाटते. गोव्यांतील संस्कृति वेगळी म्हणून गोवें केंद्रशासित ठेवाव-

याचें ! गोव्यांतील हिंदू भारतांतील इतर हिंदूंपेक्षां वेगळे नाहींत. गोव्यातील ख्रिश्चन, पोर्तुगीजांच्या उष्ट्या पत्रावळी चाटीत स्वाभिमान व स्वदेशाभिमान यांना मुकलेले, संस्कृतिहीन ! मग गोव्याची स्वतंत्र संस्कृति ठेवावयाची ती कुठली व कां ? आणि तिच्यासाठीं गोवें केंद्रशासित कां म्हणून ठेवावयाचें ? नेमकी हीच परिस्थिति आसामांतील पहाडी टोळ्यांविषयीं आढळते. स्वतः नेहरू पण पहाडी लोकांची मूळ संस्कृति मैदानी प्रजेच्या अधिक्षेपानें नष्ट होईल हे परकीय मिशनऱ्यांचें सांगणें मानून पहाडी लोकांना वेगळें ठेवावें या मताचें ! आठवड्याचे आठ दिवस मानणारे व ज्या ठिकाणीं बाजार भरतो त्या ठिकाणच्या नांवावरून आठवड्याचे वार ओळखणारे प्राचीन संस्कृतींचे लोक ! आधुनिक जीवनापासून खूप दूर असलेल्या त्यांच्या वन्य संस्कृतीचा उदोउदो करावयाचा कीं त्यांना भारतीय संस्कृतींत आत्मसात् करून घ्यावयाचें ? एखाद्या दुर्मिळ वस्तूप्रमाणें त्यांची मूळ संस्कृति वस्तुसंग्रहालयांत प्रदर्शनासाठीं सांडून ठेवावयाची व परकी प्रवाशांना मानववंशशास्त्र शिकविण्यासाठींच जणुं त्यांना आधुनिक जगापासून व संस्कृतीपासून मुद्दाम दूर ठेवावयाचें हा मला तर शुद्ध वेडेपणा वाटतो. इतकेंच नव्हे तर स्वतंत्र भारताच्या इतर प्रजांचाहि अपमान वाटतो. केव्हां केव्हां मला वाटूं लागतें कीं, नेहरूंचा भारताभिमान जाज्वल्य असला तरी परकीय मिशनऱ्यांप्रमाणें त्यांनाहि भारतीय संस्कृतीबद्दल आत्मीयता नाहीं. त्यामुळें संस्कृति-भिन्नत्वाची कल्पना गृहीत धरून त्यांनीं आसामचे चार तुकडे करण्याला परवानगी दिली.

आधुनिक भारताला ललामभूत झालेल्या कांहीं श्रेष्ठ व्यक्तींपैकीं एका व्यक्तीच्या मुखांतून एक प्रखर-तेज मंत्र प्रथम निर्माण झाला. तो मंत्र होता "एक देश, एक वेष, एक भाषा, एक धर्म." ज्यानें भारतमातेवर खरोखरच अमर्याद प्रेम केलें असेल, स्वतःच्या काळजांतल्या ऊन-ऊन रक्तानें तिच्या चरणकमलांसाठीं अळिता रंगवावयाची तयारी दाखविली असेल, त्यालाच या तेजस्वी मंत्राचा अर्थ समजणें शक्य आहे. प्रांतनिष्ठेचे मोहरमी वाघ बनून वेळ येतांच "मुलूखहि जाईल व प्राणहि जाईल," या भीतीनें ज्यांनीं आपल्या आईच्या अब्रूचें उदक परक्यांच्या हातावर सोडण्याची तयारी दाखविली, अशा शिखंडींना या मंत्राचें तेज सहन होणें अशक्य. त्याचा

उच्चार करणें त्याहूनहि अशक्य. परिस्थितीनुरूप ज्यांनीं तत्त्वाला मुरड घालून सत्ताभिलाषानें अभंग भारताची चिरफाड होऊं दिली, त्यांनाहि हा दैदीप्यमान मंत्र पेलणें कठीण गेलें, व अजूनहि जात आहे. भारताच्या पूर्वोत्तर सीमांच्या परिसरांत या विधानांची प्रचीति पावलोपावलीं पहावयास मिळते. कुणी तरी म्हटलें आहे, आसाम म्हणजे एक प्रचंड वस्तु-संग्रहालय आहे. इथें अनेक वंश, अनेक जाति, अनेक पंथ, अनेक संस्कृति व अनेक धर्म पहावयाला मिळतात. खरें आहे! निरीक्षकाला पहावयाला मिळत नाहीं अशी एकच गोष्ट आसामांत आहे. ती म्हणजे, "धर्म-जाति-निरपेक्ष एकसंघ" राष्ट्रवाद–निर्भेळ भारतीयत्व. इतर कुठल्याहि प्रांताइतकीच एक देश, एक वेष, एक भाषा व एकच राष्ट्रधर्म, या घोषणेची आसामला आज अत्यंत जरूरी आहे. पण सीमा प्रांत असल्या-मुळें विशेषेंकरून आसामांतच ज्याचा त्याचा धर्म अथवा ज्याची त्याची तथाकथित संस्कृति ज्यांच्या त्याच्या घरांत! घराच्या उंबऱ्याबाहेर भारतीय हाच प्रत्येकांचा धर्म वा संस्कृति ही शिकवण अगदीं लहानपणा-पासून देण्याची जरूरी आहे. मग ती "एकीनें रहा व नेकीनें वागा" या विनोबाजींच्या शब्दांत असो अथवा "जोंपर्यंत भिन्न भिन्न संप्रदायांत एकी उत्पन्न झाली नाहीं, तोंपर्यंत स्वराज्य टिकविणें अशक्य आहे." या पूज्य बापूजींच्या शब्दांत असो.

आसामच्या "स्निग्धच्छायातरु" सस्यश्यामल भूमीवर भटकतांना माझ्या मनांत सतत येऊं लागलें की राष्ट्रगीतांतहि "पंजाब, सिंध, गुजरात, मराठा" अशी भिन्न प्रांतीयत्वाची सतत स्मृति देणारी आजची आमची अंध दृष्टि कुठे आणि 'दुर्लभं भारते जन्म' असा पुकारा करीत गंगेची कावड रामेश्वरी पोहोंचविण्याची प्रथा निर्माण करणारी प्राचीनांची दूरदृष्टि कुठें! प्राचीन भारतीयत्वाचीच कल्पना, "जाति-धर्म-निरपेक्ष राष्ट्रवादाच्या" शब्दांत राष्ट्रपित्यानें मांडली परंतु तिकडेहि नीट दुर्लक्ष करून आम्हीं बसलों आहोंत! या शतखंडित आसामच्या भूमीवरून कुणी तरी अट्टहासानें पुकारा केला पाहिजे. "मला भारतीय व्हावयाचें आहे! मला भारतीय राहावयाचें आहे! आसेतु हिमाचल भारतावर माझें प्रेम आहे. भारतांतील पर्वतराजी, वनस्थली, नदी–निर्झर फार काय वाऱ्यावर

आंदोलित होणाऱ्या धूलिकणांबद्दल देखील मला आत्मीयता आहे. या यच्चावत प्रदेशांतील विविध प्रजांकडे मी आत्मीयतेनें व समभावानेंच पाहूं शकतों, आणि वेळ येतांच या समग्रभूमीची अस्मिता अविच्छिन्न राखण्यासाठीं स्वतःचे बिनदिक्कत बलिदान करण्याची माझी तयारी आहे. या भारतांत जें जें कांहीं आहे तें तें सारें माझें आहे. बलपूर्वक तें तें सारें मी माझे करीन, माझें ठेवीन. प्रांतवाद, जातीय वाद, धार्मिक असहिष्णुता, भाषाप्रेम (होय नेफांतील टीचभर जनतेंत फैलावूं पाहाणारे जंगल भाषाप्रेम अथवा नखाएवढ्या गोव्यांतील कोंकणीप्रेम देखील) ही अभारतीयत्वाची सारीं लक्तरें फेंकून देऊन मीं माझ्यासाठीं एक नवीन आचारसंहिता निर्माण करीन. माझ्याच मनोवृत्तींत एक प्रचंड असें विजिगीषु परिवर्तन करीन. मी अट्टहासानें म्हणेन भारतांतील शिव-मंदिर तर माझेंच. पण त्याच्याच शेजारी उभी असलेली गिरिजाघर (चर्च) व शून्यालय (मशीद) हींहि माझींच आणि तसें म्हणून प्रजा एकसंघ करण्यासाठीं मी पूर्वीं ज्याप्रमाणें परमेश्वराच्या दशावतारांत भगवान् बुद्धाला स्थान देऊन त्याची अहिंसा आत्मसात् केली त्याप्रमाणें आजहि परमेश्वराचे तेरा अवतार निर्माण करून अकरावा अवतार महमूद, बारावा ख्राइस्ट आणि तेरावा महात्मा गांधी असें मी म्हणेन, असा प्रचार करीन. माझी भाषा संस्कृतनिष्ठ हिंदी, आसामी, बंगाली, मराठी, गुजराती, तामीळ न ठरविता संबध देशासाठीं मी बलपूर्वक एक भारती-भाषा आणि भारती लिपी बनविण्याच्या प्रयत्नाला लागेन. भाषा-प्रेमाच्या अथवा प्रांतनिषेधाच्या आंदोलनांवर तरंगत तरंग प्रांताचा "वालखिल्य" अथवा Liliputian पुढारी होण्याचा मोह टाळून भारताच्या एकात्मतेआड येणाऱ्या साऱ्या लक्ष्मणरेषा सतत पुसणारा एक साधा भारतीय शिपाई राहीन. पूज्य राष्ट्रपित्यानें प्रतिपादिलेल्या "जाति धर्मनिरपेक्ष" राष्ट्रवादाचा फैलाव करण्याच्या प्रयत्नाला मनापासून लागेन... स्वप्नरंजनाला सीमा आकाशाची आणि आसामची "सुवर्णोद्यान" भूमि स्वप्नरंजनाला अत्यंत योग्य! प्रिय मित्र वासूच्या हातांत लगाम होता. म्हणून मनाचा स्वैर घोडा वाऱ्यावरच उडत राहिला नाहीं.

१२

स्वतंत्र भारताची भाग्यरेषा : आसामांतील तेलाचे नळ

आसामच्या जंगलांत तीन नवलाच्या गोष्टी दिसल्या. नाकासमोर धांवणारा गेंडा, नकळत रक्त शोषणारी जळू व दुसऱ्या झाडांच्या जीवनरसांवर पोसणारीं बांडगुळ-फुलें. आसामच्या लोकवस्तींतहि नवलाची त्रिपुटी आढळली. नाकासमोर पहात चालणारा आसामी, नकळत त्याचें रक्त शोषणारा पाकिस्तानी आणि जनतेच्या जीवनरसावर जगणारा कम्युनिस्ट. दिब्रुगढपर्यंत हीं वैचित्र्यें अगदीं जवळून निरखून झालीं होतीं. दिब्रुगढ सोडून पुढें प्रस्थान ठेवणार इतक्यांत एक सणसणाटी बातमी कानांवर आली. संरक्षणमंत्री श्रीकृष्ण मेनन यांना पदच्युत केल्याची. २६ तारखेलाच भारत सरकारनें आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली होती. त्यानंतर चारच दिवसांनीं श्री. मेनन यांना अधिकारपदावरून दूर केल्याची बातमी मी ऐकली. तेव्हां भारत-चीन-संघर्षाला आतां खरें तोंड लागलें असें मला वाटलें. श्री. मेनन फक्त तासन् तास भाषणें करूं शकतात. खऱ्या युद्ध-परिस्थितींत त्यांचा फारसा उपयोग होणार नाहीं याची विचारवंतांना कधींच जाणीव झाली होती. मुंबई उपनगरांतील निवडणुकींत मेनन कां जिंकले याची चिकित्सा करतांना एका मित्रानें उद्गार काढले होते. नेपालेश्वरभाललग्न चिखला कस्तूरिका मानिती नेपाळनरेशाने कपाळाला काळाकुट्ट चिखल लावला तरी अज्ञान जनता त्यानें कपाळाला कस्तूरीच लावली आहे असें म्हणणार. कां कुणास ठाऊक ! नेहरूंनीं हा घाणेरडा


चिखल आपल्या ललाटीं लावला, कांहीं स्वार्थी व बाकीच्या अज्ञानी लोकांनीं त्यांचा कस्तूरी म्हणून उदोउदो केला. पण कपाळींचा हा चिखल नेहरूंना कधीं ना कधीं तरी पुसावा लागणारच !' त्या मित्राचे उद्गार इतक्या लवकर खरे ठरतील असें स्वप्नांतहि वाटलें नव्हतें ! श्री. मेनन यांच्या पदच्युतीनें एक गोष्ट स्पष्ट केली कीं, देशाच्या पंतप्रधानानें केलेली वशिलेबाजीहि लोकशाहींत वेळ येतांच जनतेच्या पायांखालीं तुडविली जाते !

दिब्रुगढहून आसाम राजरस्ता सरळ माकुमवरून दिग्बोईला जातो. दिग्बोईच्या परिसरांतच आसामांतील खनिज तेलाच्या विहिरी आहेत. आणि आसामचीच काय सबंध भारताचीच भाग्यरेषा त्या तेलानें उजळून निघाली आहे. चहाचे मळे आणि तेलाच्या विहिरी हीं आसामचीं दोन वैशिष्ट्यें आहेत. सबंध भारताला जरूरी असलेल्या तेलाचा तिसरा भाग आसाम पुरा पाडतो आणि एकोणीस टक्के परदेशी हुंडणाजवळ फक्त चहा विकून मिळते. कुणीं तरी म्हणालें, "चीनची नजर आसामच्या तेलावर आहे." मीं मनांत म्हटलें, चीनचे पक्षपाती श्री. मेनन आतां निघून गले आहेत. आतां लोहित फ्रॉन्टीयर डिव्हिजनमधील रिमाकिविथू रस्त्यावरून आंत घुसणें चीनला कठीण आहे. अर्थात् भारतांतून चीनमध्यें व चीनमधून भारतांत नेहमीं येणारे-जाणारे मिश्मी लोक पंचमस्तंभी कारवाया करणें शक्य आहे व त्यांच्याच मदतीनें चिनी सैन्य भारताच्या हद्दींत घुसण्याचा प्रयत्न करीलहि. परंतु तिथेंच त्यांचा इतका प्रतिकार होईल कीं तें दिग्बोईपर्यंत पोहोंचूंच शकणार नाहीं. दिग्बोईच्या तेलावर बाहेरून संकट येण्यापेक्षां आंतूनच येण्याची शक्यता आधिक होती. जवळच माकुम-मध्यें चिनी लोकांची बरीच वस्ती होती व पंचस्तंभीयांच्या बाबतींत नेहमींच ढिलाईनें वागणाऱ्या भारत सरकारनें माकुममधील चिनी लोकांविषयीं फारशी दक्षता बाळगल्याचें दिसत नव्हतें.

खनिज तेल वाहून नेण्यासाठीं घातलेले प्रचंड नळ जगांत अनेक ठिकाणीं आहेत. पण पूर्व आसामचें तेल वाहून नेण्यासाठीं घालण्यांत आलेले नळ जगांत अपूर्व आहेत असें सांगतात. पूर्वेकडील दिग्बोईपासून पश्चिमेकडे बिहार प्रातांतील बरौनीपर्यंत या तेल-नळांची लांबी सातशेंवीस मैल

आहे ! या नळांवर चीनची दुष्ट नजर वळणें अगदीं साहजिक आहे. अर्थात् दिग्बोईचें तेल सगळ्या गिरिमाला ओलांडून तिबेटला नेणें ही गोष्ट जरी अशक्य असली तरी तेलाच्या विहिरी व तेल वाहून नेण्यासाठीं घातलेले नळ यांचा नाश करून भारताच्या आर्थिक प्रगतीला पायबंद घालण्याचा दुष्टपणा करणें चीनला सुचणारच नाहीं असें मात्र नाहीं. आणि एवढ्याच एका कारणासाठीं आसाम संरक्षणदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्याहि अगदीं स्वयंपूर्ण असा व्हायला पाहिजे.

आसामच्या तेलाची कहाणी मोठी रसप्रद आहे. इ. स. १८२८ मधील गोष्ट. एक इंग्रजी लष्करी अधिकारी आसामच्या पूर्व भागांतील आज्ञात प्रदेशांची पहाणी करीत होता. त्या वेळीं त्याला कित्येक झऱ्यांच्या पाण्यावर तेल तरंगतांना आढळलें. आपल्या रिपोर्टांत त्यानें या गोष्टींची नोंद करून ठेवली. जगांत तेलाच्या विहिरी कुठेंच खोदल्या गेल्या नव्हत्या. त्या वेळची



ही गोष्ट आहे. तेलाची पहिली विहीर खोदण्याचा मान अमेरिकेचा आहे. ती विहीर १८५९ मध्यें खोदली गेली. आसाममधील तेलाची पहिली विहीर १८६७ मध्यें खणून झाली व इ. स. १९०० मध्यें दिग्बोईला तेल-शुद्धि कारखाना सुरू झाला. गेलीं साठ वर्षें दिग्बोईचें तेल भारतांत सर्वत्र वापरलें जात आहे. अर्थात् तेवढ्या तेलानें आपल्या देशाची संपूर्ण गरज़ भागत नव्हती. १९४४ सालीं दिग्बोईच्या विहिरींतून सर्वांत जास्त म्हणजे आठ कोटी गॅलन तेल निघालें. परंतु पुढें तें हळूहळू कमी होत गेलें. दिग्बोईचें तेल कमी होऊं लागल्यामुळें आसाम प्रांतांत पुन्हा तेलाचा शोध सुरू झाला. १९५३ मध्यें दिग्बोईपासून वीस मैल असलेल्या बडी दिवांग नदीच्या कांठीं दहा हजार फुटांवर तेल सांपडलें. या जागेचें नांव होतें नहोरकटिया. आतां त्याच नांवाची एक सुंदर नगरी तिथें वसली आहे. नहोरकटियाजवळच मोरान म्हणून एक स्थळ आहे. तिथेंहि तेल सांपडलें. तें दर वर्षीं सुमारें तीस लाख टन निघेल असें शास्त्रज्ञांचें मत असल्याची माहिती 'आसामबानी'च्या संपादकीय मंडळावरील एका सद्‌गृहस्थानें मला सांगितली.

भारताच्या ईशान्य सीमेजवळ तेलाचा भरपूर सांठा मिळाला तरी तें तेल शुद्ध करावयाचे कारखाने तिथेंच ठेवणें व्यावहारिकदृष्ट्या योग्य नव्हतें. म्हणून असें ठरलें कीं, ब्रह्मपुत्राच्या कांठाकांठाने तेलाचे नळ टाकून तेल गोहाटीपर्यंत न्यावें. तिथें नूनमतील एक लहानसा शुद्धीकरण कारखाना काढावा व पुढें तिथूनच तेंच तेल नळांतून उत्तर बंगाल ओलांडून बिहार मध्यें गंगाकाठीं वसलेल्या बरौनीपर्यंत नेऊन एका प्रचंड तेल-शुद्धी कारखान्यांत सोडावें. प्रांत व भाषा यांच्या राक्षसी वेडानें पछाडलेल्या लोकांना आसाम-मधलें तेल शेजारचा बंगालहि ओलांडून पलीकडे बिहारमध्यें नेण्याची कल्पनाच वेडगळपणाची वाटत होती. असह्य होत होती. त्यांनीं पुष्कळ ओरड केली. तारापूरच्या अणुकेंद्र स्थापनेच्या वेळींहि महाराष्ट्र-गुजरात मध्येंहि अशीच वेडगळ चर्चा चालू होती. परंतु शास्त्रीय गोष्टींना शास्त्रीय कसोट्याच लागतात. भाषा आणि प्रांत यांच्या संकुचित मर्यादांत या गोष्टी बसूं शकत नाहीत हें भारतांतील आम जनतेच्या लक्षांत येत नाहीं. तिला तें समजून सांगण्याइतकी बुद्धि आणि नेकीहि प्रांतिक पुढाऱ्यांपैकीं फारच थोड्यांपाशीं

असते. म्हणून असल्या कटु चर्चा होत रहातात. तेलशुद्धी कारखान्याला पुष्कळशा पाण्याची जरूरी असते म्हणून गंगाकांठावरील बरौनी ही जागा पसंत केली गेली. ही साधी गोष्ट आसामी पुढाऱ्यांना समजावून सांगण्यांत बिचाऱ्या नेहरूंचा बराच दम निघाला होता म्हणे !

दिग्बोई-बरौनी 'पाइपलाईन' हें एक प्रचंड साहस आहे. आणखी चार-पांच महिन्यांनीं या नळांतून वाहणारें तेल जेव्हां जेव्हां नीटपणें शुद्ध होऊन बाहेर पडेल तेव्हां तेव्हां भारताच्या वैज्ञानिक यशाचे पवाडे जगभर गाइले जातील. तेलाचे नळ साध्या पाण्याच्या नळासारखे नसतात. ते टाकतांना अतिशय जोखीम पत्करावी लागते, व अमाप खर्च करावा लागतो. शिवाय अचूक ज्ञान असलेलें यंत्रविशारद व दैनंदिन संचालन करणारे निष्णात प्रशासक यांचीहि जरूरी लागते. दिग्बोईहून निघालेले तेलाचे नळ उभे पहाड, घनदाट वनप्रदेश, शेतजमिनी, नद्या–नाले या सर्वांना ओलांडून गेले आहेत. हिमालयांतील गिरिदऱ्यांतून वर–खालीं होत गेलेल्या या नळांतून तेल वाहातें ठेवणें हेंच मुळीं एक दुष्कर कार्य आहे. मला माहिती मिळाली कीं वाटेंत, वेगानें वहाणाऱ्या एकंदर ७८ नद्या ओलांडून ते नळ गेले आहेत. शिवाय ब्रह्मपुत्राचें एक मैल रुंदीचें पात्रहि त्यांनीं ओलांडलें आहे. ज्या वेळी हे नळ घालण्याचा निर्णय घेण्यांत आला त्या वेळीं ब्रह्मपुत्रावर पूल नव्हता. तो आतां नुकताच बांधला गेला आहे. परंतु अजूनहि तो रहदारीला मोकळा केलेला नाहीं. मुसळधार पाऊस व नद्यांना येणारे पूर याविषयीं आसाम प्रसिद्ध आहे. अशा परिस्थितींत नदीकांठानें जाणाऱ्या त्या नळांचें संरक्षण कसें करावयाचें हा एक बिकट प्रश्न होता. त्या नळांच्या बाजूनें जाणारी रेल्वे-लाइन अथवा रस्ता केव्हांहि वाहून जाण्याचा धोका होताच. दऱ्याखोऱ्यांतून जाणारे हे नळ पस्तीस हजार शेतकऱ्यांच्या शेतजमिनींतून गेले आहेत. नळ टाकतांना या सर्व शेतकऱ्यांना नुकसान-भरपाई द्यावी लागली !

नहोरकटियाच्या विहिरींतून निघालेल्या तेलांत मेणाचें प्रमाण बरेंच आहे. त्यामुळें अनेक वेळां तेंल नळांतच थिजून बसतें. तें सतत वाहतें ठेवण्यासाठीं त्याची द्रवता वाढवूनच मग तें नळांत सोडावें लागतें. कच्च्या तेलाचा दाब प्रत्येक मैलाला दर इंचाला पंधरा रत्तल कमी होतो. तो प्रत्येक

चौरस इंचाला पंधराशें रत्तल कायम ठेवावा लागतो. दाब वाढला तर नळ फुटेल, कमी झाला तर वाहाणें बंद होईल ! या अशा शृंगापत्तींतून सुटण्यासाठीं व तेलाचा दाब सतत एकधारी ठेवण्यासाठीं प्रत्येक शंभर मैलांवर एक पंपिंग स्टेशन बांधून तें चोवीस तास कार्यक्षम ठेवावयाची सोय केली आहे. पंपिंग-स्टेशनें स्वयंप्रेरित स्वयंचलित आहेत व ती बांधावयाला प्रत्येकीं सव्वालाखावर खर्च आला. जिथें अनेक माणसें बेकार आहेत. तिथें माणसांना डावलून यंत्रांकडून काम करून घेणें अयोग्य अशी माझी समजूत होती. म्हणून मी प्रश्न केला, " हीं स्टेशनें यंत्रांऐवजीं माणसांकडून चालविलीं असतीं तर खर्च कमी नसता का आला ? " माहितीपूर्ण उत्तर मिळालें–पंपिंग-स्टेशनें माणसांकडून चालविण्याचें ठरविलें असतें तर अशीं माणसें व त्यांचीं बायकामुलें मिळून एक वसाहतच प्रत्येक ठिकाणीं करावी लागली असती. मग तिथें टेलिफोन, शाळा, दवाखाना आणि दुकानें इत्यादिकांची सोय करणें भाग पडलें असतें. शिवाय या वसाहतींना जोडणारा आणि आसामच्या पावसापाण्यांत टिकून राहाणारा कित्येक मैल लांबीचा रस्ता व त्यावरून धांवणारीं वाहनें यांचीहि सोय करावी लागली असती. इतकें करूनहि नळांची देखरेख नीट राहील याची शाश्वती नाहींच. कारण आजारी पडणारे व ऐन कामाच्या वेळेला आजाराच्या निमित्तानें खोटी रजा घेऊन घरीं राहाणारे कामचुकार कामगार केव्हां आणि कसें दुर्लक्ष करतील याचा नेम नाहीं. आणि खनिज तेलासारख्या ज्वालाग्राही पदार्थांबाबत झालेल्या क्षुल्लक निष्काळजीपणाचेंहि भीषण परिणाम होऊं शकतात. या सगळ्या अडचणींना विशेषतः शेवटच्या ' फर्नांडिसी ' माणसांना घाबरून तेलकंपनीनें अत्यंत थोडे कुशल व जबाबदार कामगार व बाकी सर्व कारभार यंत्रचलित असा संच उभारण्याची सोय केली. माहिती देणाऱ्या व्यक्तीच्या तोंडचा ' फर्नांडिशी ' हा शब्द ऐकून मी चकितच झालों ! एका कामगार पुढाऱ्याच्या नांवाचें असें रूपांतर झालेलें मला रुचलें नाहीं. पण नंतर मला समजलें कीं हें बोलणारी व्यक्ति मुंबईचीच रहिवासी होती.

प्रत्येक पंपिंग स्टेशनला जोडून एक प्रचंड टाकी असते. बाहेरील हवेच्या दाबांत होणारा फेरफार तिला स्पर्श करूं शकणार नाहीं अशी तिची

रचना केलेली असते. या टाकींत तेल सांठतें व तिच्यांतूनच पुन्हां पंपिंग होऊन पुढें जातें. टाकी बहुधा अर्धी भरलेली रहाते. त्यापेक्षां अधिक भरली तर स्वयंचलित पंप जोरानें काम करतात. कमी भरली तर सावकाश कार्य करतात. सगळीं पंपिंग स्टेशनें व त्यांच्या टाक्या स्वयंचलित असल्या तरी एका मध्यवर्ति स्थानावरून त्यांनीं देखरेख ठेवली जाते. केव्हां केव्हां नळांना भेगा पडून त्यांतून तेल व गॅस बाहेर झिरपून पेट घेण्याचा संभव असतो. शिवाय खनिज तेल शेतजमिनींत पसरलें तर ती जमीन शेतीला निरुपयोगी होते. तेलनळांची व्यवस्था माणसांकडे सोंपविली असती तर नळाच्या फटींतून बाहेर पडणाऱ्या अशा तेलाची व गॅसची माहिती मिळेपर्यंत पुष्कळ वेळ गेला असता. परंतु पंपिंग स्टेशनवरील तेलाच्या टाकींतील ठराविक दाबांत पडलेल्या फरकावरून ही माहिती कांहीं सेकंदांतच विद्युत्-चुंबकीय लहरींनीं पोहोंचविली जाते व तिथें अलार्म अथवा धोक्याच्या घंटा वाजतात. लाल बत्त्या पेटतात व अमुक ठिकाणीं बिघाड झाला आहे याची माहिती मिळते. निमिषांतच कंट्रोलिंग रूममधून निघणाऱ्या रेडिओच्या विद्युत्-चुंबकीय लहरींनीं शेंकडों मैल दूर असलेले दोन दोन टनांचे व्हाल्व्ह फिरविले जातात आणि दोन स्टेशनांमधील तेलाचा प्रवाह एकदम बंद केला जातो. सातशेंवीस मैल लांबीच्या या नळांत कुठेंहि जरासा धोका अथवा बिघाड निर्माण झाला तर मध्यवर्ति स्थानावरून हेलिकॉप्टरनें निष्णात माणसें पाठवून दुरुस्ती करण्याची सोय केली जाते.

गोहाटी व बरौनी येथील तेलशुद्धिकेंद्रें रुमानिया व रशिया यांच्या मदतीनें बांधलीं गेलीं आहेत. सबंध पाइप-लाइनची अकल्पनीय रचना बर्माशेल या इंग्लिश कंपनीच्या मदतीनें केली गेली आहे. कांहीं महिन्यांनंतर जेव्हां नहोरकटियाचें तेल आपला सातशेंवीस मैलांचा प्रवास सुरू करील तेव्हां तीन आठवडेपर्यंत त्याचा प्रवास निर्विघ्नपणें चालू आहे कीं नाहीं यावर वीजाणू यंत्राच्या हजारों डोळ्यांनीं देखरेख ठेवली जाईल. तीन आठवड्यांनीं तें तेल बरौनी येथील शुद्धिकेंद्रांत पोहोचेल.

दिग्बोई येथील तेलाच्या विहिरी व भारताची भाग्यरेषा समजली जाणारी पाइप-लाइन उध्वस्त करण्यासाठीं पूर्वेकडून किबिथू व उत्तरेकडून लोंगजू या ठिकाणांहून चिनी सैन्य हल्ला करण्याच्या तयारींत असणार.

परंतु रुमानिया, रशिया व इंग्लंड या तीन देशांनी भारताला दिलेली मदत उध्वस्त करून या तीन देशांचा विरोध पत्करण्या-पूर्वी चीनला बराच विचार करावा लगेल. अर्थात् दण्डशक्तीला सद्विचारांचे वावडें असतें व तिचा मुकाबला दण्डशक्तीनेंच करावा लागतो. संरक्षणाच्या दृष्टीनें सबंध आसाम प्रांताप्रमाणें या नळांचीहि आणखी एका ठिकाणीं शोककथा झालेली आहे. नेपाळ व पाकिस्तान यांच्यामधील उत्तर बंगालच्या फक्त पंचवीस मैल रुंदीच्या भूमिभागावरून या नळांचा मार्ग गेलेला आहे. दिग्बोईपासून गोहाटीपर्यंत ते नळ ब्रह्मपुत्राच्या दक्षिणेस आहेत. परंतु पुढें मात्र ते ब्रह्मपुत्राच्या पुष्कळच उत्तरेला आणि सिक्कीम व भूतान यांच्यामधील चीनच्या ताब्यांत असलेल्या खिंडीपासून अतिशयच जवळ आहेत. इथूनहि कदाचित् चिनी सैन्य हे नळ तोडण्याचा प्रयत्न करणें शक्य आहे.

१३

विसरलेली भारतीयकरणाची परंपरा

" डॉक्टर, गोहाटीहून दिब्रुगढला येतांना आपण शिवसागरला थांबलों नव्हतों. आतां परत जातांना जरूर थांबू या!" तिथें तलावाच्या कांठीं एक शिवमंदिर आहे. तें आसामांतलें सर्वांत मोठें देवालय आहे असें म्हणतात." नेहमींप्रमाणें वासूच्या ज्ञानकोशांतलें पान बोलतें झालें. मी वासूला म्हणालों, "कुठल्या तरी अहोम राजानें अथवा राणीनें हें मंदिर अमुक सालीं बांधलें व शिवरात्रीला दरवर्षी इथें मोठी जत्रा भरते इतकी माहिती सांगून तूं थांबलास कीं तुला ठाऊक नसलेली आणखी कांहीं माहिती मी सांगतों ती नीट ऐक. हें हिंदूंचें देवालय आहे. त्यामुळें त्याच्या डागडुजीकडे कुणीहि लक्ष दिलेलें नसणार. शेवाळामुळें त्याचा कळस कोळपून काळा पडलेला असणार! त्यावर एखादें पिंपळाचें अथवा वडाचें झाड रुजून आलेलें असणार. त्या झाडामुळें कळसाच्या विटा हळूहळू अलग होत कोसळून खालीं पडण्याच्या बेतांत नक्कीच असणार. या देवळाच्या बाहेरच्या भिंतींवर "रमणविलासिनी गोळ्या" अथवा पुरोहित श्वासकासहारीची दुहेरी रेषांतील जाहिरात तुला कदाचित् दिसणार नाहीं. परंतु देवळाच्या आंतील भिंतींवर एक गोष्ट नक्की आढळेल. ती म्हणजे सहलीसाठीं आलेल्या हिंदु मुलां-मुलींनीं कोळशानें अथवा चाकूच्या पात्याने खरडलेलीं स्वतःचीं इंग्रजी नांवें! देवळाच्या सभामंडपांत आडवे पडलेले दोन चार भस्मचर्चित साधूहि भांगेच्या तारेंत इकडे-तिकडे थुंकतांना तुला आढळतील. देवळाचा

पुजारीहि शिवतीर्थ घेतल्यामुळें ब्रह्मानंदांत मग्न झालेला दिसेल. देवळाच्या आवारांत पवित्र गोमय व सभामंडपांत पारव्यांची विष्ठा सर्वत्र सांडलेली असणार! तें पाहून स्मशानवासी शुभंकराला स्वच्छ-अस्वच्छ या ऐहिक कल्पना स्पर्शहि करूं शकत नाहींत अशी त्या पुजाऱ्याची प्रांजल समजूत असल्याबद्दल तुझी खात्री होईल. एक गोष्ट लक्षांत ठेव. तूं स्थानिक रहिवाशी नसून परप्रांतीय हिंदू भाविक आहेस असें जर त्या पुजाऱ्यांच्या लक्षांत आलें तर त्याची समाधि भंग पावेल व देवळांत प्रवेश केल्यावर पावलो-पावलीं कुठें किती दक्षिणा ठेवावयाची याची माहिती तो अगदीं अचूक-पणें तुला सांगू लागेल. कदाचित् एखादा मंत्र म्हणून तुझ्या तीर्थरूपांना स्वर्गाचा दरवाजा आपण खाडकन् उघडून दिल्याचा निर्वाळाहि तो तुला देईल. पुजाऱ्याची लगट टाळून देवाला शोधीत तूं जिज्ञासूपणानें देवळाच्या अंतर्गृहांत शिरलास तर कुजत असलेलीं फुलें, विझत असलेला दिवा आणि भिजत असलेली पिंडी अंधारांत अदृश्य होत असलेली तुला आढळेल. दवळाच्या गाभाऱ्यांतून तूं बाहेर येशील त्या वेळीं बहुधा देवळाच्या पायरी-वर तुला एखादा हिंदुत्वनिष्ठ आढळेल. तो महात्मा गांधीपासून विनोबा-पर्यंत व सरकारी मंत्र्यापासून आसामी मुसलमानापर्यंत प्रत्येकाला शिव्यांची लाखोली वहात हताश निष्क्रिय बसलेला असेल. बाष्कळ बडबड बाजूला ठेवून विठोबापाशीं धरणें धरणाऱ्या सानेगुरुजींच्या तिरिमिरीनें अथवा हातांत झाडू घेऊन लोकांचीं आंगणें झाडणाऱ्या सेनापतींच्या चिकाटीनें आपलेंच देऊळ, आपलेंच धर्मस्थान, आपलेंच भावनामंदिर स्वच्छ व सुंदर करण्यासाठीं हा कधीं तरी प्रयत्नशील होईल का असा जर तूं प्रश्न विचार-लास तर शिवमंदिराच्या गर्भगृहांतून गंभीर उद्घोष होईल कीं नाहीं! नाहीं! नाहीं!

लोकांना दिसावें म्हणून स्वतःचें व्यंग मुद्दाम उघड्यावर टाकणाऱ्या विकृत मनोवृत्तीच्या एखाद्या भिकाऱ्याप्रमाणें आसाम सरकारहि आपल्या परिचय-पत्रिकेंतून पडझड होऊं पहाणारी, पारव्यांच्या विष्ठेनें लडबडलेली ही परित्यक्त वास्तु पहाण्यासाठीं प्रवाशांना आमंत्रीत असते.

असें सांगतात कीं, शिवसागराचा तलाव गांवाच्या मध्यभागीं असूनहि गांवाच्या पातळीपेक्षां उंच पातळीवर आहे. नवल करण्यासारखी गोष्ट

आहे. शिवमंदिर बांधणाऱ्या शिवसिंह राजाची तेवढीच अब्रू लोकांनीं आसामांत शिल्लक ठेवली आहे. त्यानें बांधलेल्या शिवमंदिराची स्थिति पहाण्यासाठीं जर त्याला परमेश्वरानें पुन्हां जिवंत केलें तर आसाम सरकार आणि मंदिरांचे पुजारी यांचे तो नक्की शिरकाण करील!'

शिवसागराच्या परिसरांत आणि शिवसागर–जोहराट मार्गावर अहोम् लोकांच्या वैभवशाली इतिहासाचे अनेक भग्नावशेष पहावयाला मिळतात. राजा रुद्रसिंहानें बांधलेलें, भूपृष्ठाखाली तीन मजले असलेलें तळातलघर, राजा प्रमत्तसिंहाने हत्तींच्या साठमाऱ्या पहाण्यासाठीं निर्मिलेलें रंग-घर अथवा राजा राजेश्वर सिंहानें बनविलेलें सात मजली कोरंग-घर या वास्तु अहोम् राजांच्या उत्कर्षशाली विकसित झालेल्या स्थापत्य-कलेची कल्पना देतात! खंडित स्थितींत आजहि त्या प्रेक्षणीय वाटतात. राजा शिवसिंहा-प्रमाणेंच इतर अहोम् नृपतींनीं अनेक ठिकाणीं शिवमंदिरें आणि तळीं बांधलीं आहेत. याच मंदिरांभोवतीं व तळ्यांच्या आसपास आक्रमक म्हणून भारतांत शिरलेले परकीय लोक संपूर्णपणें भारतीय कसे केले गेले याची नवलगाथा ऐकावयास मिळते.

आज भारतीय प्रदेशांत शेंकडों वर्षें राहाणाऱ्या आसामच्या पहाडी टोळ्या भिन्न संस्कृतीच्या आहेत व म्हणून त्यांना आत्मसात् करणें कठीण आहे असें भारत सरकार मानतें, इतकेंच नव्हे तर त्यांना इतर भारतीयां-पासून वेगळें ठेवते. शिवसागर तलावाच्या पूर्वेला अठरा मैलांवर चराइदेव ही अहोम् जमातीची पहिली राजधानी आहे. तिथें फिरत फिरत अहोम् राजवंशाच्या इतिहासाचीं पानें चाळलीं तर परकीय प्रजा त्यांच्या देवाधर्मा-सकट आत्मसात् करण्याचें तंत्र प्राचीन भारतीयांनीं किती पराकोटीला नेलें होतें त्याची साक्ष पटते.

अहोम् हे मूळचे भारतीय नव्हेत त्यांची जमात मंगोलियन वंशाच्या टाई जातीची उपशाखा होती. मान्स, नेग्रीस व चिनी यांच्या संकरांतून तिची उत्पत्ति झाली असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. आजहि सायामच्या आखातापासून उत्तरेस आसामपर्यंत त्यांची वस्ति पसरलेली आहे. १२८२ सालीं या जमातीच्या कांहीं टोळ्या सु-का-फा राजाच्या नेतृत्वा-खालीं पत्काई खिंडीतून ब्रह्मपुत्राच्या खोऱ्यांत उतरल्या व तिथून पुढें

कामरूपपर्यंत घुसल्या. मूळच्या हिंदू राजांना जिंकून त्यांनीं आपलें राज्य स्थापलें. आपल्या प्रदेशांत शिरलेले हे पराक्रमी लोक आत्मसात् केले नाहींत तर ते कायमचे शत्रु म्हणून राहातील हे आसामांतील आर्य ब्राह्मणांनीं ओळखलें. फार प्राचीन काळापासून आपल्या प्रदेशांत येणाऱ्या परकी लोकांच्या भारतीयकरणाची प्रथा त्यांनीं घालून ठेवली होती. हे ब्राह्मण एखाद्या टोळी प्रमुखापाशी जात व त्याचे पूर्वज पूर्वीं भारतीयच होते व कांहीं अज्ञात कारणांमुळें त्यांना आपलें भारतीयत्व लपवून ठेवावें लागलें असें सांगत. इतकेंच नव्हे तर त्यांच्यां पूर्वजांचा एखाद्या भारतीय देवतेशींहि संबंध जोडून देत. या गोष्टीमुळें तो टोळीप्रमुख आनंदित होई व भारतीय संस्कृति स्वीकारी. त्याच्याबरोबर त्याचे अनुयायीहि भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगूं लागत.

त्या ब्राह्मणांनीं ' कोच ' राजांना शिवाचे वंशज ठरविले व त्यांच्या प्रजाजनांसकट त्यांना भारतीय बनविलें. हे प्रजाजन मूळचे क्षत्रिय होते पण परशुरामाच्या भयानें त्यांनीं गिरिकंदरांचा आश्रय घेतला व कलांतरानें त्यांचे वंशज आपली मूळ संस्कृति विसरून गेले अशी आख्यायिका रचून त्यांनीं समस्त कोच प्रजा क्षात्रवर्णांत समाविष्ट केली. त्याचप्रमाणें त्यांनीं दिमापूरच्या कछारी राजांना भीमाचे वंशज ठरविलें व त्यांच्या प्रजाजनांना क्षत्रियोचित यज्ञोपवीत घालण्याचा अधिकार दिला. मणिपूरच्या राजाचा अर्जुनाशीं संबंध जुळवून त्यांनी मणिपूरची समस्त प्रजा भारतीय संस्कृतींत समाविष्ट केली, नवीन आलेल्या अहोम् राजांचा मूळ पुरुष इंद्र होता असें सांगून त्यांनीं अहोम् राजांचा संस्कृत भाषा व भारतीय संस्कृति यांची दीक्षा दिली. आसामांतील अनेक जमातींच्या या सांस्कृतिक परिवर्तनाचा इतिहास मोठा रम्य आहे. रुद्रसिंह; प्रमत्तसिंह, राजेश्वरसिंह ही अहोम् राजांचीं संस्कृत नांवें ऐकलीं कीं आसामांतील त्या काळच्या समाजधुरीणांच्या चतुराईचें कौतुक करावेंसें वाटतें. आलेल्या नदीला पोटांत घेणाऱ्या सागराप्रमाणें त्यांनीं आपल्या संस्कृतीच्या परिसीमा विशाल बनविल्या होत्या. आसामांतच काय पण इतरत्रहि ज्या काळीं आणि ज्या स्थळीं ब्राह्मणांनीं आपल्या संस्कृति सभोंवार लक्ष्मणरेषा ओढली त्या काळीं आणि त्या स्थळीं भारतीय संस्कृति विकलांग होऊन परकीय संस्कृतीचें भक्ष्य

बनली. शिवसागरासभोंवार फिरतां फिरतां माझ्या मनांत आलें कीं, आज कूपमंडूक वृत्ति सोडून पुन्हां एकदां समानतेच्या तत्त्वावर सर्वांना आत्मसात् करून घेणाऱ्या नव्या संस्कृतीचा फैलाव आसामांत व्हावयाला पाहिजे. तरच पहाडी व मैदानी आसामी लोकांच्या अनेक समस्या सोडविणें शक्य होईल.

ला. न...७

१४

धगधगती नागभूमि

भाषाभिन्नत्वाच्या निमित्तानें भारताचे पंधरा तुकडे अगोदरच पडले होते.



१९६० सालच्या लोकमान्य-पुण्यतिथीच्या दिवशीं तिचा आणखी एक तुकडा उडाला. भारतांतर्गत एक ख्रिश्चन राज्य निर्माण झालें. त्या राज्याचें नांव 'नागभूमि'. भारतांतील बहुसंख्य लोकांना अगदीं अजूनपर्यंत तरी नाग नांवाची एखादी जमात आपल्या देशांत कुठें वस्ती करून आहे याची तिळमात्र कल्पना नव्हती. पाताळांत-भूगर्भांत-कुठें तरी सरपटणाऱ्या सापांची—नागांची—वस्ती आहे, तिथें पांच पांडवांतला एक अर्जुन गेला होता व त्यानें तिथल्या नागराजाच्या उलुपी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें ही कीर्तनांत सांगितली जाणारी दंतकथाच बहुतेकांच्या परिचयाची.

मला आठवतें, आमच्या शेजारीं राहणाऱ्या एका वृद्धेला जेव्हां मी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला कीं जवाहरलाल नेहरूंनीं एक नागांचें नवीन राज्य निर्माण केलें, तेव्हां कलियुगांत पाताळांत जावयाचा रस्ता नेहरूंना कसा सांपडला याचेंच ती नवल करीत बसली. तिला काय माहीत कीं, प्रांतीयतेच्या दुरभिमानासमोर एकदां मान

तुकविल्यावर एकच वेळ काय पण हजार वेळसुद्धां पाताळांत जावयाचा रस्ता सांपडणें नेहरूंना कठीण नाहीं म्हणून !

घनदाट अरण्यें व घनघोर पहाड यांनीं व्यापलेला एक अरुंद आणि लांबट भूभाग ब्रह्मपुत्राच्या दक्षिण किनाऱ्याशीं समांतर पसरला आहे. नकाशावर बोट ठेवीत वासू म्हणाला, " हा नागांचा प्रदेश. थेट दक्षिणेकडे मणिपूर, उत्तरेकडे ऊर्वसीयम् अथवा नेफा, पूर्वेला ब्रह्मदेश व पश्चिमेला आसामचें मैदान. अशा सीमा असलेल्या जवळजवळ सव्वा सहा हजार चौरस मैलांच्या या प्रदेशांत साडेपांच लाख लोकवस्ती आहे. "

काझीरंगा-गोलघाटवरुन खालीं दक्षिणेकडे वळलें कीं, अनेक जातींचीं वन्य श्वापदें असलेलें नाम्बूरचें निबिड अरण्य लागतें. आसामांतील प्राचीन कछारी संस्कृतीच्या अवशेषांवर तें पसरलें आहे. याच अरण्यांतून गोल-घाटपासून दिमापूरपर्यंतचा रस्ता जातो. दिमापूरला भूतकालीन कछारी राज्याची राजधानी होती. रघुवंशांतील कुश राजाला आपल्या परित्यक्त वस्तूंची दुर्दशा सांगणाऱ्या अयोध्येच्या अधिदेवतेप्रमाणें दिमापूरची नगर-देवताहि नाम्बूरच्या जंगलांत आपल्या उध्वस्त वैभवाचीं खिन्न गीतें आळवतांना आढळते. दिमापूरहून मणिपूरला जाणाऱ्या रस्त्यावरच-दिमापूरहून फक्त पंचेचाळीस मैल दूर-कोहिमा शहर वसलें आहे. नागांच्या भूमींतून जाणारा नागमोडी वळणाचा दिमापूर-कोहिमा रस्ता सर्वच दृष्टींनीं मोठा दगलबाज आहे.

या रस्त्यावर एक जागा अशी आहे कीं तिथें एखादा प्रचंडकाय खडक डोंगरमाथ्यावरून खालीं कोसळून रस्त्यावरच्या माणसाचा कपाळमोक्ष केव्हां करील त्याची कल्पना करणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें जंगलांत लपलेल्या बंडखोर नागाच्या बंदुकींतून सुटणारी एखादी गोळी या रस्त्यावरील प्रवाशाच्या छातींतून केव्हां आरपार निघून जाईल याचीहिं शाश्वती नाहीं.

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या नागभूमींतील बंडखोर नागांविषयींच्या तुरळक बातम्या मी मधून मधून वाचल्या होत्या. ज्यांना परस्परांच्या भाषाहि समजत नाहींत अशा पंधरा-सोळा जंगली टोळ्या एकत्र होऊन स्वतंत्र भारताविरुद्ध बंड पुकारतात व 'श्रीनागेश' सारख्या ख्यातनाम सेनानींच्या हाताखालील राज्ययंत्रणेलाहि त्राही भगवान् करूं शकतात ही घटनाच मला

मोठी नवलाची व विचित्र वाटूं लागली. भारतांत वेगवेगळ्या चौदा भाषा आहेत, तर नाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या लोकांत भिन्न भिन्न अशा सोळा भाषा आहेत. महाराष्ट्रांतील ब्राह्मणांत, सारस्वतांत, जशा अजूनहि अनेक आणखी पोटजाती आढळतात तशाच नागलोकांच्या एका टोळींत आणखी कांहीं पोटजाती असतात. इतकेंच काय पण महाराष्ट्रांतील स्वतःला उच्च मानणाऱ्या जातींप्रमाणें नाग लोकांतील आओ जमातीमधील चुंग्ली नांवाची पोटजात खाद्य-पदार्थांच्या बाबतींत सोवळें–ओंवळें, विटाळ सर्व कांहीं सदाशिवपेठी–कटाक्षानें पाळते. एका आसामी सद्‌गृहस्थानें नागांच्या एकंदर एकोणीस जमाती-नव्हे, प्रमुख जमाती आहेत असें मला सांगितलें. परंतु आओ, अंगामी, लोथ, सेमा, रेंग्मा, कोन्याक या नांवांपलीकडे इतर जमातींचीं नांवें त्याला आठवेनात.

पूर्वीं ब्रिटिश आमदानींत नाग लोकांच्या या जमाती सामान्यपणें शत्रूला दुर्लंघ्य अशा उंच टेकड्यांच्या माथ्यावर वेगवेगळ्या ठिकाणीं वस्ती करून राहात. रस्त्यांच्या अभावीं त्यांचें परस्पर दळणवळण फारच क्वचित् होत असे. नाग लोक पूर्वीं एकमेकांच्या खेड्यांवरहि छापे घालीत, लुटालूट करीत व माणसांचीं मुंडकीं छाटून नेऊन त्यांनीं आपलीं घरें शृंगारीत. पुढें मनुष्यवधाला व लुटालुटीला ब्रिटिश कायद्यानें बंदी झाल्यामुळें हे प्रकार हळूहळू बंद पडले. यामुळें नेहमीं युद्धाच्या तयारीनें राहाणाऱ्या नागांचीं चपळाई व मर्दपणा हळूहळू कमी होत गेला.

प्राचीन युद्धांत वापरल्या जाणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या तरवारींचा अभ्यास केलेल्या तज्ज्ञांचें असें म्हणणें आहे कीं पुढें निमुळती टोंकें असलेल्या तलवारी आर्य लोक वापरीत तर टोकांशीं रुंदावत गेलेल्या पात्याच्या तलवारींनीं अनार्य लोक लढाई करीत. युक्ति व शक्ति यांच्या वापरावर या शस्त्राची रचना झाली असावी. कदाचित् नाग लोकांत पुढें रुंदावत गेलेल्या पात्याच्या तलवारी आढळतात. कुणी तरी मला सांगितलें कीं सध्यां मारामारी व शेती या दोन्ही कामाला त्यांचा उपयोग होत असतो. " दा ओ ऽ " असें कांहीं तरी चमत्कारिक नांव आहे या तलवारीचें.



इंग्रजांनीं नागांच्या चालीरीतींत हस्तक्षेप केला नाहीं. उलट त्यांना त्या जतन करण्यासाठीं प्रोत्साहन दिलें. परंतु नागांचे धर्मांतर करण्यासाठीं नागभूमींत शिरलेल्या अमेरिकन मिशनऱ्यांनीं नागांची– निदान ख्रिश्चन झालेल्या नागांची––मूळ संस्कृति पद्धतशीरपणें नष्ट केली. गांवजेवणावळी, समारंभांतून होणारीं नृत्यें आणि रंगीबेरंगीं पोषाख हीं नागांचीं वैशिष्ट्यें अमेरिकन मिशनऱ्यांनीं पार नाहींशीं करून टाकलीं. बोलतां बोलतां एक अंगामी नाग तरुण मला म्हणाला कीं, " अंगामी नागांमधील स्त्रियांचा अपवाद वगळल्यास इतर नाग स्त्रियांना हल्लीं सुखी जीवनाची व पाश्चात्त्य चालीरीतींची चटक लागल्यामुळें त्या अनैतिकतेच्या मार्गाकडे वळूं लागल्या आहेत व त्यामुळें नागांचें सर्व समाजजीवनच उध्वस्त होऊं लागलें आहे. त्या तरुणानें आणखीहि एकदोन गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला, " बाप्टिस्ट मिशनऱ्यांनीं नागांना युरोपियन पद्धतीचीं घरें बांधावयास शिकविलें, परंतु आसामच्या दमट हवेंत तीं कुचकामी ठरलीं. नाग लोकांत बहुप्रिय होत

चाललेल्या पाश्चात्त्य पोशाखावर टीका करतांना तो म्हणाला, " आसामच्या दमट हवेंत घामट झालेला हा पोषाख प्रत्यहीं धुतला जात नाहीं व त्यामुळें गजकर्णासारखे चामडीचे रोग नाग लोकांत फार फैलावले आहेत." मी हळूच म्हणालों, " अपराध पोषाखाचा नसून लोकांच्या अस्वच्छ राहाणीचा आहे. "

मी त्या नागतरुणाला विचारलें, " सुभाषबाबूंच्या आझाद हिंद फौजेंत भारतीय स्वातंत्र्यासाठीं लढणारा झेड् फिझो अंगामी नागच होता ना ? " " होय, फिझो आमच्याच जमातीचा आहे. " त्या तरुणानें उत्तर दिलें. " आणि २ फेब्रुवारी १९४६ पासून आजतागायत स्वतंत्र सार्वभौम नागराज्यासाठीं तो जिवाचें रान करतो आहे." " अगदीं तारीखवार इतिहास लक्षांत राहिलेला दिसतो तुझ्या ? " मी म्हणालों. त्या तरुणानें उत्तर दिलें, " आम्हीं नागांनीं १९५२ सालीं सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव केला होता. त्या वेळीं क्रान्तीची हांक खेड्यापाड्यांतून अगदीं मुलांमुलींमध्यें पसरली होती. मीहि एक स्वातंत्र्य-सैनिक होतों त्यावेळीं. " " अरे, पण भारतीय स्वातंत्र्यासाठीं लढणारा फिझो भारतांतून फुटून स्वतंत्र नागभूमीची मागणी कशी करूं लागला ? " मीं विचारलें. त्या तरुणाचें उत्तर मोठें मासलेवाईक होतें. तो म्हणाला, " आसामी सरकार व आसामी हिंदू यांनीं आम्हांला अगदींच क्षुद्र व मागासलेले समजून ठेंचावयाला सुरुवात केली म्हणून तर आम्ही स्वतंत्र सार्वभौम नागराज्याची मागणी करूं लागलों.

मी त्या तरुणाला विचारलें कीं, " निरनिराळ्या नाग टोळ्यांना परस्परांच्या भाषाहि समजत नाहींत, मग त्या सर्व टोळ्या एकत्र होऊन सरकारविरुद्ध बंड करावयास कशा तयार झाल्या ?" मिस्किलपणें हंसत त्या तरुणानें उत्तर दिलें, " भारतांतहि अनेक भाषा होत्या. मग सगळे भारतीय एकत्र होऊन इंग्रजांविरुद्ध कसे लढले ? जनतेची स्वातंत्र्येच्छा हीच खरी जनतेला एकत्र आणणारी शक्ती आहे आणि कुठलीहि विरोधी शक्ति तिला दाबून ठेवूं शकत नाहीं."

झेड्. फिझो ही एक अत्यंत प्रभावशाली व स्वतःच्या जमातीसाठीं त्याग करणारी व्यक्ति आहे असें ऐकलें. त्यांची नागसंघटनेची कल्पना डॉ. आंबेडकरांप्रमाणें सतत अन्यायाविरुद्ध लढण्याच्या मनोवृत्तींतून निर्माण

झाली. नाग नॅशनल कौन्सिलची स्थापना करून त्यांनीं प्रत्येक नाग टोळींतून आपले हस्तक व प्रचारक निर्माण केले व नागांची अस्मिता जागृत करून त्यांना आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढावयास प्रवृत्त केले. सध्यां अस्तित्वांत असलेली " नागभूमि " नवगांव व शिवसागर जिल्ह्यांतील ' नाग प्रदेश ', ' मणिपूर ' व ब्रह्मदेशांत नागांची वस्ती असलेला सर्व प्रदेश स्वतंत्र व सार्वभौम नागराज्य म्हणून निर्माण करण्याचें त्यांचें स्वप्न होतें. देशांतील चालू राजकारणाविषयीं सूक्ष्म माहिती असलेल्या एका व्यक्तीकडून मला हकीगत समजली कीं, नागलोकांशीं चांगुलपणानें व सामोपचारानें वागून त्यांना आपल्यांत मिळवून घ्या असें श्री. नेहरूंनीं श्री. जयरामदास दौलतराम यांचे करवीं आसाम सरकारला सांगितलें होतें. आसामचे गव्हर्नर असतांना स्वतः जयरामदास दौलतराम यांनींहि या दृष्टीनें प्रयत्न करण्याची शिकस्त केली. परंतु प्रांतीय सरकारनें त्यांना या बाबतींत तिळमात्र सहकार्य दिलें नाहीं. व्यक्तिगत स्वार्थानें लडबडलेलीं कांहीं प्रांतीय सरकारें अखिल भारतीय दृष्टीनें विचारच करूं शकत नाहींत, हें देशभर पसरलेल्या कॉंग्रेस सत्तेचें एक वैगुण्य आहे.

१९५३ सालीं नागांचें सशस्त्र बंड झालें. १९५६ सालीं नाग लोकांनीं " नाग फेडरल गव्हर्मेंट " नांवाचे प्रतिसरकार स्थापून " रेंग्मा " नागांच्या " फेनसिन यू " खेड्यांत स्वतंत्र नागांचें निशाण फडकविलें. नागांच्या पुष्कळशा जमातीत फार प्राचीन काळापासून गणराज्यें अस्तित्वात आहेत. आओ नागांच्या संस्कृतीनें तर गणराज्य पद्धतींत उच्चत्व मिळविलें होतें.

या गणराज्य पद्धतीमुळेंच सबंध नागांचें एकीकरण करून त्यांचा सशस्त्र उठाव करणें झेड्. फिझो यांना शक्य झालें असें वाटतें. अर्थात् जगांत बहुतेक ठिकाणीं घडतें त्याप्रमाणें नागभूमींतील उठावामागेंहि ब्रिटिशांची कुटिल कारवाई व अमेरिकन मिशनचा पैसा होता असें माझ्या कानावर आलें. याची सत्यासत्यता इतिहासच सांगेल.

राजकारणाच्या खेळांत स्वतंत्र सार्वभौम नागभूमीच्या कल्पकांची हार झाली व अखेरीस भारतांतर्गत नागराज्य स्थापन झालें याचें बरेंचसें श्रेय श्री. नेहरूंच्या कुशलतेला आहे यांत शंका नाहीं. अगदीं १९४६ पासून

नाग लोक भारतांतच राहिले पाहिजेत असा आग्रह त्यांनीं धरला होता. नागराज्याची स्थापना झाली तरीहि असमाधानी नाग लोक मधून मधून बंडाळी करीतच राहिले. अखेरीस भारतीय संघराज्यांतील इतर घटकांप्रमाणें नाग लोकांचा एक स्वतंत्र प्रांत १ ऑगस्ट १९६० रोजीं बनविला गेला. झेड्. फिझो भारताबाहेर पळून गेले व एल्. सॉलवेडोर पासपोर्टवर इंग्लंडमध्यें जाऊन इंग्रजी नागरिक म्हणून स्थाईक झाले. आजहि इंग्लंडमध्यें आपला पूर्वीचा साथीदार मायकेल स्कॉट या पाद्र्याबरोबर त्यांच्या भारतविरोधी कारवाया चालूच आहेत.

नवजात नागराज्याची राजधानी कोहिमा येथें आहे. ती अशी ठेवण्यांत अहेतुकपणें का होईना एकप्रकारचें औचित्य साधलें गेलें आहे. गेल्या महायुद्धांत भारतांत शिरूं पाहणारी जपानी सेना कोहिमा येथेंच थांबविली गेली व भारतावरील परदेशीय फौजांच्या आक्रमणाला पायबंद घातला गेला. त्या फौजेशीं लढतां लढतां कोहिमाच्या रणांगणावर जे सैनिक गारद झाले त्यांच्या नांवें तिथें एक स्मृति-शिला उभारलेली आहे. तिच्यावरील शिलालेख फार आवडला मला. तो असा:–

तुम्ही जेव्हां घरीं परत जाल तेव्हां आमची आठवण
देऊन त्यांना सांगा कीं त्यांच्या " उद्यांसाठीं " आम्हीं
आमचा " आज " समर्पण केला आहे.

नागांच्या खेड्यांतून फिरतांना त्यांची ग्रामव्यवस्था व समाजव्यवस्था यांचें ओझरतें दर्शन झालें. कांहीं इतर ठिकाणची ऐकीव माहितीहि समोर आली. लोकशाहीपासून एकतंत्री राज्यव्यवस्थेपर्यंत राज्यपद्धतींचे सारे प्रकार नाग लोकांच्या जीवनांत आढळतात. सेमा नागांचा टोळी-प्रमुख वंशपरंपरागत असतो, तर कोन्याक नागांचा प्रमुख एखादा लोकांनीं निवडलेला, अत्यंत बलशाली असा सरमुखत्यार असतो आणि त्याला धर्मगुरूसारखा मान दिला जातो. अंगामी व लोथ नागांमध्यें कुटुंबप्रमुखांचें एक मंडळ जमातीचा सर्व कारभार पहातें, तर आओ नागांत अत्यंत विकसित अशी गणराज्यप्रद्धती आढळते. नागांच्या विशेषतः आओच्या प्रत्येक गांवांत वरचा व खालचा असे दोन विभाग असतात. त्यांना खेल म्हणतात. प्रत्येक खेलांत अनेक कुटुंबें राहतात. खेलामध्यें बखेडा निर्माण

झाला तर ग्रामसभेचे सभासद एकत्र जमून निवाडा देतात. या सभासदांना " तात " या नांवानें संबोधिलें जातें, पिता अथवा मुख्य पुरुष या अर्थी संस्कृतांत वापरलेला ' तात ' शब्द नाग भाषेंत वापरलेला पाहून मला गंमत वाटली. एका आओ नागानें मला माहिती दिली कीं, खेलांमध्यें जीं अनेक कुटुंबें राहतात त्यांना मेपु असा शब्द आहे. तसेंच या प्रत्येक कुटुंबांतून अथवा कुळांतून गांवाच्या सार्वजनिक हिताचीं कामें करण्यासाठीं तज्ज्ञ व हुषार माणसांचें जें स्वयंसेवक-दल तयार केलें जातें त्यांस मेपु अंग किंवा मापाँग असें म्हणतात.



एका खेड्यांत एक खूप उंच छप्पर असलेली झोंपडी आढळली. वाघ, डुक्कर, हरिण यांचीं मुंडकीं " दाओड " व अंड्यांच्या टरफलांच्या माळा


यांनीं ती शृंगारलेली दिसली. ही झोंपडी म्हणजे गांवाचे सार्वजनिक सभागृह व शयनगृह आहे असें मला कोणी तरी सांगितलें. या सार्वजनिक झोंपडीला मोरांग असें म्हणतात. आओ नाग याच झोंपडीला अरिचू असें म्हणतात. बारा वर्षांवरील सर्व मुलगे रात्रीं अरिचूमध्यें झोंपतात. त्यांना तिथें लुटुपुटीच्या लढाया करावयाला लावून पूर्वी युद्धकलेचें शिक्षण दिलें जात असे अशी माहिती वासूनें सांगितली मला. हल्लीं एकट्या मुलाला दिवा न घेतां मध्यरात्रीं जंगलांत पाठविणें किंवा अचानक छापा घालणाऱ्या दुसऱ्या मुलाशीं कुस्ती करणें अशीं धाडसाचीं कामें करवून घेऊन आओ नाग आपल्या मुलांना धीट बनवितात. युद्धकला मागें पडली तरी अरिचूमध्यें आजहि मुलांना नृत्य-गायनाचें शिक्षण दिलें जातें व त्या नृत्य-गायनांत जुन्या युद्धप्रसंगाचें स्मृतिशेष आढळतात. मुलांप्रमाणें मुलींचेहि अरिचू असते. तिथें म्हणे मुलींना सूतकताई, विणकाम, गृहव्यवस्था इत्यादिकांचें शिक्षण दिलें जातें. नागांतली प्रत्येक मुलगी जन्मजात कुशल विणकर असते असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. नागकन्यांनीं विणलेल्या रंगीबेरंगी शाली मणिपूरपासून शिलाँगच्या बाजारापर्यंत पहावयाला मिळतात. एका आसामी दुकानदारानें मला सांगितलें कीं, शालीवर असलेल्या निरनिराळ्या रंगीत वेलबुट्टीवरून कुठल्या जमातींतील नागकन्येनें ती शाल विणली आहे तें सांगतां येतें.

नागांच्या घरचें जेवण अगदीं कोंकणी माणसाच्या जेवणासारखें तिखट असतें. भात, मोहरीच्या पानांसारख्या चवीची जरा पातळ भाजी, ओले कांदे इत्यादि वस्तू असलेलें नागांचें जेवण पोटभर जेवायला कोंकणी जीभच पाहिजे. मधु नांवाची तांदुळापासून बनविलेली मदिरा देऊन आलेल्या पाहुण्याचें आदरातिथ्य करण्यांत नाग-कुटुंब अतिशय तत्पर असते. ती मदिरा किंचित् आंबलेल्या ताडीसारखी लागते. मदिरेला मधु हेंदेखील संस्कृत नांव वाटतें. पण कांहीं ठिकाणीं भातापासून बनविलेल्या दारूला ऑपाँग असेंहि नांव असल्याचें ऐकलें. जेवण झाल्यावर आलेल्या पाहुण्याला केव्हां केव्हां थोडीशी अफू घेणार का म्हणूनहि विचारलें जातें. अमेरिकन मिशनऱ्यांपैकीं कांहींनीं आओ व कोन्याक नागांमध्यें अफूचा मुद्दाम प्रसार केला असें मीं ऐकलें, पण बाप्टिस्ट मिशनऱ्यांनीं ख्रिश्चन झालेल्या लोकांत

दारूबंदी करण्याचा जो कटाक्षानें प्रयत्न केला तो पाहिल्यावर त्यांचेबद्दल केलेला हा आरोप खरा वाटत नाहीं.

कोहिमाहून परत जातांना संध्याकाळच्या कोंवळ्या उन्हांत डोंगराच्या उतारावर पण उंच ठिकाणीं पट्ट्यापट्ट्यांनीं केलेली भातशेती मोठी प्रेक्षणीय वाटली. या शेतांना वरून वहात येणाऱ्या पाण्याचें शिंपणें होत असतें. त्या शेताकडे पाहून मला महालक्ष्मीवरील घोड्याच्या शर्यतीच्या संपूर्णपणें भरलेल्या प्रेक्षकगृहाची आठवण झाली. दुरून त्या प्रेक्षकगृहासारखींच दिसतात तीं.

नागप्रदेशांतून परत जातांना माझ्या मनांत एक विचार सारखा घोळत होता, कीं चीन-भारत युद्धाची संधि साधून नागलोक पुन्हां आपल्या स्वतंत्र सार्वभौम नागराज्याच्या कल्पनेनें उठाव तर नाहीं ना करणार? भारत सरकारनें त्या सर्व प्रदेशांत पुष्कळच बंदोबस्त ठेवला आहे आणि बहुसंख्य नागांचीं शस्त्रेंहि काढून घेतलीं आहेत. परंतु ब्रह्मदेशाच्या हद्दींतून चिनी हेर व शस्त्रें आणि पाकिस्तानांतून छुपीं हत्यारें नागभूमींत आणण्याचें काम आसाममधील व बंगालमधील कॉम्युनिस्टांकडून होण्याची दाट शक्यता आहे. गोहाटीला पोहोंचल्यावर माझ्या कानावर आलें



वरचा खेल व खालचा खेल यांमधील झोपड्या दर्शविणारें नागांच्या खेड्याचें रेखाचित्र

कीं कॉम्युनिस्टांनीं केलेल्या अशा प्रकारच्या तुरळक प्रयत्नांना धुडकावून लावून बऱ्याचशा नागांनीं आपली निष्ठा भारताशींच असल्याचें प्रदर्शित केलें. पण कॉम्युनिस्ट स्वस्थ बसत नसतात. ते स्वस्थ बसलेले नाहींत हे अधून-मधून येणाऱ्या बातम्यांवरून ध्यानांत येत होतें.

१५

ऊर्वसीयममध्यें पदार्पण

भौगोलिकदृष्ट्या आसामच्या भूमीचे तीन स्वाभाविक विभाग पडतात. उत्तर विभागांत हिमालयाच्या उंच पर्वतश्रेणी पसरल्या आहेत त्यांची कांहीं शिखरें पंधरा-वीस हजार फुटांहून उंच आहेत आणि "नेमचा बैखा" हें सर्वोच्च शिखर २५४४५ फूट आहे. आसामचा उत्तर विभाग "हिमालय" म्हणून ओळखला जातो. आसामचा पूर्व व आग्नेय दिशेकडील प्रदेश अनेक पहाडांनीं व्यापलेला आहे. गारो, खासी, जंतिया, उत्तर कछार इत्यादि पहाडी प्रदेश याच विभागांत आहेत. याच विभागांत शिलाँग व चेरापुंजी हीं सुप्रसिद्ध स्थळें आहेत. जगांतील सर्वांत अधिक पाऊस याच प्रदेशांत पडतो. म्हणून आसामच्या या विभागाला मेघालय असें म्हणतात. ब्रह्मपुत्र नदीचें खोरें म्हणजे आसाम-भूमीचा साठ मैल रुंदीचा मुख्य प्रदेश ! दिवाँग, सुवनश्री, दिसाँग, घनश्री इत्यादि नद्या ब्रह्मपुत्राला मिळतात व बहुधा वर्षाऋतूंत त्याच्यामध्यें आपलें पाणी ओतून सर्वत्र जलप्रलय माजवितात ! म्हणून आसामच्या ब्रह्मपुत्र खोऱ्याला "जलाशय" असें नांव शोभून दिसतें !

भारताच्या नकाशावर पाहिलें तर आसामची भूमि नजरेंत आलेल्या दूरवरच्या भक्ष्यावर झडप घालण्यासाठीं, उंच कड्यावरील आपल्या घरट्यांतून उड्डं पहाणाऱ्या एखाद्या पूर्वाभिमुख गरुडासारखी दिसते. या गरुड पक्ष्याची मान, डोकें, चोंच व गळ्याकडचा भाग म्हणजेच स्वतंत्र भारताची रक्तरंजित ईशान्य सीमा ! हिंदुस्थानच्या आसाम प्रांतातील

अगदीं ईशान्येकडचा हा प्रदेश "नॉर्थ ईस्टर्न फ्रॉंटीयर एजन्सी" अथवा 'नेफा' या इंग्रजी नांवानें ओळखला जातो. डॉ. राममनोहर लोहिया व पूज्य विनोबाजी या दोन व्यक्ति मात्र या प्रदेशाचें 'ऊर्वसीयम' हें भारतीय नांव कटाक्षानें वापरतांना आढळतात. आसामचा 'हिमालय' व बराचसा 'मेघालय' प्रदेश मिळून झालेली घोड्याच्या नालाच्या आकाराची ही ईशान्य भूमि तेहसीस हजार चौरस मैल पसरली आहे. सात हजार फुटांपासून वीस हजार फुटांपर्यंत उंच असलेले पहाडी प्रदेश, घनदाट पथहीन वन्य प्रदेश, अनेक खोल दऱ्या, त्यांतून वेगानें वाहणाऱ्या कित्येक नद्या, तीन चार हजार फुटांवरून कोसळणारे धबधबे, नागफणीसारखे ताठ सरळ नितळ पहाड, यांनीं ही भूमि व्यापली गेली आहे. साधारणपणें तीस ते पस्तीस निरनिराळ्या टोळ्यांचे मिळून साडे सहा लाख लोक या पहाडी भूमींत वस्ती करून आहेत. नेफा वा ऊर्वसीयम या भूमीच्या सीमा पश्चिमेला भूतान, उत्तरेला तिबेट व सिकॉंग व पूर्वेला ब्रह्मदेश या प्रदेशांना भिडल्या आहेत. भूतानपासूनची तिच्या टोंकापर्यंतची तिबेट व हिंदुस्थान यामधील सरहद्द म्हणजेच प्रसिद्ध मॅकमोहन रेषा.

इंग्रजी अमदानींत "इनर लाइन्स रेग्युलेशन" या कायद्याखालीं नेफाच्या हद्दींत कोणालाहि पूर्वपरवानगीशिवाय प्रवेश करतां येत नसे. त्या वेळीं हा प्रदेश शिकारीसाठीं भटकणाऱ्या इंग्रजांची "राखीव क्रीडाभूमि" होता. शिवाय डॉ. वेरियर एल्विनसारख्या मानववंशशास्त्राच्या अभ्यासकांनींहि तिला आपली प्रयोग-शाळा बनविली होती. मुंबईतील लोकांना कुणी सांगितलें कीं, "डांगमधील आदिवासींची मूळची वन्य संस्कृति आहे तशीच कायम राहावी, तुमची भाषा व तुमची पुढारलेली संस्कृति यामुळें त्यांच्या जीवनाला अनिष्ट वळण लागूं नये म्हणून यापुढें तुम्हांला डांगमध्यें प्रवेश करावयाची परवानगी नाहीं, तर काय वाटेल आपल्याला ? हें सांगणाऱ्या व्यक्तीचा मेंदू ठिकाणावर आहे कीं नाहीं, याचाच तपास करावयास लागूं आपण. परंतु नेमक्या याच मुद्द्यावर म्हणजे नेफामधील साडे सहा लाख लोकांची वन्य संस्कृति बदलूं नये आणि तिच्यावर "भारतीय" संस्कृतीचें आक्रमण होऊं नये म्हणून नेफाच्या हद्दींत कुणालाहि, – मग तो स्वतंत्र भारताचा रक्ताचा नागरिक असला तरीहि, –

आज परवानगीशिवाय प्रवेश करतां येत नाहीं. आहे कीं नाहीं गंमत ! विविधतेंत एकता पाहणाऱ्या स्वतंत्र भारताच्या इतर कोट्यवधि लोकांपेक्षां नेफामधील वन्य जमातीची संस्कृति कांहीं वेगळीच आहे असें आपलें भारत सरकार (किंवा मिनिस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अफेअर्स) ठरवितें ! कुणाच्या सांगण्यावरून ? तर मानववंशशास्त्राचा—फक्त मानववंश शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या डॉ.वेरियर एल्विन् या परकीय ख्रिश्चन मिशनऱ्याच्या सांगण्यावरून ! नेफांतील पहाडी टोळ्यांत कांहीं ठिकाणीं बौद्ध धर्म आढळतो तर इतर टोळ्या शिव, शक्ति, अग्निदेव, वायु, पृथ्वी यांचीं दैवतें म्हणून पूजा करतात. महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यांतील कुठल्याहि खेड्यांत ज्याप्रमाणें ग्रामदेवतांची आणि भुताखेतांची भीति बाळगून जगणारे लोक आढळतात, त्याचप्रमाणें नेफामध्येंहि देवांना व भुताखेतांना भिऊन कोंबड्या-बकऱ्यांचे बळी देणारे लोक राहतात. हिंदू संस्कृतीशीं साम्य असलेली या लोकांची संस्कृति भारतीय संस्कृतीपासून वेगळी आहे, तिच्यावर चिनी संस्कृतीची छाप आहे, असे भारतीय संस्कृतीची सुयोग्य कल्पना नसलेला, भारताविषयीं फारशी आत्मीयता नसलेला, भारताच्याच दृष्टीनें सर्वांगीण विचार करूं शकत नसलेला, एक परदेशी ठरवितो व दिल्लींत बसणारे राज्यकर्ते तें सत्य मानून या मूठभर भारतीयांना वस्तुसंग्रहालयांत जपून ठेवलेल्या जुन्या-पुराण्या दुर्मिळ वस्तूप्रमाणें भारतांतील इतर कोट्यवधि जनतेपासून अलिप्त आणि दूर ठेवतात ! !

परंतु जे राज्यकर्त्यांनीं केलें नाहीं, जें राजनीतीला करतां आलें नाहीं तें भारत-चीन संघर्षानें घडवून आणलें. यापुढें 'नेफा' अथवा 'ऊर्वसीयम्' शेष भारतीय समाजाचा एक भाग आहे, एक अंग आहे, एक अवयव आहे हें निश्चित झालें. भारतीयांना याची जाणीव झाली. श्री. जयप्रकाश नारायणांसारख्या व्यक्तींनींहि आतां आवाज उठविला कीं, नेफा यापुढें केंद्रशासित ठेवूं नये. —अलग राखूं नये. खरें सांगावयाचें तर डॉ. राममनोहर लोहियांसारख्या विचारवन्त देशभक्तानें जें कित्येक वर्षांपूर्वीं सांगितलें तें नेहमींप्रमाणें कित्येक वर्षांनंतर अंमलांत आणणें भारत सरकारला व भारतीय जनतेला आतां भाग पडत आहे !

इंग्रजांच्या कारकीर्दींत संपूर्ण नेफाचा कारभार एक असिस्टंट पोलिटिकल

ऑफिसर पहात असे. त्याचे मुख्य दप्तर 'सादिया' येथें असे. १९४५ सालीं नेफाची विभागणी 'कामेंग', 'सुबानसरी' (सुवनश्री) 'सियांग', 'लोहित', 'तिरप' व 'तू-एन्-सांग' या सहा सरहद्द विभागांमध्यें करण्यांत आली. १९५७ सालीं नाग लोकांची बहुसंख्य वस्ती असलेला 'तू-एन्-सांग' प्रदेश 'नवनिर्मित' नागराज्यांत समाविष्ट केला गेला. नेफाच्या उरलेल्या पांच विभागांचा कारभार सध्यां शिलाँग येथील दप्तरांतून चालतो. परंतु प्रत्येक विभागाला त्याचें असें एक मुख्य ठाणें आहे. 'बमडीला', 'झीरो', 'पासीघाट', 'तेजू' व 'खोन्सा' हीं अनुक्रमें कामेंग, सुवनश्री, सियांग, लोहित व तिरप या विभागांचीं मुख्य ठाणीं आहेत. १९५५ सालीं नेफाचा राज्यकारभार चालविण्यासाठीं एक नवी कारभारयंत्रणा अस्तित्वांत आली. तिचें नांव 'इन्डियन फ्रँटियर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विस'. ज्यांना मागासलेल्या पहाडी लोकांची उन्नति करावयाची ईर्षा आहे असे निवडक लोक आय्. ए. एस्., आय्. पी. एस्. पायदळ, विमानदळ व नौकादळ यांतून निवडून घेऊन त्यांच्या हातीं नेफाचा कारभार सोंपविला गेला. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर या बुद्धिमान लोकांकडून पहाडी प्रजेचें भारतीयकरण–हिंदीकरण–केव्हांच व्हावयास पाहिजे होतें. परंतु कुठून तरी त्यांच्या कर्तृत्वाला आळा घातला गेला, लगाम घातला गेला व त्यामुळें इंग्रजी अमदानींतील जुन्या आय्. सी. एस्. ऑफिसर्सप्रमाणें या लोकांचीहि वर्तणूक पहाडी प्रजेशीं अलिप्ततेची अशी होऊन बसली. स्थानिक टोळ्यांच्या जीवनांत एकदम फार मोठे फरक करण्यानें त्या बिथरून जाण्याची शक्यता आहे अशी एक भीति या अलिप्त वागणुकीच्या मुळाशीं असावी असा माझा तर्क आहे. परंतु पहाडी टोळ्यांचे जलद व बुद्धिपुरस्सर हिंदीकरण न करतां त्यांना अलिप्त परिस्थितींत राहूं देण्यांत सीमासंरक्षणाच्या दृष्टीनें फार मोठा धोका आहे. तो टाळावयाचा असेल तर नेफांविषयींच्या चालू तत्त्वज्ञानांत आमूलाग्र फरक करून या पहाडी टोळ्या आत्मसात् करून घेतल्या पाहिजेत. ज्या वेळीं एखाद्या मागासलेल्या जंगली जमातीचा विश्वास संपादन करावयाचा असेल त्या वेळीं त्या जमातीच्या लोकांतील धर्मकल्पना त्यांचे रीतिरिवाज व त्यांचीं समाजरचना यांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांच्यांत संपूर्णपणें मिसळून जावें

लागतें. नंतरच आपल्या राजकीय उद्दिष्टांत त्या जमातीचें स्थिर असें सहकार्य मिळूं शकतें. नेफांतील पासीघाटसारख्या एखाद्या ठिकाणीं गेले तर एक गोष्ट चटकन् लक्षांत भरते. हिंदी पोषाखांत नव्हे तर संपूर्णपणें पाश्चात्य धर्तीच्या सुटाबुटांतील पी. ओ. (पोलिटिकल ऑफिसर) व अंगावर गाऊनसारखा लाल–पिंवळा गालेक, खालीं लंगोटी, कमरेला वेताचे विळखे आणि गळ्यांत मण्यांच्या माळा घातलेला ' अभोर ' जमातीचा प्रमुख गांवबुढा यांच्यामधील जमीन–अस्मानाइतकी अलिप्तता व विसंगती! अरब टोळ्यांचा उठाव करणारा " लॉरेन्स ऑफ अरेबिया " याचें चरित्र पाहिलें तर भाषेपासून पोषाखापर्यंत प्रथम अरब बनल्यामुळेंच त्याला अरब टोळ्यांचें नेतृत्व करतां आलें हें सहज लक्षांत येतें. आलेल्या महत्वाच्या पाहुण्यासमोर ' जय हिंद ' ओरडून त्याचें स्वागत कसें करावें याचें शिक्षण देणारे अधिकारी सध्या नेफांतील स्थानिक टोळ्यांमध्यें वावरतांना आढळतात! त्याऐवजी राष्ट्रीय हिताच्या व अभिमानाच्या भावनेनें प्रेरित असलेले व जंगली टोळ्या आत्मसात् करण्याच्या दृष्टीनें मुद्दाम सर्वांगीण शिक्षण देऊन तयार केलेले तरुण भारताच्या वेगवेगळ्या प्रांतांतून निवडून काढून नेफामध्यें पाठविले पाहिजेत. तरच स्थानिक टोळ्या खऱ्या अर्थानें ' जय हिंद ' म्हणण्याची शक्यता आहे.

१६

उत्तर सरहद्दीच्या रक्षणाबाबत कांहीं विचार

नेफाच्या सीमेचें संरक्षण व त्या विभागांतील कायद्याची अंमलबजावणी या दोन जबाबदाऱ्या धड ना पोलीस, धड ना लष्कर, अशा आसाम रायफल्स या दुय्यम दर्जाच्या लष्करी दलाकडे आहेत. या दलाचें नेतृत्व पोलिटिकल ऑफिसरच्या सल्ल्यानें लष्करी अधिकारी करतात. सर्व नेफा व नागालँड मिळून सुमारें पंचवीस हजार शिपाई आसामच्या सरहद्दीपासून थेट तिबेट, भूतान व बर्माच्या सरहद्दीपर्यंत पसरले असून त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं आपलीं ठाणीं स्थापन केलीं आहेत. या शिपायांत गुरख्यांचा भरणा अधिक आहे. शिवाय, गढवाली, कुमाऊनी, आसामी आणि वन्य जमातीचे लोकहि आसाम रायफल्समध्यें भरती होतात. या दलाचा गणवेष, शिक्षण वगैरे सर्व सैन्याप्रमाणेंच आहे. आसाम रायफल्सचीं ठाणीं इतकीं दूर दूर व आंत आंत आहेत कीं, त्यातील कांहीं ठिकाणीं पोहोंचावयास वीस व पंचवीस दिवस पायीं चालावे लागतें! या बहुतेक सर्वच ठाण्यांना विमानांतून पुरवठा केला जातो. नेफामध्यें हेलिकॉप्टर्स उतरविण्याकरितां वीस-पंचवीस ठिकाणीं लहान लहान विमानपट्ट्या आहेत. या ठाण्यांवरून रेशन घेऊन विमानें उडतात व निरनिराळ्या ठाण्यांना पॅराशूटच्या साह्यानें रेशनसामुग्री खालीं सोडतात. वरून टाकलेली सर्व सामुग्री ठाण्यावरील शिपायांच्या हातीं निश्चितपणें लागतेच असें नाहीं. जवळच्या खोल दऱ्यांत पडल्यामुळें त्यातील कांहीं फुकट जाते. रेशनसामग्री पुरविण्याच्या या पद्धतींत डोंगराळ प्रदेश व अनिश्चित हवामान यामुळें

गेल्या दहा वर्षांत कमीत कमी सहा-सात डाकोटा विमानें तरी कोसळून चक्काचूर झालीं आहेत !

भारत–चीन संघर्षाच्या संदर्भांत ' नेफा ' सीमेच्या संरक्षणाची व्यवस्था अत्यंत कमकुवत ठरली. देशाचें संरक्षण व स्वातंत्र्य या गोष्टी जर अविभाज्य मानल्या तर शांतीच्या काळांतहि आसाम रायफल्सवर नेफाच्या संरक्षणाची बरीचशी जबाबदारी टाकली गेली तें योग्य नव्हतें असें म्हणावें लागतें. कम्युनिझम व लोकशाही यातील संघर्ष चिरंतन आहे व नेफासारख्या सीमेवर जिथें या दोन शक्ति समोरासमोरा येतात, तिथें कधीं ना कधीं युद्धाची ठिणगी उडणारच हे लक्षांत न आल्यामुळें प्राचीन इंग्रजी राज्यव्यवस्थेची सुधारून वाढविलेली आवृत्तीच नेफामध्यें अजूनहि चालू राहिली आहे.

खरें पाहिलें तर हिमालयाशीं संलग्न असलेल्या देशाच्या सरहद्दीवरील भौगोलिक परिस्थितीचा पूर्ण विचार करून, तेथील हवा व ऋतुमान यांत अत्यंत कार्यक्षमतेनें लढूं शकेल, असे सुसज्ज व भरपूर सैन्यदल नेफाच्या संरक्षणासाठीं असावयास पाहिजे–निर्माण करावयास पाहिजे. नेफामधील पहाडी प्रदेशांत कांहीं ठिकाणीं विशेषतः ईशान्येस व उत्तरेस डोंगरांची उंची वीस हजार फुटांपर्यंत आहे. हीं ठिकाणें बाराहि महिने बर्फव्याप्त असतात. त्यांतील कांहीं कांहीं खिंडी मात्र उन्हाळ्यांत उघड्या होतात. आणि त्यांमधून तिबेटमध्यें प्रवेश करतां येतो. या खिंडीसुद्धा जवळजवळ चौदा ते अठरा हजार फुट उंचीवर आहेत. नुकतीच सर्वांच्या परिचयाची झालेली सेला खिंड चौदा हजार फूट उंचीवर आहे. हिंवाळ्यांत या खिंडी आठ-दहा फूट बर्फाच्या थरानें बंद होऊन जातात. आक्रमकांची चाल थोपवून धरण्याच्या दृष्टीनें या खिंडीच फार महत्वाच्या आहेत व इथेंच कित्येक महिने पुरेल इतकी सामुग्री असलेलीं स्वयंपूर्ण मजबूत लष्करी ठाणीं कायम उभारण्याची जरूरी आहे.

उन्हाळ्यांत हिरव्यागार झाडीनें झांकलेल्या नेफाच्या डोंगर-दऱ्यांतून फिरतांना निसर्गश्रीची किमया पाहून मन मोहून जातें. रंगीबेरंगी फुलांच्या ताटव्यांत लपलेलीं रंगीबेरंगी फुलपांखरें आपली चाहूल लागतांच एकदम उडतात व एखादा बहुरंगी गालिचाच आकाशांत उडूं लागल्याचा भास

निर्माण करतात. केव्हां केव्हां दोन डोंगरांमधून खळाळत जाणारी नदी उन्हाचे कवडसे झेलीत सरकत जाते व त्यामुळें शुभ्र श्यामल छटांचें एखादें वस्त्रच वाऱ्यावर उडत असल्याचा भास होतो. परंतु जेव्हां एखाद्या हुशार व देशाभिमानी लष्करी अधिकाऱ्याबरोबर नेफांतील नयनरम्य वनश्रींतून फिरण्याचा प्रसंग येतो आणि नेफाच्या लष्करी संरक्षणाची तयारी व नेफामधील भौगोलिक परिस्थिति ही परस्परांशीं कशी निगडित आहेत त्याचा विचार व अभ्यास होत जातो. तेव्हां मात्र निसर्गाच्या रमणीयतेनें मोहित झालेलें मन अस्वस्थ–बेचैन होऊं लागतें.

नेफांतून फिरणाऱ्यां प्रवाशांच्या नजरेंत एक दृश्य प्रथमदर्शनींच भरतें. तें म्हणजे डोंगराच्या उतरणीवर दोरासारखे बारीक आणि वळसे घेत जाणारे निरुंद रस्ते ! एक वैशिष्ट्यच आहे हें नेफा प्रदेशाचें. नेफांतील डोंगरांच्या रांगा साधारणपणें पूर्वेकडून उत्तरेकडे जातात, तर त्यांतील रस्ते मात्र बहुतेक जवळजवळ विरुद्ध दिशेनें म्हणजे पश्चिमेकडून ईशान्येकडे जातात. १९५२ सालापासून नेफामध्यें सुरु झालेलें रस्ता-बांधणीचें काम जें रेंगाळत चाललें आहे त्याच्या अनेक कारणांपैकीं भौगोलिक परिस्थिति हेंहि एक कारण आहे. एका दिवसाचा प्रवास करावयाचें म्हटलें तरी तो पायीं असो वा जीपनें असो, प्रवासी पांच ते दहा हजार फूट उंचीचे तीन-चार तरी डोंगर चढतो व उतरतो आणि ते ओलांडतांना आठ-नऊ हजार फूट उंचीवरील रस्त्यांवर पांच-पंचवीस मैल चालून जातो. इतक्या उंच रस्त्यांवरुन जातांना उंचीवरील हवेची संवय नसलेला मुंबईच्या समुद्रसपाटीजवळील मनुष्य डोकें दुखणें, धाप लागणें, उदासीन होणें अशा विकारांनीं पछाडला जाऊं लागतो. अशा उंचीवर समुद्रसपाटीपाशीं राहणाऱ्या माणसाची कार्यक्षमता चाळीस-पन्नास टक्केपर्यंत कमी होत जाते. नेफामधील संघर्षांत नुकतेंच गाजलेलें बोमडीला ठाणें नऊ हजार फूट उंचीवर वसलें आहे. नेफांतील कांहीं लष्करी ठाणीं तर याहूनहि अधिक उंचीवर आहेत. व आणखी कांहीं नवीन ठाणीं अशाच उंचीवर ठेवावीं लागतील. सोळा हजार फुटांवरील प्रतिकूल हवामानांत संवय नसलेला मनुष्य भ्रमिष्ट व भ्रान्तचित्तहि होऊं लागतो. ही अशी स्थिति रक्तांत मिसळून असलेल्या ऑक्सिजनची कमतरता झाल्यामुळें मुख्यत्वें होते. म्हणून नेफाच्या भौगोलिक

परिस्थितीचा सविस्तर व पुरा विचार करून नेफाच्या संरक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. या दृष्टीनें नेफांत लढण्यासाठीं येणारे जवान एक तर पहाडांतच उंचीवर जन्मलेले अथवा कृत्रिम उपायांनीं उत्तुंग पहाडी हवेची संवय लावण्यांत आलेले असे असावयास पाहिजेत. त्याच वेळीं नेफाच्या बदलत्या हवामानाला योग्य असे कपडे व सामुग्री त्यांना भरपूर प्रमाणांत उपलब्ध होईल याकडेहि लक्ष दिलें पाहिजे.

उत्तुंग वातावरणांत मानवी शरीरावर व मनावर जे विचित्र परिणाम होतात त्याविषयीं दक्षिण अमेरिकेंतील पेरू येथें विशेष वैद्यकीय संशोधन चालू आहे. भारतांतहि त्याच धर्तीवर लष्करी व बिनलष्करी डॉक्टरांच्या सहकार्यानें नेफांतील अथवा उत्तर सरहद्दीवरील ऋतुमान व हवामान लक्षांत घेऊन संशोधन करणारी कार्यक्षम प्रयोगशाळा निघावयास हवी. त्याचप्रमाणें हिमालयांत गिर्यारोहणासाठीं गेलेल्या लोकांना आलेले अनुभव व त्यांनीं नेलेली साधनसामुग्री यांची माहिती जमा करून मिळालेल्या अनुभवांचा व शोधांचा उपयोग युद्धतंत्राच्या दृष्टीनें कसा करतां येईल याचाहि अभ्यास करणारी संस्था देशांत असावयास पाहिजे. याहि पुढें जाऊन मी म्हणेन लष्करांतहि गिर्यारोहणाला भरपूर उत्तेजन दिलें गेलें पाहिजे. बोलतां बोलतां एक लष्करी अधिकारी मला म्हणाला कीं, पॉलिथीनपासून बनविलेले नव्या तऱ्हेचे तंबू किंवा बर्फाकडे पाहाण्याचे चष्मे यांपासून तों उंच प्रदेशांत जिभेची चव जिवंत ठेवणारी लोणचीं व सुकामेवा या सर्वांच्या विस्तृत उत्पादनाशीं नेफाच्या भौगोलिक परिस्थितीचें सूक्ष्म व कांटेकोर संशोधन निगडित आहे व प्रत्येक प्रांतांतील उत्पादन-केंद्रांना त्या संशोधनाचें पुरतें मार्गदर्शन व्हावयास हवें.

युद्ध करण्याची कार्यक्षमता दळणवळण व सामुग्री-पुरवठा यांवर अवलंबून असते, आणि दळणवळण व सामुग्रीपुरवठा रस्ते बांधण्याच्या अथवा विमानतळ बांधण्याचा कार्यक्षमतेवर अवलंबून असतात. दळण-वळणाच्या दृष्टीनेंहि नेफाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करण्यासारखा आहे. नेफामध्यें जवळजवळ दोनशें–सव्वादोनशें इंच पाऊस पडतो व तो वर्षांतून आठ महिने चालूच असतो. त्यामुळें नदीनाल्यांना अचानक व भयंकर पूर येतात. सात–आठ हजार फूट उंचीवरील घनदाट अरण्यांतून

निघालेल्या पायवाटा उतारावर नदीनाल्यांच्या पात्रांतून जातात. त्यामुळें प्रवाशाला अनेक वेळां ढोपरभर पाण्यापासून कमरेएवढ्या पाण्यापर्यंत प्रवाहांतून जीव मुठींत घेऊन चालावें लागतें. मैदानांतील प्रवाशाला नेफांतील रहिवाशाबरोबर पायवाटेनें चालावयाचें असेल तर धापा टाकीत चढण चढावी लागते आणि झाडाच्या फांद्या गवत इत्यादींचा आधार घेऊन घसरत–पडत उतार उतरावा लागतो. मैदानावरील पुरुषांच्या पायांच्या पोटऱ्यांपेक्षां नेफांतील स्त्रियांच्या पायांच्या पोटऱ्यादेखील दुपटीनें मजबूत असतात असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. तीस–चाळीस पौंड वजन घेऊन त्या इतरांआधीं भराभर चढण चढतात आणि उतारावर तर अक्षरशः तोल सावरीत धांवतच उतरतात. मोठमोठ्या नद्या पार करण्यासाठीं नेफामधील रहिवासी वेताचे पूल बनवितात. प्रथम नदीच्या दोन्ही कांठांवरील झाडांना लांब लांब जाड वेत आरपार बांधून घेतात व नंतर त्यांच्याभोंवतीं वेताचीं वाटोळीं कडीं अडकवितात. त्यामुळें एक नळकांडें तयार होतें. त्या नळकांड्याच्या तळाला पाय ठेवण्यासाठीं आणखी चार वेत बांधतात व त्यावर आडवीं लांकडें टाकतात. अशा तऱ्हेनें बांधलेला झुलता–पूल मजबूत असला तरी नवशिक्याला मात्र भयकारक वाटल्याशिवाय राहत नाहीं. एक दुसऱ्या तऱ्हेचा पूलहि नेफामध्यें आढळतो. कांहीं ठिकाणीं फक्त चार–पांच वेतांचा दोर नदीवर आरपार लटकत असतो व वेताच्या एका कड्यांत स्वतःला अडकवून घेऊन मनुष्य उलटा होऊन आकाशाकडे पहात त्या दोरावरून माकडाप्रमाणें हातापायांनीं सरकत सरकत नदी पार करतो. खालीं–तीस चाळीस फुटांवर नदी वेगानें घोंघावत असते. अशा भौगोलिक परिस्थितींत गबाळ्या अथवा अप्रामाणिक संघटनांकडून नदीनाल्यांवरून डोंगरांवरून रस्ते बांधावयाला फार वेळ लागतो. शिवाय रस्ते बांधतांना त्यांची रुंदी, त्यांची दिशा, त्यांची आंखणी त्यांची मजबुती, त्यांचा पृष्ठभाग या सर्वांच्या मागें युद्धतंत्राशीं निगडित असा कांहीं निश्चित हेतु असावा लागतो. दुर्दैवानें युद्धाच्या संभाव्यतेविषयीं जे गाफील राहिले व स्वतःची अब्रू सांवरण्यासाठीं “ चीननें आमचा विश्वासघात केला ” अशी ज्यांनीं बालिश ओरड केली अशा व्यक्तींच्या अधिकारांत नेफाची संरक्षण-व्यवस्था होती व त्यामुळें शिपायापासून

खेंचरापर्यंत व डोंगरी विभागांत काम देऊं शकतील अशा छोट्या रणगाड्यांपासून उत्कृष्ट मारगिरी करणाऱ्या इतर शस्त्रांपर्यंत कुणाची हालचाल कशी कुठें करण्याचे प्रसंग येतील याची त्यांना कल्पनाहि शिवली नाहीं. साहजिकच सियांग विभागांतील पासी-घाटपासून त्याच विभागांतील तूतिंग अथवा गेलिंग या ठिकाणीं जावयाला किंवा लोहित विभागांतील तेझूपासून किबिथूपर्यंत जावयाला वीस-पंचवीस दिवस लागतात. याकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष झालें. बेजबाबदारपणें वागलेल्या सरकारी व निमसरकारी यंत्रणांच्या पारिपत्याविषयीं विचार न करतां यापुढें मात्र नेफामधील रस्ते बांधणीचें जिकिरीचें व मोठें काम वेगळ्या पद्धतीनें व वेगळ्या दर्जाच्या आणि कुवतीच्या संघटनांकडून करून घ्यावयाला पाहिजे असें म्हणावेंसें वाटतें. एका रस्त्यावर कांहीं खेंचरें नजरेस पडलीं. त्यांच्याकडे पाहून आठवण झाली. नेफाविषयीं बरीच माहिती असलेला व नेफाविषयीं पुष्कळ विचार केलेला एक भारतीय बोलतां बोलतां मला म्हणाला होता, " नेफांत यश घ्यावयाचें असेल तर डुकरें, खेंचरें आणि माणसें यांच्या भरपूर पैदाशीनें सुरुवात करावयाला हवी. नेफाविषयीं ज्ञान असलेलीं व नेफांत टिकाव धरणारीं माणसें जमविलीं पाहिजेत. त्या माणसांच्या रस्ता-बांधणीच्या कामांत मालाची वाहतूक करण्यासाठीं नेफाच्या हवेंत सहज वावरूं शकणारीं आणि जगणारीं खेचरें निर्माण केलीं पाहिजेत व त्या माणसांना दूरदूरच्या ठिकाणीं अन्नपुरवठा करण्यासाठीं डुकरें पैदा केलीं पाहिजेत आणि तें सर्व जिद्दीनें आणि लवकर केलें पाहिजे. "

नेफामधील वन्य जातींच्या पेहेरावांत व अलंकारांत विविधता आढळून येतें, परंतु पुष्कळ जातीचे पुरुष खालीं लंगोटी व अंगावर गुंडाळलेलें फडकें अशा कपड्यांतच आढळतात. नेफांतील पुष्कळ जातींतील स्त्रिया कुशल विणकर आहेत, परंतु त्या प्रदेशांत कापसाचें उत्पादन फार कमी. त्यामुळें आसामजवळ असलेल्या जमाती सूत विकत घेतात व इतर दूरच्या जमाती झाडांच्या सालींपासून धागे काढून गोणपाटासारखें कापड बनवितात. कामेंग अथवा सुबानसरी विभागांतील डाफला लोक चित्रांतल्या रामलक्ष्मणाप्रमाणें डोक्यावर अथवा कपाळावर जटाजूट बांधतात. या उलट सियांग विभागांतील अभोर किंवा आदि लोकांत स्त्री-पुरुष दोघेंहि गोल केस

कापतात. सुबानसरी जिल्ह्यांतील आपातानी नांवाच्या जमातींत पुरुष कमरेला मागें शेपूट लोंबणारा वेताचा लाल पट्टा घालतात तर त्या जमातींतील बायका नाकपुड्यांत साधारण रुपयाएवढी लाकडाची चकती घालतात ! असें वाटतें गेंड्यासारखें नाक असलेल्या रमणी आपातानी पुरुषांना अत्यंत आकर्षक वाटत असतात. नेफांतील बहुतेक सर्व जमातींत बारीक आंगठीपासून मोठ्या रिळाएवढे दागिने लांकडाचे अथवा बांबूचे तुकडे व जाड तारेचीं कडीं कर्णभूषणें म्हणून वापरलेलीं आढळतात. स्त्रियांच्या गळ्यांत नाण्यांच्या व मण्यांच्या खंडीभर माळा असतात. गोंदण्याची पद्धत पुष्कळ जमातींत आढळते. या बहुतेक जमातींत कामेंग विभागांतील मोंपा जात जरा अधिक सुधारलेली वाटते. ही जात बुद्धधर्मीय आहे व त्या जातींतले लोक तिबेटी लोकांसारखा पोषाख करतात. टवांग-जवळ त्याचें तीनशें वर्षांचें जुनें बुद्धमंदिर आहे. नेफांतील या अनेक जमातींचें स्वतंत्र वर्णन करावयाचें म्हटलें तर एक ग्रंथ होईल. परंतु त्या सर्वांच्या स्वभावांत एक-दोन गोष्टी चटकन् लक्षांत येण्यासारख्या आढळ-तात. नेफामधील प्रत्येक जात स्वतःला स्वतंत्र समजते व तशी वागते आणि या प्रत्येक जातीला आपल्यापुरतें सहकारी जीवन जगण्याइतकें बाळकडू मिळालेलें असतें. चीन–भारत संघर्षांत वन्य जातींच्या वेग-वेगळ्या पोषाखांचा उपयोग चिनी सैनिकांनीं मोठ्या हुषारीनें करून घेतला. कामेंग विभागांत लढणाऱ्या डोग्रा पलटणींशीं चिन्यांचा प्रथम मुकाबला झाला. तेव्हां चिनी सैनिक मोंपाच्या वेषांतच आले होते. इतकेंच नव्हे तर त्या पलटणीला घाबरविण्यासाठीं “ चिनी बहुसंख्येनें येत आहेत. तुम्ही मोर्चांच्या जागा सोडून जा ” असें सांगत आलेला चिनी हेर मोंपाच्याच वेषांत आला होता. लोहित विभागांत पूर्वकाळापासून चीनला जाणारी पायवाट आहे. या विभागांत मिश्मी नांवाचे टोळीवाले मुख्य रहिवाशी आहेत. वालाँगपासून तेझूपर्यंत या टोळ्यांच्या वेषांतच हेरगिरी करणारे चिनी स्त्री-पुरुष गेलीं दोन-तीन वर्षें वावरत आहेत.

खरें सांगावयाचें म्हणजे नेफांतील या अनेक वेषधारी टोळ्या आपल्या-कडील भिल्ल–कातकरी लोकांप्रमाणेंच पुष्कळशा मागासलेल्या आहेत. म्हणून त्यांची तथाकथित संस्कृति वेगळी सांभाळून ठेवण्यासाठीं त्यांना

त्यांच्याच प्रदेशांत इतर भारतीयांपासून अलिप्त ठेवणें निःसंशय धोक्याचें आहे. उघड्या सरहद्दीवरील मूठभर अज्ञानी प्रजा अस्तनींतील निखाऱ्या-प्रमाणें असते. नेफाच्या लोहित विभागांत जसे मिश्मी लोक राहतात तसेच पलीकडील चिनी प्रदेशांतहि ते राहतात व दोन्ही प्रदेशांतील लोक परस्परांच्या हद्दी ओलांडून एकमेकांच्या प्रदेशांत जात-येत असतात. सुबानसरी विभागांतील 'बुगुनी', 'तगीन' वगैरे टोळ्यांचाहि सरहद्दीपलीकडील तिबेटी प्रदेशाशीं घनिष्ठ संबध येतो असें मीं ऐकलें आहे. बोमडीला-सेला रस्त्यावर मोंपाचा पोषाख करून फक्त चिनी सैनिक आले होते. कामेंग-मधील मोंपाचा त्या चिन्यांशीं कांहींहि संबध नव्हता असें म्हणणें दुर्दैवानें वस्तुस्थितिनिदर्शक नाहीं. सरहद्दीपलीकडे दळणवळण ठेवीत असलेल्या या वेगवेगळ्या टोळ्या भारतीयांपासून अलिप्त करून जर नेफा प्रदेशांत ठेवल्या गेल्या तर त्या टोळ्या पुढें-मागें देहसाम्य असलेल्या सरहद्दी-पलीकडील चिनी लोकांशीं एकरूप होण्याच्या मार्गाला लागल्याशिवाय राहणार नाहींत. एका लष्करी अधिकाऱ्यानें इदु मिश्मी लोकांतील कांहीं तरुणांनीं तरी कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचे पाठ घेतले आहेत अशी माझ्याजवळ तक्रार केली. नेफांतील टोळ्यांना इतर भारतीयांपासून दूर ठेवण्याचें तत्त्वज्ञान जर चुकीचें मानलें तर ओघानेंच इतर भारतीयांना नेफामध्यें प्रवेश देणें योग्य ठरतें. आणि तसें करावयाचें झालें तर गढवाली, कुमाऊनी, पंजाबी इत्यादि पहाडी प्रजांना अग्रहक्क दिला पाहिजे. स्थानिक टोळ्यांच्या दृष्टीनें इतर प्रजेचा किती प्रवेश नेफामध्यें होऊं द्यावा हा तपशिलाचा प्रश्न आहे. परंतु एक मात्र निश्चित कीं, मूठभर जंगली टोळ्यांत पसरणाऱ्या फंदफितूरीला त्यामुळें कायमचा आळा बसेल शिवाय नेफामध्यें बेकार पडलेली हजारों एकर जमीन कांहीं प्रमाणांत तरी लागवडीखालीं येऊं शकेल व इतरांशीं संबंध आल्यामुळें नेफा टोळ्याहि शेतीच्या आधुनिक पद्धती शिकतील. नवीन आचार-विचार आत्मसात् करतील व अखेरीस सुधारलेले भारतीय होतील.

१७

सरहद्दीच्या संरक्षणाची अभिनव योजना

नेफामध्यें राहून आलेल्या कांहीं सुशिक्षित लष्करी तरुणांच्या मेळाव्यांत एक कल्पना निघाली. कुणी तरी म्हणालें, " सरहद्दीवरील चिनी आक्रमण हें केवळ भारत आणि चीन यांच्यांतील तात्पुरतें वैमनस्य नाहीं. कम्युनिझम व लोकशाही या दोघांतील चिरंतन संघर्षांतील ती एक लहानशी ठिणगी आहे. आज नाहीं उद्यां हा संघर्ष पुन्हां पेट घेणार. तेव्हां यापुढें नेफा प्रदेश आहे असा निर्मनुष्य ठेवणें धोक्याचें आहे. म्हणून तेथील हवेंत टिकाव धरूं शकतील अशीं पंजाबी, गढवाली, कुमाऊनी इत्यादि पहाडी सैनिकांचीं एकत्र अशीं खेडीं नेफा सरहद्दीपासून वेगवेगळ्या अंतरावर स्थापन करावीं व त्या सैनिकांना घरें व जमिनी देऊन सहकारी व स्वयंपूर्ण अशा तऱ्हेनें अगदीं सर्वोदयी पद्धतीनें त्यांची वस्ती बनवावी. त्याच वेळीं लष्करी दृष्टीनेंहि त्या खेड्यांची संपूर्णपणें मजबूत व दीर्घकाळ टिकाव धरूं शकेल अशी संरक्षण-व्यवस्था करून ठेवावी. या खेड्यांतील सैनिक जेव्हां आपलीं कुटुंबें घरेदारें इत्यादि मागें घालून सरहद्दीवर लढायला जातील तेव्हां ते इतर शिपायांपेक्षांहि कडवेपणानें लढतील आणि शत्रूला त्यांच्याशीं मुकाबला करणें अतिशयच जड जाईल.

मी या कल्पनेची थोडीशी चेष्टा केली. तेव्हा त्यांच्यापैकीं एक तरुण मला म्हणाला, " नाहीं तरी बचाव व चढाई अशा दोन्ही तऱ्हेनें लढण्याचें शिक्षण मिळविलेल्या सैनिकांची स्वयंपूर्ण ठाणीं यापुढें नेफामध्यें ठेवावींच लागतील. अशा ठाण्यांचें पूर्वस्वरूप म्हणूनच या खेड्यांकडे पहा ना. " मी म्हणालों, " सैनिकांचीं ठाणीं वेगळीं आणि खेड्यांची वस्ती वेगळी. तुमच्या कल्पनेंतील या खेड्यांत सैनिकांच्या बायकांनाहि अत्याधुनिक असें लढाऊ शिक्षण द्यावें लागेल. " तो तरुण हंसत हंसत म्हणाला, " माझ्या आईनें सत्याग्रहांत डोक्यावर लाठीमार सहन केला होता. तिची मुलगी लष्करी शिक्षणाला अयोग्य ठरेल असें मला वाटत नाहीं!" बोलतां बोलतां तोच तरुण पुढें म्हणाला, " नेफासारख्या डोंगरी आणि जंगली युद्धांत गनिमी डावपेंच व सैन्याचें विकेंद्रीकरण यांना महत्त्व असतें. त्या दृष्टीनें स्वयंपूर्ण अशा कजागी तुकड्या व त्यांचे नेतृत्व करणारे ऑफिसर्स तयार करावयास हवेत. त्यांच्या शिक्षणाची प्राथमिक सुरुवात या सहकारी खेड्यांतून होऊं शकेल. "

मी त्या तरुणाला प्रश्न केला, " तुमच्या या कल्पना प्रत्यक्षांत यावयाला किती वर्षें लागतील ?" त्यानें उत्तर दिलें, " परिश्रम व हिंमत त्यांच्या बळावर कुठलीहि कल्पना लवकर सत्य-स्थितींत उतरवितां येते. नाहीं तर ती युगानुयुगें निद्रिस्तच राहाते. माझी ही कल्पना इस्राएलमध्यें साकार स्वरूपांत आली आहे. इस्राएलमध्यें तरुणांच्या संघटना सीमा प्रदेशांत लष्करी गांवें वसवून ठाणें देऊन बसतात. अरब राष्ट्रांनीं इस्राएलला कायमचा वेढा देऊन ठेवला आहे. तरीहि तें चिमुकलें राष्ट्र न डगमगतां खडें राहिलें आहे. कारण त्या राष्ट्रानें आपल्या अभिनव व अत्याधुनिक संरक्षण-व्यवस्थेंत या प्रकाराचा अंतर्भाव केलेला आहे. नेफामध्येंहि अशाच तऱ्हेची कायम संरक्षण-व्यवस्था करणें शक्य आहे. अशा तऱ्हेनें बनविलेलीं नवीं खेडीं संरक्षण व उत्पादन हीं दोन्हींहि कार्यें नेटानें पार पाडूं शकतील."

मी त्या तरुणाला विचारलें, "तुम्ही एकंदरीत नेफामध्यें इस्राइली पद्धतीचेंच अनुकरण करूं मागतां ना?" "नाहीं, केवळ अनुकरण नाहीं." त्या तरुणानें उत्तर दिलें, " माझ्या कल्पनेंतील या खेड्यांत संरक्षण व उत्पादन यांच्यासह जनतेचें भारतीयकरणहि अभिप्रेत आहे. प्रांत, भाषा, जातिपंथ, रूढी इत्यादिकांविषयींच्या दुरभिमानानें पोखरल्या गेलेल्या या देशांत या सवाना बाजूला सारून भारतीय म्हणून देशाच्या परिस्थितीचा विचार करणारे निश्चित मनोवृत्तीचे लोक हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आढळूं शकतील. " अशा परिस्थितींत नव्या जागेवर नव्या पद्धतीनें नवीं भारतीय खेडीं निर्माण करण्याचा विचार माझ्या कल्पनेंत अंतर्भूत आहे. सतत युद्ध-परिस्थितींत व एकाकी असलेल्या अशा या खेड्यांतून भारतीय-करणाची विचारपूर्वक पेरलेली बीजें लवकर रुजणें शक्य आहे. राष्ट्रनिष्ठेच्या एकाच प्रेरणेनें खांद्याशीं खांदा लावून मृत्यूशीं सामना देऊं पाहणाऱ्या लोकांत परस्पर-भिन्नत्वाच्या कल्पना सहज अस्पष्ट होत जातात, व त्यांचे एकीकरण आपोआपच होऊं लागतें. इतर गोष्टींपेक्षां नव्या राष्ट्रधर्माची शिकवण आणि तदनुषंगिक समाजपरिवर्तनाची सुरुवात या अशा खेड्यांतूनच होणें शक्य आहे." " तें कसें काय?" मी मध्येंच प्रश्न केला. उत्तर आलें. " शिस्तप्रिय सैनिकांत कुठल्याहि विचारांचीं बीजें लवकर पेरतां येतात व त्यांच्यामध्यें तीं रुजतातहि पटकन्. कारण भलत्या चिकित्सा न करतां शिस्तीखातर म्हणून एखादी गोष्ट सैनिक चटकन् करून जातात. " उदाहरणच द्यावयाचें झालें तर देशभर भाषेच्या दुरभिमानामुळें प्रांताप्रांतांत किती संघर्ष चालू आहे. परंतु लष्करांत मात्र एकदां सोईची म्हटली म्हणजे रोमन-ऊर्दू भाषा-देखील शिस्त म्हणून सहज स्वीकारली जाऊ शकते. कुणी तरी मध्येंच म्हणाले, " डॉक्टर, या मुलाला दिवसा स्वप्नें पाहण्याची संवय आहे आणि त्याच्या कल्पना ऐकत बसणें म्हणजे वेळेचा नुसता अपव्यय आहे. " या आपल्या देशांत जमातीच्या आणि धर्माच्या स्वार्थासाठीं म्हणजेच पर्यायानें

स्वतःच्या स्वार्थासाठीं राष्ट्रीय स्वार्थाचा बळी देणाऱ्या राजकारणधुरंधरांची जात जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत एकसंघ राष्ट्रवाद अथवा भारतीय-करण या गोष्टी आकाशपुष्पाप्रमाणेंच अदृश्य राहणार." तो पंजाबी तरुण अगदीं शांतपणें म्हणाला, "चीनबरोबर संघर्ष टाळावयाचा असेल तर कमींत कमी तीन कोअर इतकें सैन्य (एक रिझर्व व दोन पुढें) नेफामध्यें आणून ठेवावें लागेल. हें इतकें सैन्य म्हणजे जवळजवळ दोन लाखांहून अधिक लढाऊ माणसें सीमा प्रांतांत सतत ठेवणें भारताला आर्थिकदृष्ट्या कसें काय परवडेल हा एक महत्वाचा प्रश्न आहे. अशा परिस्थितींत पर्याय म्हणून सुद्धां कुणी तरी माझ्या कल्पनेचा विचार करणें कदाचित् योग्य ठरेल !

मी मनांत विचार करूं लागलों. विलक्षण चिकाटीचा दिसतो हा तरुण ! नेफांतील खेड्यांच्या वस्तीविषयींच्या त्याच्या कल्पना केवळ संरक्षणाच्या दृष्टीनें निर्माण झालेल्या नाहींत. त्याच्या या कल्पनांच्या हट्टामागें देशाच्या भारतीयकरणाविषयींच्या कांहीं अस्पष्ट कल्पना साकार होऊं पहाताहेत. स्वतःकडे व भारताकडे एका नव्या दृष्टिकोनांतून पाहूं लागल्याशिवाय भारतीय जनतेला यापुढे जगातिक संघर्षांत टिकाव धरणे कठीण आहे. स्वतःच्या नवीन अशा निष्ठा निर्माण केल्याशिवाय निष्ठाशील कम्युनिझमशीं मुकाबला करणें भारताच्या लोकशाहीला कठीण आहे. असा विचार त्याच्या मनांत घोळत असावा. त्या पंजाबी तरुणाचे आभार मानून मी पुढें निघालों.

नेफा आसामाच्या सरहद्दीवरील एका खेड्यांत कुठल्यातरी हिंदी सिनेमांतलें गाणें कुणाच्या तरी घरांतील ग्रामोफोनवरून संध्याकाळच्या वातावरणांत गिरक्या घेत होतें. मनांत आलें प्रथम नेफांतील टोळ्यांची अलिप्तता नाहींशी करून त्याचे भारतीयीकरण लवकर व निश्चित पावलें टाकून करावयाला

पाहिजे. तसें करतांना ग्रामोफोन, रेडिओ, चित्रपट, मिळेल त्या साधनांचा उपयोग करीत भारतानें विजिगीषु वृत्तीनें या गोष्टीवर आपलें सामर्थ्य केंद्रित केलें पाहिजे. निळ्या धूसर वातावरणांत निळे डोंगर विरून जात होते आणि दूर क्षितिजापाशीं क्षीण प्रकाशाची रक्तनदी अंधारांत विलीन पावत होती.



साधना

ट्वेंटिएथ सेंचरि

स्टुडन्टस् डिक्शनरी

संपादक : प्रिं. रा. प. सबनीस, एम्. ए. (कॅन्टब).
प्रिं. डॉ. ना. य. डोळे, एम्.ए.पीएच्.डी.

पृष्ठें ९४० *किंमत रु. ६.००*

उपलब्ध असलेल्या इंग्रजी - इंग्रजी - मराठी शब्दकोशांतील उणीवा दूर करून अधिक विस्तृत प्रमाणावर शब्द आणि अर्थ देणारा इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ करणाऱ्या विद्यार्थ्यांपासून पदवी परीक्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्व गरजा भागविणारा बृहद्कोश

कोशाचीं कांहीं वैशिष्ट्यें

१) आधुनिक इंग्लिश पद्धतीचे प्रमाणभूत उच्चार देवनागरी लिपींत.
२) साधित शब्दांची रचना कळण्याची मूळ शब्दांबरोबर सोय.
३) शब्दांचें व्याकरण.
४) अत्यंत उपयोगी अशीं परिशिष्टें.

साधना प्रकाशन,
४३०–३१ शनवार पेठ, पुणें २.

काांहीं प्रकाशनें

कादंबरी

- **धाकटे आकाश**
  मनोहर शहाणे
  सहा रुपये
- **वैतागवाडी**
  भाऊ पाध्ये
  सहा रुपये

कथा

- **टिटवीचा फेरा**
  शंकरराव खरात
  चार रुपये
- **वहाटूळ**
  चंद्रकांत भालेराव
  पांच रुपये
- **दुपार**
  पंडित शेटे
  चार रुपये
- **वळण**
  मधु कुळकर्णी
  तीन रुपये
- **जीवनसरिता**
  गुलाबदास ब्रोकर
  साडेतीन रुपये